सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित








| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



समाजजीवनाला अत्यंत आवश्यक असणारी रोजची सामूहिक चेतना व सामूहिक मनाची निर्मिती करण्याची व्यवस्था, त्याचप्रमाणे अनुशासनाच्या माध्यमातून मानवी जीवनाकडे पाहण्याची दृष्टी देणारी आणि आजपर्यंत मिळालेल्या यशाचे प्रकटीकरण करणारी शाखा पद्धतीच एकमात्र कारागीर आहे.

**- लक्ष्मणराव भिडे**
रा. स्व. संघाच्या विश्व विभागाचे पूर्व संयोजक आणि दीनदयाल शोध संस्थानचे पूर्व अध्यक्ष

# हल्ले थांबल्यावरच चर्चा

## इराणने फेटाळला संघर्षविरामाचा प्रस्ताव




**तेहरान, ६ एप्रिल**
पश्चिम आशियातील संघर्ष कायम असून, मध्यस्थ देशांनी संघर्षविरामाचा प्रस्ताव इराणने फेटाळला आहे. हल्ले थांबल्याशिवाय चर्चा होणार नाही, असे इराणने स्पष्ट केले. मध्यस्थांनी सादर केलेल्या प्रस्तावांवर उत्तर तयार ठेवल्याचे इराणने सांगितले.

अमेरिकेचा १५ सूत्रीय प्रस्ताव अत्याधिक मागण्या करणारा आहे. आम्ही आमच्या मागण्यांचा संच तयार केला असून, त्याला औपचारिक रूप दिले जात आहे. इस्फहानमधील वैमानिकाच्या सुटकेची मोहीम ही केवळ एक चाल होती. याचा उद्देश इराणचे युरेनियम हस्तगत करण्याचा होता, ही शक्यता नाकारता येत नाही, असे इराणच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने म्हटले आहे. हा संघर्षविराम विरोधकांना संघटित होण्याची आणि कारवाई सुरूच ठेवण्याची संधी देणारा आहे. ओमानसोबतच्या चर्चांचा मुख्य भर होमुईझ सामुद्रधुनीमधून जहाजांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी एक कार्यपद्धती निश्चित करण्यावर असल्याचे मंत्रालयाने स्पष्ट केले.

गरज भासल्यास इराण सर्वस्व झोकून स्वतःचे रक्षण करेल, असे इराणी परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बगाई यांनी येथे आयोजित पत्रपरिषदेत सांगितले. अमेरिका आणि इस्रायल आंतरराष्ट्रीय कायद्यांचे उल्लंघन करीत असल्याचा आरोप त्यांनी केला. *(वृत्तसंस्था)*

### इस्रायलचे विमानतळांवर हल्ले

**एकीकडे संघर्षविरामासाठी प्रयत्न सुरू असताना इराणच्या पायाभूत सुविधा मोठ्या प्रमाणावर उद्ध्वस्त केल्या जात आहेत. इस्रायलने आज इराणच्या मेहराबाद आणि बहराम विमानतळांवर हल्ला केला. इराणमधील तीन विमानतळांवर हल्ला केल्याचा दावा इस्रायलच्या आयडीएफने केला.**

### असलूयेह नैसर्गिक वायू प्रकल्पावर हल्ला

अमेरिका आणि इस्रायलने इराणच्या दक्षिण बुशेहर प्रांतातील असलूयेह नैसर्गिक वायू प्रकल्पावर मोठा हल्ला केल्याचे वृत्त इराणच्या सरकारी माध्यमांनी दिले. इस्रायलने दक्षिण पार्सवर केलेल्या हल्ल्यानंतर इराणने आखाती देशांमधील तेल आणि नैसर्गिक वायू प्रकल्पांवर हल्ले सुरू केले. दुसरीकडे या आठवड्यात होर्मुझ सामुद्रधुनी उघडली नाही, तर वीजप्रकल्प आणि पुलांवर हल्ले केले जातील, असा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला.

### 'होर्मुझ' उघडण्यास नकार

अस्थायी संघर्षविरामाच्या मोबदल्यात होर्मुझ सामुद्रधुनी खुली केली जाणार नाही, असे इराणने स्पष्ट केले. पाकिस्तानने दिलेल्या प्रस्तावाचे विश्लेषण केले जात असून, निर्णय कोणत्याही दबावात घेतला जाणार नाही, असे इराणच्या एका अधिकाऱ्याने स्पष्ट केले. अमेरिकी पक्ष कायमस्वरूपी संघर्षविरामासाठी तयार नाही, त्यामुळे कोणत्याही अस्थायी कराराचा काहीही उपयोग होणार नाही. पाकिस्तानकडून तातडीच्या युद्धविरामाचा प्रस्ताव प्राप्त झाला असून, सध्या त्यावर विचार सुरू आहे. या गोष्टीला त्या अधिकाऱ्याने दुजोरा दिला.

# राष्ट्र सुरक्षित असते, तेव्हाच वैयक्तिक जीवन सुखावह

## सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन

**कोची, ६ एप्रिल**
सर्व जण एकत्रितपणे प्रयत्न करतील, तेव्हाच भारत विश्वगुरू बनेल, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी सोमवारी केले. जोपर्यंत गोपी आणि गोप यांनी आपापल्या काठ्यांच्या मदतीने गोवर्धन पर्वत उचलण्याचा प्रयत्न केला नाही, तोपर्यंत भगवान श्रीकृष्णांनी तो उचलण्यासाठी आपली करंगळी वर केली नव्हती, अशी आठवण त्यांनी उपस्थितांना करून दिली. राष्ट्र सुरक्षित असते, तेव्हाच वैयक्तिक जीवन सुखावह होते, असे त्यांनी स्पष्ट केले.



आपण प्रगती केलीच पाहिजे; परंतु त्याच वेळी आपण राष्ट्रासाठीही कार्य केले पाहिजे, असे डॉ. मोहनजी भागवत यांनी एलामक्कारा येथील 'भास्करीयम्' येथे आयोजित 'बालगोकुलम्'च्या सुवर्णमहोत्सवी सांगता समारंभाचा भाग म्हणून आयोजित केलेल्या बाल नेत्रशिबिराच्या उद्घाटनानंतर संबोधित करताना सांगितले.

वैयक्तिक आणि कौटुंबिक जीवन हे राष्ट्राच्या हितास पूरक असणे आवश्यक आहे. केवळ एक चांगला माणूस असणे पुरेसे नाही; आपल्या सद्गुणांचा उपयोग देशासाठी झाला पाहिजे. कोणतीही व्यक्ती किंवा कुटुंब एकाकीपणे सुखाने जगू शकत नाही. देशात सुरक्षितता असेल, तरच प्रत्येकाचे जीवन सुखकर बनते, असे डॉ. मोहनजी भागवत यांनी सांगितले. श्री नारायण गुरू आणि स्वामी विवेकानंद यांच्यासारख्या विभूतींनी आपले अर्जित चारित्र्य आणि गुण समाजाला समर्पित केले.

जगाच्या कल्याणासाठी कष्ट आणि दुःखे स्वतःवर ओढवून घेणारे भगवान श्रीकृष्ण हे आमचे आदर्श आहेत. भगवंताचा जन्म तुरुंगात झाला आणि त्यांना आपल्या आई-वडिलांपासून दूर राहावे लागले. जगाच्या कल्याणासाठी श्रीकृष्ण पांडवांच्या पाठीशी उभे राहिले त्यांनी युद्धादरम्यान त्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी कोणत्याही वैयक्तिक सुखाची अपेक्षा केली नाही; उलट त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य जागतिक हितासाठी वेचले, असे डॉ. मोहनजी भागवत म्हणाले. *(वृत्तसंस्था)*

### केवळ चांगले असणे पुरेसे नाही...

**काश्मीरचे लोक एकेकाळी संपत्ती आणि बुद्धिमत्तेच्या बाबतीत खूपच अग्रेसर होते. परंतु, सर्व काही मागे सोडून त्यांना आपल्या जन्मभूमीतून पलायन करावे लागले. केवळ चांगले असणे पुरेसे नाही, तर आपण समाजाच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले पाहिजे, हा धडा आपल्याला यातून मिळतो, असे सरसंघचालक म्हणाले.**

## महत्त्वाचे

### मेटल आणि बँकिंग शेअर्स वधारले

**मुंबई** : भारतीय शेअर बाजाराने सोमवारी सलग तिसऱ्या दिवशी तेजी कायम ठेवली. चढ-उतार असलेल्या या सत्रात दोन्ही प्रमुख निर्देशांकांनी १ टक्क्यांहून अधिक वाढ नोंदवली. मीडिया आणि ऑइल अँड गॅस क्षेत्र वगळता इतर सर्व क्षेत्रांमध्ये झालेल्या खरेदीमुळे निफ्टी २३,००० च्या पातळीच्या जवळ पोहोचला. मिश्र जागतिक संकेतांमुळे बाजाराची सुरुवात संथ झाली होती. मात्र दुपारनंतर झालेल्या जोरदार खरेदीमुळे बाजाराने दिवसभरातील तोटा भरून काढला आणि दिवसाच्या उच्चांकी स्तरावर बंद झाला. सोमवारी व्यवहार बंद होताना सेन्सेक्स ७८७.३० अंकांनी (१.०७%) वधारून ७४,१०६.८५ वर स्थिरावला, तर निफ्टी २५५.१५ अंकांनी (१.१२%) वाढून २२,९६८.२५ वर बंद झाला. ब्रॉडर मार्केटमध्येही चांगली सुधारणा दिसून आली. निफ्टी मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांक अनुक्रमे १.५ टक्के आणि १.३ टक्क्यांनी वधारले. निफ्टीमध्ये ट्रेंट, श्रीराम फायनान्स, ॲक्सिस बँकेला फायदा झाला.

# राज्यातील कारागृहांमध्ये लागणार 'वॉटर कूलर'



**मुंबई** : राज्यातील कारागृहांमधील कैद्यांच्या आरोग्यविषयक सुविधांमध्ये महत्त्वाची भर घालत, आता सर्व कारागृहांमध्ये कैद्यांना थंड आणि शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

उच्च न्यायालयाच्या आदेशाचा दाखला देत हा निर्णय घेण्यात आला आहे. गृह विभागाने ६ एप्रिल २०२६ रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार, तुरुंगातील वैद्यकीय सुविधा वाढविणे या योजनेअंतर्गत राज्यातील सर्व कारागृहांमध्ये "वॉटर कूलर विथ प्युरीफायर" खरेदीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. कैद्यांना दिल्या जाणाऱ्या पाण्याच्या गुणवत्तेबाबतची याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल झाली होती. यात कैद्यांना देण्यात येणारे पाणी धूळ व गाळयुक्त बादलीत साठवलेले जाते आणि तेच पाणी इतर कामांसह पिण्यासाठीही वापरले जात असल्याचे स्पष्ट झाले होते.

# उड्डाणपुलाचे भूसंपादन, गाळे हस्तांतरण, महसूलवाढीचे पालकमंत्र्यांचे मनपाला आदेश

**सोलापूर, दि. ६ एप्रिल-**
सोलापूर शहरातील प्रलंबित नागरी प्रश्नांवर आणि योजनाबाबत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आक्रमक भूमिका घेत उड्डाणपुलांसाठी भूसंपादन, शासकीय जागांचे हस्तांतरण, नव्या उड्डाणपुलांची गरज, गुंठेवारी प्रश्न, मनपा मालकीच्या गाळ्यांतील पोटभाडेकरू, गाळे हस्तांतरण आणि महापालिकेच्या उत्पन्नवाढीचे उपाय यासह विविध विषयांवर तातडीने कार्यवाही करण्याचे स्पष्ट आदेश दिले.



पालकमंत्री गोरे यांनी महापालिकेतील विविध विषयासंदर्भात बैठक घेतली. उड्डाणपुलांसाठी भूसंपादन, शासकीय जागांचे हस्तांतरण, नव्या उड्डाणपुलांची गरज, गुंठेवारी प्रश्न, मनपा मालकीच्या गाळ्यांतील पोटभाडेकरू, गाळे हस्तांतरण आणि महानगरपालिकेच्या उत्पन्नवाढीचे उपाय यावर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.महानगरपालिका आढावा बैठकीत शहर विकासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या निर्णयांची दिशा निश्चित करण्यात आली. शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर मंजूर उड्डाणपुलांव्यतिरिक्त आणखी किती उड्डाणपुलांची गरज आहे, याचा सखोल अभ्यास करून प्रस्ताव सादर करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. तसेच पोस्ट, रेल्वेच्या जागांच्या हस्तांतरणासाठी संबंधित विभागांशी समन्वय साधण्याचे आदेश देण्यात आले. दरम्यान, महानगरपालिका हद्दीतील मोठ्या प्रमाणावर मिळकतींच्या नोंदीच उपलब्ध नसल्याचा मुद्दाही बैठकीत गंभीरतेने उपस्थित झाला. यावर त्यांनी पदाधिकारी व अधिकाऱ्यांना समन्वयातून तातडीने मार्ग काढत प्रलंबित मिळकतींची नोंद पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.



बारामती विधानसभेच्या पोटनिवडणुकीसाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल यांच्यासह पक्षाचे इतर नेते उपस्थित होते. अर्ज दाखल करण्याआधी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत सभा पार पडली.

### मालदा घटनेचा तपास एनआयएकडे : सुप्रीम कोर्ट

**नवी दिल्ली** : सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी पश्चिम बंगाल पोलिसांना मालदा जिल्ह्यात एका विशेष सखोल पुनरावलोकन प्रकरणी कार्यरत असलेल्या सात न्यायिक अधिकाऱ्यांवरील हल्ला आणि वेढा प्रकरण राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे सोपवण्याचे निर्देश दिले. या प्रकरणात स्थानिक पोलिसांवर विश्वास ठेवता येणार नाही, असेही न्यायालयाने म्हटले आहे. सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची व विपुल एम. पांचोली यांच्या न्यायासनाने असे निरीक्षण नोंदवले की, पश्चिम बंगालची नोकरशाही कमकुवत केली जात आहे. सचिवालय व सरकारी कार्यालयांमध्ये राजकारण आणले जात आहे.




### एकाच कुटुंबातील दोन मुलांचा मृत्यू

**धाड** : येथील एकाच कुटुंबातील दोन मुलांचा मृत्यू झाला. आईसह दोन मुलांवर उपचार सुरू असून, दोघांची प्रकृती चिंताजनक आहे. ते बुलढाणा येथील शासकीय रुग्णालयात मृत्यूशी झुंज देत आहेत. अन्नातून झालेली विषबाधा या घटनेसाठी कारणीभूत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. तवक्कल नगर भागातील एकाच कुटुंबात राहणाऱ्या अश्मिरा मोहम्मद, फातिमा, आफरीन, मसीरा, मोहम्मद अली यांना गंभीर अवस्थेत धाड येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले, अशी माहिती सहायक पोलिस निरीक्षक प्रताप भोस यांनी दिली. डॉ. प्रवीण चाटे यांनी तपासणी केली असता मसीरा व मोहम्मद अली यांना मृत घोषित करण्यात आले. त्यांच्या मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदनानंतर स्पष्ट होणार आहे.

# समान नागरी कायद्याचा अजेंडा पूर्ण करणार

● पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन ● सकारात्मक चर्चा सुरू

**नवी दिल्ली, ६ एप्रिल**
समान नागरी कायदा आणि एक राष्ट्र, एक निवडणूक ही दोन भाजपाची मागे पडलेली कामे आहेत, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी केले. या विषयांवर गंभीर चर्चा सुरू असून त्यात सकारात्मक प्रगती असल्याचे ते म्हणाले.



१९९४ मध्ये महिला आरक्षणाचा मुद्दा सर्वप्रथम भाजपानेच उपस्थित केला होता. दुसरीकडे सध्याचे भाजपाच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार लोकसभा आणि विधानसभांत महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारा महिला आरक्षण कायदा २०२९ च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये लागू केला जाईल, हे सुनिश्चित करण्यासाठी पूर्णपणे कटिबद्ध आहे, असे नरेंद्र मोदी यांनी भाजपाच्या ४७ व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाला आभासी स्वरूपात संबोधित करताना सांगितले.

काँग्रेसच्या राजवटीत भाजपा कार्यकर्त्यांनी आणिबाणी आणि दडपशाहीसारख्या अनेक हालअपेष्टा सहन केल्या, असे काँग्रेसवर टीका करताना मोदी यांनी सांगितले. भाजपाच्या अनेक कार्यकर्त्यांनी तर आपल्या प्राणांची आहुती दिली आहे. पश्चिम बंगाल आणि केरळसारख्या राज्यांमध्ये हे दिसून आले आहे. या राज्यांमध्ये हिंसेचे रूपांतर एका राजकीय संस्कृतीमध्ये करण्यात आले आहे.

आपली मोहीम अद्याप सुरू आहे. समान नागरी कायदा आणि एक राष्ट्र, एक निवडणूक तसेच इतर मुद्द्यांवर देशात गांभीर्याने चर्चा केली जात आहे. या आघाड्यांवर आपण लक्षणीय यश मिळविले आहे. देशाला विकसित आणि आत्मनिर्भर बनवणे हे भाजपाचे उद्दिष्ट आहे आणि भाजपा सातत्याने त्या दिशेने चालत राहील, असे नरेंद्र मोदी यांनी सांगितले. प्रत्येक आव्हानाचा सामना करण्यासाठी भाजपा मनापासून प्रयत्न करीत आहे, असे ते म्हणाले. *(वृत्तसंस्था)*

### 'वसुधैव कुटुम्बकम्'वर भाजपाचा विश्वास

**युद्धाचा काळ असला, तरी भाजपाचा 'वसुधैव कुटुम्बकम्'वर ठाम विश्वास आहे, असे नरेंद्र मोदी यांनी पश्चिम आशियातील संघर्षाचा संदर्भ देत सांगितले. एक काळ असा होता, जेव्हा भारत प्रत्येक देशापासून समान अंतर राखण्यात अभिमान बाळगत असे. परंतु, आता मात्र प्रत्येक देशाशी जवळचे संबंध राखून पुढे वाटचाल करीत आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.**

# अमरावती शिक्षण विभागातील पदांना मुदतवाढ

**मुंबई, ६ एप्रिल**
राज्यातील शालेय शिक्षण विभागांतर्गत अमरावती विभागातील काही अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. यामध्ये अमरावती, यवतमाळ आणि बुलढाणा येथील पदांचा समावेश असून, संबंधित पदांची मुदत आता १ मार्च २०२६ ते ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने ६ एप्रिल २०२६ रोजी याबाबत शुद्धीपत्रक जारी केले आहे. या निर्णयानुसार, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक) अंतर्गत कार्यरत असलेल्या पदांना ही मुदतवाढ लागू राहणार आहे.

या मुदतवाढीमुळे संबंधित विभागातील प्रशासकीय कामकाज सुरळीतपणे सुरू राहण्यास मदत होणार आहे. विशेषतः वेतन व भविष्य निर्वाह निधीशी संबंधित कामांमध्ये अडथळे येऊ नयेत, यासाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

शासनाने यासोबतच पदनामातही महत्त्वाची दुरुस्ती केली आहे. यापूर्वी संबंधित कार्यालयांमध्ये 'मुख्य लिपिक' असे पदनाम नमूद करण्यात आले होते. *(तभा वृत्तसेवा)*




CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### ॲड.अभिजित इटकर व देवयानी किणगी युवा विधिज्ज्ञ पुरस्काराने सन्मानित

**सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

ज्येष्ठ विधिज्ञ कै. ॲड. पी. डी. कुलकर्णी यांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त कै. ॲड. पी. डी. कुलकर्णी फौंडेशनतर्फे ॲड. अभिजित इटकर व ॲड. देवयानी किणगी यांना न्यायक्षेत्रातील सातत्यपूर्ण व उल्लेखनीय योगदानाबद्दल युवा विधिज्ञ पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. सोलापूर बार असोसिएशनच्या हॉलमध्ये संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. कार्यक्रमास माजी प्रमुख जिल्हा न्यायाधीश ॲड. प्राची कुलकर्णी, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. महेश अग्रवाल, सोलापूर वकील संघाचे अध्यक्ष ॲड. बाबासाहेब जाधव, उपाध्यक्ष ॲड. रियाज शेख, सचिव ॲड. बसवराज हिंगमिरे, सहसचिव ॲड. मीरा सिंग तसेच सहाय्यक सरकारी वकील ॲड. आनंद कुर्डुकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



### आटपाडी-गाणगापूर एसटी बसचे नाझऱ्यात स्वागत

**सांगोला, दि. ६ एप्रिल-**

सोमवार दि.६ एप्रिल पासून सुरू झालेल्या आटपाडी-गाणगापूर एसटी बसचे नाझरे (ता.सांगोला) येथे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी बसचे ड्रायव्हर नितीन सरोदे, कंडक्टर दादासाहेब नरळे व प्रवासी संघटनेचे सदस्य शंकर बंडगर यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी डॉ.विजय सरगर, अशोक पाटील, नंदकुमार रायचुरे, अमर रायचुरे, बाबुराव जोंधळे, लक्ष्मण ढोबळे, बंडू माने, दत्तात्रय जावीर, बबन भडंगे, संतोष निंबाळकर, रविराज शेटे, सुनील जवंजाळ उपस्थित होते. आटपाडी ते नाझरे मार्गे गाणगापूर ही एसटी बस प्रवासी सेवा संघाच्या माध्यमातून सुरू झाल्याने भाविक भक्त मंडळीत समाधानाचे वातावरण पसरले असून या बसनेच प्रवास करा असे मनोगत शंकर बंडगर व रविराज शेटे यांनी यावेळी व्यक्त केले. तसेच बलवडी पाटी येथे शिवाजी शिंदे, कृष्णदेव कारंडे, रेवन बदडे, धनाजी पांढरे, राजेंद्र इकारे यांनीही बसचे ड्रायव्हर, कंडक्टर यांचा सत्कार केला.

### अभिनेत्री वर्षा उसगावकर, गायक अयाज यांनी जिंकली रसिकांची मने

**सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

नुकतेच राम नवमी च्या पूर्व संध्येला सिने अभीनेत्री वर्षा उसगांवकर व गायक मोहम्मद अयाज यांनी एकाहुन एक गाणी सादर करून सोलापूर रसिकांना भारावून टाकले. हा बहारदार कार्यक्रम जुळे सोलापूर येथील श्री स्वामी समर्थ पर्ल येथे पार पडला. भूमी पूजन करण्यात आला. या वेळेस श्री स्वामी समर्थ अन्न छत्र मंडळाचे अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले, अमोल राजे भोसले, जनता बँकेचे सर व्यवस्थापक मकरंद



जोशी, इंद्रधनुचे संचालक विकास कोळी, दिगंबर भगरे, महावीर बँकेचे चेअरमन दीपक मुनोत, युवा उद्योजक गणेश कोळी, शंकर कुंभार, नगरसेवक गणेश वानकर, गिरीश बोरगावकर, एडवोकेट अजिंक्य मराठी, भारतीय स्टेट बँकेचे आनंद कुमार पाटकर, बँकेचे मुख्य व्यवस्थापक मगदूम, आर्किटेक्ट वीरेंद्र बोलावतीन, स्ट्रक्चर डिझायनर जगदीश दीडी उपस्थित होते.

### ट्रकच्या धडकेत एकाचा मृत्यू तर तिघेजण जखमी

**सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

अशोक लेलँड मालवाहतूक ट्रक चा अज्ञात चालक हा वाहन भरधाव वेगात चालवून तीनचाकी टमटम गाडी मधील पाठीमागील हौदामध्ये चिंच भरून, बसून सोलापूर कडे जात असताना पाठीमागून अज्ञात ट्रक चालकाने जोराची धडक दिल्याने तीन चाकी मधील एकाचा उपचार पूर्वीच मृत्यू झाला तर तिघे जखमी झाले आहेत. हा अपघात हैदराबाद ते सोलापूर रोडवर झाला. दि. ३ एप्रिल रोजी मौजे बोरामणी, ता. दक्षिण सोलापूर गावच्या शिवारातील बोरामणी पोलीस आऊट पोस्ट समोरील हैदराबाद ते सोलापूर जाणाऱ्या रोडवर अशोक लेलँड मालवाहतूक ट्रक गाडी नंबर केए ५६०४५८ चा अज्ञात चालक हा वाहन भरधाव वेगात चालवून रुकूम महमूद बैग, वय ४५, रा. समता नगर मुळेगाव रोड सोलापूर यांची तीनचाकी टमटम गाडी नंबर एमएच १२ जेएफ ३५९९ या गाडीच्या पाठीमागील हौदामध्ये चिंच भरून बसून सोलापूर कडे जात असताना पाठीमागून अशोक लेलँड मालवाहतूकचा अज्ञात चालकाने जोराची धडक दिल्याने तीन चाकी मधील मयत चालक रुखुम महमूद बैग व पाठीमागे हौदात बसलेली मुलगी लैला रुकुम बैग वय ४२, मुलीची नात शरीन शाहरुख बेग, वय १४ दोघे रा. समता नगर, मुळेगाव रोड, सोलापूर, अंजना संजय साठे, वय ४०, रा. खेकडे नगर, सोलापूर असे सर्वजण टमटम गाडी, रोडवर जोरात पलटी झाल्याने गाडीतून रोडवर पडून अपघातामध्ये चौघे जण किरकोळ गंभीर जखमी होऊन टमटम चालक रुकुम महमूद बैग हे गंभीर जखमी होऊन उपचारापूर्वीच मयत झाले. टमटम गाडीचा दरवाजा उजव्या साईड बॉडीचा पत्रा फाटून तुटून चेमटून अंदाजे १० हजार रुपयांचे नुकसान अशोक लेलँड मालवाहतूक चालकाने केले आहे. या अपघातातील जखमींना उपचारास घेऊन न जाता तो तसाच अज्ञात चालक तसाच निघून गेला. याबाबत अशोक लेलँड मालवाहतूक च्या अज्ञात चालका विरोधात सोलापूर तालुका पोलीस ठाण्यात दि. ५ एप्रिल रोजी गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास आत्तार करत आहेत.

# गुंठेवारीचा प्रश्न लागणार मार्गी

- नोटरी नोंदणीतील मालक आणि खरेदीदारांनी सहनिबंधकाकडे अर्ज दाखल करावेत
- महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांचे आवाहन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

शहरातील अनेक मिळकतदारांनी गुंठेवारी अंतर्गत नोटरी करून खरेदी केली आहे. अशा गुंठेवारीतील मालक आणि खरेदीदारांमध्ये समन्वय असेल तर त्यांनी सातबारा उताऱ्यावर नाव नोंदणीसाठी सहनिबंधकांकडे अर्ज दाखल करता येतील, अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली.

सोलापूर शहरात गुंठेवारी चा प्रश्न काही अंशी मार्गी लागणार आहे. गुंठेवारी अंतर्गत काही मिळकतदारांनी नोटरी करून मिळकत खरेदी केली असल्याचे प्रकरणे आहेत. नोटरी वर खरेदी केल्याने त्यांना सातबारा मिळत नव्हता परिणामी सातबारा नसल्याने त्यांना कर्जही मिळत नाही त्याचबरोबर सोलापूर महापालिकेला आवश्यक कर उपलब्ध होत नाही. त्यामुळे आता नोटरी खरेदी केलेल्या खरेदीदार आणि मालक यांनी समन्वयातून सहनिबंधक यांच्याकडे अर्ज दाखल करावा. चुकीचे मुद्रांक शुल्क अशा स्वरूपाचा अर्ज दाखल करता येईल. एकूण गुंठेवारी प्रकरणातील काही जणांना याचा लाभ मिळू शकणार आहे. सोलापुरातील शहर उत्तर आणि दक्षिण सोलापूर मध्ये गुंठेवारीची अनेक प्रकरणे आढळून येतात. यासाठी यापूर्वी शिबिरेही आयोजित केली होती. त्यापैकी ज्या नोटरीचे मालक आणि खरेदीदार नोंदणीसाठी तयार आहेत त्यांना सहनिबंधकांकडे अर्ज करता येणार आहे.

**बिले मेसेजद्वारे पाठवली**

सोलापूर महापालिकेच्या मालमत्ता कराची बिले मिळकत कर संकलन विभागाकडून मेसेज द्वारे संबंधित मिळकतदारांना पाठविण्यात येत आहेत. लवकरच छापील बिलेही त्यांना देण्यात येणार आहेत. तत्पूर्वी मेसेजच्या आधारावर मिळकतदारांनी मिळकत कर भरून सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी केले आहे.

# जनगणनेची प्रक्रिया सुरू

**८ चार्ज ऑफिसर २२०० प्रगणक गट राहणार कार्यरत**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

१५ वर्षानंतर जनगणना प्रक्रिया सुरू झाली. सोलापूर शहरात एकूण सुधारित आठ झोन तयार करण्यात आले आहेत. त्या अंतर्गत आठ चार्ज ऑफिसर नेमण्यात आले आहेत तर २२०० प्रगणक गट आहेत. ४०० सुपरवायझर नेमण्यात आले आहेत.



फिल्डर ट्रेनर हे डेमो साठी दिनांक ८ व ११ एप्रिल रोजी मोदीविभागसह संबंधित विभागात माहिती घेणार आहेत. त्यांना नागरिकांनी माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी केले आहे. पंधरा वर्षानंतर राष्ट्रीय जनगणना करण्यात येत आहे. ही जनगणना कागदावर नाही तर डिजिटल असणार आहे. या जनगणनासाठी महापालिका स्तरावर एकूण आठ जून सुधारित करण्यात आले आहेत या प्रत्येक जण ला एक चार्ज ऑफिसर नियुक्त केला आहे सुधारित झोनची रचनाही करण्यात आली आहे प्रत्येक गटांमध्ये दीडशे कुटुंब राहणार आहेत. २२०० प्रगण गट आहेत दहा टक्के एक्स्ट्रा ठेवण्यात आले आहेत. घर गणना आणि प्रत्यक्षात जनगणना असे दोन टप्पे करण्यात आले आहेत. मास्टर ट्रेनर चे प्रशिक्षण झाले आहे ३१ फिल्ड ट्रेनर नेमण्यात आले असून त्यांच्याही प्रशिक्षण सुरू आहे फिल्ड ट्रेनर हे डेमो साठी दिनांक ८ व ११ एप्रिल रोजी संबंधित विभागात माहिती घेणार आहेत. लोकांनी त्यांना माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन उपायुक्त लोकरे यांनी केले आहे. घर यादी आणि त्यानंतर जनगणना करण्यात येणार आहे. घरोघरी जनगणनेची प्रक्रिया साधारणता: पुढील महिन्यात सुरू करण्यात येणार आहे, असेही महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी स्पष्ट केले.

# वर्गात झाडू न मारल्याने शिक्षकाची विद्यार्थ्यांना मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

'तुम्ही वर्गात झाडू का मारत नाहीत?' असे म्हणून कार्यानुभव शिक्षकाने तीन विद्यार्थ्यांना शिवीगाळ करून बेदम मारहाण केली. या प्रकरणी सोलापुरातील कन्नड शाळेच्या मुख्याध्यापकांनी त्या शिक्षकाविरुद्ध जोडभावी पेठ पोलिसांत फिर्याद दिली. त्यावरून नीलकंठ मठपती यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांचा स्वच्छतेचा तास घेतो, असे सांगून कार्यानुभव शिक्षक नीलकंठ मठपती वर्गावर गेले. वर्गावर तास सुरू असताना त्यांनी वर्गातच स्वच्छतेचा तास सुरू केला. त्यावेळी तीन विद्यार्थी स्वच्छता करीत नव्हते. आपण सांगितलेले विद्यार्थी ऐकत नसल्याच्या रागातून त्या शिक्षकाने विद्यार्थ्यांना खाली पाडून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. पायावर, मांडीवर, पोटात, बरगडीवर व हातावर मारहाण केली. विद्यार्थ्यांनी ही बाब पालकांना सांगितल्यानंतर पालक शाळेत आले. त्या शिक्षकाला आमच्या ताब्यात द्या, त्याला आम्ही बघतो, अशी त्यांची भूमिका होती. शाळेच्या मुख्याध्यापकांनी मध्यस्थी केली. पालकांच्या तक्रारीवरून त्यांनी त्या शिक्षकाविरुद्ध जोडभावी पेठ रूपनर तपास करीत आहेत. कार्यानुभव शिक्षक नीलकंठ मठपती यांनी यापूर्वीही शाळेतील विद्यार्थ्यांना तीन वेळा मारहाण केली होती. त्याच्या तक्रारी शाळेकडे आल्या होत्या. संस्थेच्या प्रमुखांनी व मुख्याध्यापकांनी सतत त्यांना समजावून सांगितले होते. तरीदेखील त्यांनी पुन्हा विद्यार्थ्यांना मारहाण केली. कार्यानुभवात स्वच्छतेच्या तासात वर्ग सुशोभीकरण किंवा परिसर स्वच्छता अपेक्षित होते. मात्र, वर्गाची स्वच्छता का केली नाही, या कारणावरून विद्यार्थ्यांना मारहाण करण्यात आली. त्यांना मुख्याध्यापक व्हायचे होते; परंतु संस्थेने ती जबाबदारी दिली नसल्याचा राग त्यांच्या मनात होता. त्यातूनच त्यांनी असे प्रकार केल्याचे बोलले जात आहे.

# कंत्राटदारांचा आजपासून कामबंदचा इशारा

**प्रलंबित देयके न मिळाल्यामुळे राज्यव्यापी आंदोलन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

महाराष्ट्र राज्यातील विकास कामांसाठी निधीअभावी कंत्राटदार व विकासक यांची प्रलंबित देयके न मिळाल्यामुळे ७ एप्रिलपासून राज्यव्यापी कामबंद आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, राज्य अभियंता संघटना व पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी ही माहिती दिली. संघटनांच्या मते, नोव्हेंबर २०२५ मध्ये सत्तेवर आलेल्या सरकारला १७ महिने पूर्ण होत असूनही प्रत्यक्ष निधी वितरणात मोठी तूट आहे.

सार्वजनिक बांधकाम, जलजीवन मिशन, ग्रामविकास, पर्यटन, नगरविकास, जलसंपदा व जिल्हा नियोजन समिती अशा विविध विभागांमध्ये हजारो कोटींची देयके अद्याप प्रलंबित आहेत. मागील वर्षी एकूण थकबाकी १,१६,५०० कोटी रुपये होती, ती यावर्षी ९६,४०० कोटींवर




आली असली तरी फक्त सुमारे २०,००० कोटींचीच देयके वितरित झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.दरम्यान, स्थानिक स्वराज्य संस्था व महापालिकांकडेही निधीअभावी नवीन कामांना मंजुरी दिली जात नसून, जुनी देयकेही रखडली आहेत. यामुळे राज्यातील सुमारे ३ लाख कंत्राटदार व अवलंबून असलेल्या लाखो कामगारांवर आर्थिक संकट ओढवले आहे. या संदर्भात मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांना फेब्रुवारी व मार्च २०२६ मध्ये लेखी निवेदने देऊनही ठोस निर्णय न झाल्याने अखेर आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात आल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. सरकारने तातडीने निधी उपलब्ध करून न दिल्यास विकासकामे ठप्प होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.. मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांना दहावेळा या गंभीर विषयावर चर्चा करण्यासाठी वेळ मागितली तरी फक्त खोटे आश्वासन मिळते म्हणून आता राज्यातील सर्व विभागाकडील विकासाची कामे कंत्राटदार ७ एप्रिल पासुन बंद करणार आहे अशी माहिती महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटना व महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनाचे राज्य अध्यक्ष इंजि मिलिंद भोसले, महासचिव सुनील नागराळे, राजेश देशमुख, संजय मैंद, मंगेश आवळे, सुरेश कडु पाटील, निवास लाड, प्रकाश पांडव, सुबोध सरोदे, अनिल पाटील, नितीन लवाळे, दिपेश कोलुरवार, अश्विन पवार, सिकंदर डांगे, कांतीलाल डुबल, कैलास लांडे, अन्वर अली, कौशिक देशमुख राज्यातील सर्व जिल्हा अध्यक्ष व पदाधिकारी यांनी शासनास दिला आहे.



# वालचंद शिक्षण समूहात मुनिश्री १०८ वीरसागरजी महाराजांचा संघ दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

शहरातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रस्थानी असलेल्या वालचंद शिक्षण समूहाच्या नूतन परिसरात सध्या श्रद्धा, भक्ती आणि अध्यात्माचा मंगलमय उत्सव रंगत असून, शिक्षण हाच धर्म या उदात्त ध्येयवाक्याला साजेसा आध्यात्मिक सोहळा अनुभवण्याची दुर्मीळ संधी नागरिकांना लाभत आहे. प.पू. निर्यापक श्रमण मुनिश्री १०८ वीरसागरजी महाराज यांच्या पावन सान्निध्यात ६ एप्रिलपासून सुरू झालेल्या या भव्य कार्यक्रममालेत धार्मिक, सांस्कृतिक आणि बौद्धिक उन्नतीचा त्रिवेणी संगम अनुभवायला मिळत असून, साधना, संयम आणि आत्मशुद्धीची आराधना घडत आहे.

या सोहळ्याची सुरुवात सोमवार, ६ एप्रिल रोजी भक्तिभावपूर्ण वातावरणात झाली. श्री आदिनाथ जैन मंदिर येथून संत शिरोमणी आचार्यश्री १०८ विद्यासागरजी महाराज यांचे शिष्य निर्यापक श्रमण मुनीश्री १०८ वीरसागरजी महाराज यांच्यासह मुनीश्री विशालसागरजी, धवलसागरजी, मंथनसागरजी, मननसागरजी, विरलसागरजी महाराज तसेच क्षुल्लक श्री १०५ विजितसागरजी महाराज असा मुनिसंघाचा विहार मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला. शहरातील प्रमुख मार्गांवरून होत सायंकाळी वालचंद शिक्षण समूहाच्या डब्ल्यू.आय.टी. जैन मंदिर येथे त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी श्रावक-श्राविका, विद्यार्थी तसेच जैन समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहून भावपूर्ण अगवाणी केली. बँड पथकाच्या संगीतमय वातावरणात जिओ और जिने दो अशा घोषणांनी परिसर भारावून गेला. या प्रसंगी वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, विश्वस्त भूषण शहा, पृथ्वीराज गांधी, वैभव गांधी, पराग शहा, ब्रिजेश गांधी यांच्यासह संपूर्ण गांधी परिवार उपस्थित होता. तसेच वालचंद शिक्षण समूहातील सर्व प्राचार्य, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचाही उत्स्फूर्त सहभाग लाभला.

| १२ एप्रिलपर्यंत अध्यात्माचा महोत्सव | |
|---|---|
| ७ व ८ एप्रिल | घटयात्रा, अभिषेक, शांतीधारा, 'भक्तामर स्तोत्र' व 'श्री महावीर विधान'. |
| ९ एप्रिल | रोजी 'विश्व नवकार मंत्र दिवस' निमित्त सकल जैन समाजाच्या वतीने सामूहिक णमोकार मंत्र जप. |
| १०, ११ एप्रिल | विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्व विकास, नैतिक मूल्ये आणि एकाग्रता वाढविण्यावर आधारित विशेष कार्यशाळा. |
| १२ एप्रिल | शिक्षण आणि संस्कार यांचा समन्वय कसा साधाण्यासाठी शिक्षक व कर्मचारीसाठी मार्गदर्शनपर सत्र. |

# अध्यापिका विद्यालयाचा 'सीटीईटी' परीक्षेत डंका; ३१ विद्यार्थिनींचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ६ एप्रिल-**

येथील अध्यापिका विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षेत उत्तुंग यश संपादन करून विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. सीबीएसई बोर्डाच्या वतीने ७ व ८ फेब्रुवारी रोजी देशभरात घेण्यात आलेल्या या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, यात विद्यालयाच्या आजी व माजी अशा ३१ विद्यार्थिनींनी यश मिळवले आहे.

यामध्ये रूपाली माळी, प्रीती भाकरे, प्रियांका सुरवसे, स्वप्नाली धावारे, गौरी घोलप, मोनिका पाटील, राधिका बदाले, तेजश्री तरटे, पायल ठोंगे, सायली घाणेगावकर, भाग्यश्री पाटील, मंगल चव्हाण, सोनाली जाधव, समृद्धी पैलवान, अर्चना काटे, सायली ताले, जान्हवी डोंबाळे, अश्विनी बोराडे आणि संध्याकिरण गवळी या विद्यार्थिनींनी यश संपादन केले. विशेष म्हणजे, यातील ८ विद्यार्थिनींनी पिअर असतानाच हे यश मिळवले आहे. यशस्वी विद्यार्थिनींचे संस्थेच्या चेअरमन प्रभा झाडबुके, खजिनदार व स्कूल कमिटी चेअरमन वर्षा ठोंबरे, प्राचार्य जीवन लोखंडे व सर्व शिक्षकवृंदांनी अभिनंदन केले.

**नोकरी सांभाळून माजी विद्यार्थिनींची बाजी**

अध्यापिका विद्यालयाच्या अनेक माजी विद्यार्थिनी सध्या विविध शाळांवर शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. अध्यापनाची जबाबदारी सांभाळत त्यांनी या परीक्षेची तयारी केली व त्या उत्तीर्ण झाल्या. यामध्ये सोनाली जगदाळे, उमा घोरपडे, अंजली देबडवार, निलोफर मुजावर, प्रतिभा गायकवाड, वर्षाराणी शेळके, सारिका राऊत, दैवशाला कांबळे, पुनम जाधव, बानू गायकवाड, उज्वला पंधारे आणि जयश्री गोरे यांचा समावेश आहे.

**नियोजनबद्ध मार्गदर्शन**

विद्यार्थिनींच्या या यशामागे विद्यालयाचे नियोजनबद्ध मार्गदर्शन आहे. सीटीईटी परीक्षेसाठी प्राचार्य जीवन लोखंडे (हिंदी), प्रा. सुभाष माळी (मानसशास्त्र), प्रा. सोमनाथ देंडे (परिसर अभ्यास), प्रा. रतिकांत हामणे (मराठी) व डॉ. प्रमोद मांडे (गणित) यांनी विषयनिहाय अध्यापन केले. तसेच सराव परीक्षा आणि टीईटी, सीटीईटी उत्तीर्ण विद्यार्थिनींच्या व्याख्यानांच्या आयोजनामुळे विद्यार्थिनींचा आत्मविश्वास दुणावला.

# स्मार्ट गव्हर्नन्स हॅकाथॉनमधील अंतिम संघांच्या प्रकल्पांचे सादरीकरण

**१६ एप्रिलला अंतिम प्रकल्पांचे प्रदर्शन, पारितोषिक वितरण समारंभ | महानगरपालिकेच्या सहकार्याने सामवेद उपक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठ सोलापूर येथे सोलापूर महानगरपालिकेच्या सहकार्याने SMVED २०२६ या स्मार्ट गव्हर्नन्स हॅकाथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये निवडलेल्या २५ अंतिम संघांना १५ एप्रिल २०२६ रोजी एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठात अंतिम सादरीकरणासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. तसेच १६ एप्रिल २०२६ रोजी अंतिम प्रकल्पांचे प्रदर्शन व पारितोषिक वितरण समारंभ एमआयटी विद्यापीठाच्या परिसरात आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती महापालिका महापालिका आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी दिली.



एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठ, सोलापूर येथे सोलापूर महानगरपालिकेच्या सहकार्याने सामवेद २०२६ या स्मार्ट गव्हर्नन्स हॅकाथॉनचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात उच्च शिक्षण संस्था, महाविद्यालये आणि विद्यापीठांमधील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला आहे. या उपक्रमाअंतर्गत सोलापूर महानगरपालिकेकडून पाच महत्त्वाच्या पाणीपुरवठा, रस्ते, सॅनिटायझेशन , आरोग्य निर्देशांक या पाच नागरी समस्या विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आल्या असून, त्यावर हे आहे तंत्रज्ञाच्या आधाराने नाविन्यपूर्ण आणि व्यवहार्य उपाय शोधण्यात येत आहेत.

या हॅकाथॉनला देशातील १० राज्यांमधून एकूण ५४६ विद्यार्थी संघांनी नोंदणी केली, त्यापैकी ५०७ संघांनी आपले आयडिया सादर केले. या कल्पनांचे मूल्यांकन शैक्षणिक व औद्योगिक तज्ज्ञांकडून करण्यात आले. मूल्यांकनानंतर ७५ संघांची पुढील टप्प्यासाठी निवड करण्यात आली, ज्यांना आपले उपाय प्रोटोटाइप स्वरूपात विकसित करण्याची संधी देण्यात आली. प्री-फायनल मूल्यांकन टप्प्यात २५ संघांची निवड करण्यात आली, ज्यामध्ये उपायांची गुणवत्ता आणि व्यवहार्यता लक्षात घेण्यात आली. या टप्प्यात शैक्षणिक, औद्योगिक तज्ज्ञ तसेच सोलापूर महानगरपालिकेचे अधिकारी सहभागी होते. आवश्यकतेनुसार या प्रकल्पाची अंमलबजावणी शहरात करण्यात येणार आहे. या निवडलेल्या २५ अंतिम संघांना १५ एप्रिल २०२६ रोजी एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठात अंतिम सादरीकरणासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. तर गुरुवार दिनांक १६ एप्रिल २०२६ रोजी अंतिम प्रकल्पांचे प्रदर्शन व पारितोषिक वितरण समारंभ विद्यापीठाच्या परिसरात होणार आहे. या कार्यक्रमासाठी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच प्रा. अच्युत गोडबोले, प्रा. कृष्णा वेदुला, प्रा. विल्यम ओक्स, कार्यकारी अध्यक्षा प्रा. स्वाती चाटे कराड, कुलगुरू प्रा. गोपाळकृष्ण जोशी आणि महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे आदींसह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. पत्रकार परिषदेस महापालिका उपायुक्त आशिष लोकरे, एमआयटीचे डॉ. दर्शन रुईकर, डॉ. आनंद शिंपी आदी उपस्थित होते.

# गुप्तचर संघटनेचा प्रमुख हल्ल्यात ठार

## अमेरिका-इस्रायलने घेतला अचूक वेध; २५ जणांचा मृत्यू

**◆ तेहरान, ६ एप्रिल**

इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सच्या गुप्तचर संघटनेचे प्रमुख माजिद खादेमी यांचा मृत्यू झाल्याच्या वृत्ताला इराणच्या सरकारी माध्यमांनी सोमवारी दुजोरा दिला. सोमवारी पहाटे झालेल्या हल्ल्यात माजिद खादेमी ठार झाले. गुन्हेगारी दहशतवादी हल्ल्याचा हा परिणाम असल्याचे आयआरजीसीने म्हटले आहे. अमेरिका आणि इस्रायलने माजिद खादेमी यांचा अचूक वेध घेतला. या दोन्ही देशांनी केलेल्या हल्ल्यांत २५ जणांचा मृत्यू झाला आहे.

माजिद खादेमी यांच्या हत्येसाठी अमेरिका आणि यहुदी शासन असलेला शत्रू जबाबदार असल्याची संतप्त प्रतिक्रिया आयआरजीसीने व्यक्त केली. मात्र, हा हल्ला नेमका कुठे झाला, याची माहिती समोर आलेली नाही. सोमवारी सकाळी अलेल्या माध्यमांच्या वृत्तांनुसार इस्रायल आणि अमेरिकेने तेहरान व त्याच्या जवळपासच्या परिसरातील लक्ष्यांवर जोरदार हल्ले केले.

इस्रायल आणि अमेरिकेने सोमवारी हल्ल्यांची एक मालिका घडवून आणली. यात इराणमध्ये २५ पेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाल्याचे इराणच्या सरकारी माध्यमांनी म्हटले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा उघडण्यासाठी दिलेली मुदत जवळ येताना इराणने इस्रायल आणि आखाती देशांवर क्षेपणास्त्र हल्ला करून प्रत्युत्तर दिले.

तेहरानमध्ये रात्रीच्या वेळी स्फोटांचे आवाज घुमले आणि राजधानीवर जोरदार मारा होत असताना कमी उंचावरून उडणाऱ्या लढाऊ विमानांचा आवाज कित्येक तास ऐकू येत होता. एका हवाई हल्ल्यात 'शरीफ युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी'च्या आवाराला लक्ष्य करण्यात आल्यानंतर शहराच्या आझादी चौकाजवळून दाट काळा धूर वर उठला.

हैफा येथील एका निवासी इमारतीच्या ढिगाऱ्याखाली दोन व्यक्तींचे मृतदेह आढळले, अशी माहिती इस्रायलच्या अधिकाऱ्यांनी दिली. सोमवारी पहाटे उत्तर इस्रायलमधील या शहरावर इराणने पुन्हा क्षेपणास्त्र हल्ले चढवले असतानाही आणखी दोन व्यक्तींचा शोध घेण्याचे काम मात्र सुरूच होते. (वृत्तसंस्था)

### कोण होते माजिद खादेमी?



ब्रिगेडियर जनरल माजिद खादेमी इराणचे सर्वांत शक्तिशाली सुरक्षा अधिकाऱ्यांपैकी एक होते. जून २०२२ मध्ये त्यांना आयआरजीसीच्या गुप्तचर संरक्षण संस्थेच्या प्रमुखपदी नियक्त करण्यात आले होते. २०२५ पर्यंत त्यांनी मोहम्मद काजेमीची जागा घेत गुप्तचर संघटनेचे प्रमुखपद सांभाळले.

### माजिद खादेमीची कारकीर्द

- खादेमी यांना १९ जून २०२५ रोजी गुप्तचर प्रमुख म्हणून नियुक्त केले होते.
- यापूर्वी त्यांनी संरक्षण संघटनेचे नेतृत्व केले. ही संघटना देशात लपलेल्या हेरांचा शोध घेणे आणि देशात नजर ठेवण्याचे काम करते.
- २०१८-२०२२ या काळात त्यांनी इराणच्या संरक्षण मंत्रालयात माहिती संरक्षण संघटनेचे नेतृत्व केले होते.





आसामच्या बारपेटा जिल्ह्यात आयोजित प्रचारसभेला संबोधित करण्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले

# पाकिस्तानच्या तालावर नाचते आहे काँग्रेस : नरेंद्र मोदी

**◆ भाबनीपूर-सोरभोग, ६ एप्रिल**

एकीकडे भाजपाच्या नेतृत्वातील राओला सरकारने पाकिस्तानातील दहशतवादी छावण्यांवर 'ऑपरेशन सिंदूर' राबवले असताना, दुसरीकडे काँग्रेस मात्र शेजारील देशाच्या तालावर नाचत आहे, असा घणाघात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी केला.

विकासाच्या आघाडीवर काँग्रेसने नेहमीच संकुचित दृष्टिकोन स्वीकारला आहे, असा आरोप करताना, भाजपा देशाचा दीर्घकालीन विकास सुनिश्चित करण्याच्या दिशेने कार्यरत आहे, असे नरेंद्र मोदी यांनी सांगितले. भ्रष्टाचार करता येईल, यासाठी काँग्रेसने नेहमीच अल्पकालीन उपाययोजना केल्या. मात्र, समाजातील सर्व घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी निर्णय घेताना भाजपा दूरचा विचार करतो, असे मोदी म्हणाले.

काँग्रेस नेहमीच पाकिस्तानच्या तालावर नाचते, असे मोदी यांनी आसामच्या बारपेटा जिल्ह्यात आयोजित प्रचारसभेला संबोधित करताना सांगितले. या पाकिस्तान संबंधांमुळे देशाच्या सुरक्षेशी तडजोड होते आणि आम्ही हे कदापि खपवून घेणार नाही, असे ते म्हणाले.

'वन रँक, वन पेन्शन' योजना लागू करण्यास नकार देऊन काँग्रेसने लष्कराची उपेक्षा केल्याचा आरोपही त्यांनी केला. मात्र, देशाचे रक्षण करणाऱ्यांना न्याय मिळेल याची खात्री भाजपाने केली, असे मोदी यांनी या सभेत सांगितले. अनेक बलिदानांनंतर आणि मागील १० वर्षांत स्वाक्षऱ्या करण्यात आलेल्या विविध शांतता करारांची अंमलबजावणी करण्यासाठी भाजपाने केलेल्या प्रामाणिक प्रयत्नांमुळे आसाममध्ये शांतता प्रस्थापित झाली.

राज्यात शांतता आणि स्थिरतेमुळे भाजपाच्या राजवटीत विकास साध्य झाला, हे सातत्य कायम ठेवण्यासाठी काँग्रेसला सत्तेबाहेर ठेवणे आवश्यक आहे, असे नरेंद्र मोदी म्हणाले. संसदेत महिलांसाठीचे ३३ टक्के आरक्षण २०२९ च्या सार्वत्रिक निवडणुकांपासून लागू केले जाईल. आसाममधील महिलांनी या उद्देशाने तयार करण्यात आलेले विधेयक मंजूर होईल, याची खात्री करण्यासाठी सर्व राजकीय पक्षांकडे आग्रह धरावा, असे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

# अमित जोगी यांना जन्मठेपेची शिक्षा

## राकाँ नेत्याच्या हत्येप्रकरणी उच्च न्यायालयाचा निर्णय

**◆ रायपूर, ६ एप्रिल**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रामावतार जग्गी यांच्या हत्या प्रकरणात छत्तीसगड उच्च न्यायालयाने माजी मुख्यमंत्री अजित जोगी यांचे पुत्र अमित जोगी यांना सोमवारी जन्मठेपेची शिक्षा ठोठावली.



हा आदेश २ एप्रिल रोजीचा असून, त्यावेळी मुख्य न्यायाधीश रमेश सिन्हा आणि न्या. अरविंद कुमार यांच्या खंडपीठाने २००७ मध्ये कनिष्ठ न्यायालयाने अमित जोगी यांची केलेली निर्दोष मुक्तता रद्द केली होती. न्यायालयाच्या आदेशाची प्रत सोमवारी संकेतस्थळावर टाकण्यात आली.

अमित जोगी याची निर्दोष मुक्तता करणारा, कनिष्ठ न्यायालयाने दिलेला निकाल हा स्पष्टपण बेकायदेशीर, चुकीचा, विकृत, अभिलेखावर उपलब्ध असलेल्या पुराव्यांशी विसंगत आणि कोणत्याही ठोस आधाराविना आहे, असे आमचे स्पष्ट मत असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. अमित जोगी यांच्या निर्दोष मुक्ततेशी संबंधित कनिष्ठ न्यायालयाने ३१ मे २००७ रोजी दिलेला निकाल असमर्थनीय असल्याने तो रद्द करण्यात येत आहे, असे उच्च न्यायालयाच्या आदेशात नमूद करण्यात आले आहे.

अमित जोगी यास भादंविच्या कलम ३०२ अन्वये शिक्षापात्र गुन्ह्यासाठी दोषी ठरवून शिक्षा सुनावण्यात आली असून, त्यास जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली आहे, असे उच्च न्यायालयाच्या आदेशात नमूद करण्यात आले आहे. न्यायालयाने त्याला हजार रुपये दंड ठोठावला आणि दंड न भरल्यास सहा महिन्यांची अतिरिक्त शिक्षा भोगावी लागेल, असे सांगितले. (वृत्तसंस्था)

### अजित जोगी मुख्यमंत्री असताना झाली होती हत्या

अजित जोगी छत्तीसगडचे मुख्यमंत्री असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जग्गी यांची ४ जून २००३ रोजी हत्या करण्यात आली होती. या प्रकरणाचा तपास सुरुवातीला राज्य पोलिसांनी केला. नंतर हे प्रकरण सीबीआयकडे सोपवण्यात आले. तपास यंत्रणेने अमित जोगी यांच्यासह इतर आरोपींच्या विरोधात आरोपपत्र दाखल केले होते.

# सोळंकीच्या मृतदेहाची डीएनए चाचणी

**◆ मुंबई, ६ एप्रिल**

१ मार्च रोजी ओमानच्या किनाऱ्याजवळ एका टँकरवर झालेल्या कथित क्षेपणास्त्र हल्ल्यात मृत्यू झालेल्या कांदिवली येथील खलाशी दीक्षित सोळंकी यांचे अवशेष शारजाहहून मुंबईत आणण्यात आले.

डीएनए चाचणीतून ओळख निश्चित होईपर्यंत त्यांच्या कुटुंबीयांनी अंत्यसंस्कार करण्यास नकार दिला. सोमवारी, कुटुंबीयांच्या वकिलांनी मुंबई उच्च न्यायालयात डीएनए चाचणीसाठी याचिका दाखल केली. त्यांनी सरकारला प्रकरण कलिना न्यायवैद्यक प्रयोगशाळेकडे पाठवण्याची विनंती केली. अवशेष जळालेले असून कोणताही पूर्ण मृतदेह सापडलेला नाही, असे वकिलांनी सांगितले. जहाजावर केवळ दीक्षित सोळंकीच मृत्युमुखी पडले होते आणि त्याची ओळख निश्चित केली आहे, असे नौवहन मंत्रालयाने सांगितले. मृतदेह मालवाहू विमानाने मुंबईत आणण्यात आला असल्याचे एका अधिकाऱ्याने पुष्टी केली. दीक्षितांच्या निधनाला एक महिना उलटल्यावर त्यांच्या वडील अमृतलाल आणि बहीण मिताली यांनी मुंबई उच्च न्यायालयात मृतदेह तात्काळ मायदेशी पाठवण्याची मागणी केली होती. याचिकेनंतर तीन दिवसांतच शवपेटी मुंबईत पोहोचली. रविवारी सकाळी सहार पोलिसांकडून मंजुरी प्रमाणपत्र मिळाल्यानंतर अमृतलाल यांनी मृतदेह स्वीकारला. (वृत्तसंस्था)



गुजरातमधील पंचमहाल जिल्ह्यातील हालो-पावागड रस्त्यावर असलेल्या भंगार गोडावूनला भीषण आग लागली. आगीने आजूबाजूच्या घरांनाही कवेत घेतले. आग विझविण्यासाठी कित्येक तास लागले

# मणिपूरमध्ये दोन बंडखोरांना अटक

**◆ इम्फाळ, ६ एप्रिल**

मणिपूरमधील दोन जिल्ह्यांतून वेगवेगळ्या प्रतिबंधित संघटनांशी संबंधित दोन बंडखोरांना अटक करण्यात आली आहे. सुरक्षा दलांनी दिल्ली पोलिसांच्या मदतीने शनिवारी भारत-म्यानमार सीमेजवळील तेंगनौपाल जिल्ह्यातील यांगौबुंग गावाच्या परिसरातून थोकचोम इंगोचा सिंग आणि थोकचोम रघुनाथ मेईतेई या दोन बंडखोरांना अटक केली. (वृत्तसंस्था)

# तमिळनाडूमध्ये ९ पोलिसांना फाशीची शिक्षा

- ६ वर्षांपूर्वी पोलिस कोठडीत वडील-मुलाचा मृत्यू; कोविडमध्ये त्यांनी दुकान उघडल्याचा होता आरोप
- मृतांच्या कुटुंबीयांना १ कोटी ४० लाख रुपये नुकसान भरपाई देण्याचे न्यायालयाचे दोषींना आदेश

**चेन्नई, ६ एप्रिल -**

तमिळनाडूच्या मदुराई सत्र न्यायालयाने सोमवारी सथानकुलम कोठडीतील मृत्यू प्रकरणात ९ पोलिसांना फाशीची शिक्षा सुनावली. न्यायालयाने याला 'दुर्मीळातील दुर्मीळ' असे म्हटले आणि हे अत्यंत क्रूरता आणि सत्तेच्या गैरवापराचे प्रकरण असल्याचे सांगितले.



न्यायालयाने सर्व दोषींना मृतांच्या कुटुंबीयांना १ कोटी ४० लाख रुपये नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिले. हे प्रकरण २०२० सालचे आहे. सहा वर्षे सुनावणी चालली. या प्रकरणात एकूण १० आरोपी होते, त्यापैकी एकाचा कोविड दरम्यान मृत्यू झाला. खरे तर, १९ जून २०२० रोजी पोलिसांनी मोबाईल व्यावसायिक पी. जयराज (५९) आणि त्यांचा मुलगा जे. बेनिक्स (३१) यांना ताब्यात घेतले होते. त्यांनी लॉकडाऊन दरम्यान दुकान उघडे ठेवले होते, असा आरोप होता. दोघांना सथानकुलम पोलिस ठाण्यात नेण्यात आले. तेथून त्यांना न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले, जिथे काही दिवसांतच त्यांचा मृत्यू झाला. कुटुंबीयांनी आरोप केला की, दोघांनाही पोलिस ठाण्यात रात्रभर मारहाण करण्यात आली. त्यांच्या शरीरावर गंभीर जखमा आणि रक्तस्त्रावाच्या खुणा होत्या.

मद्रास उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, राज्याच्या सीबी-सीआयडीकडून सीबीआयकडे तपास सोपवण्यात आला होता. एजन्सीने एका इन्स्पेक्टर, दोन सब-इन्स्पेक्टर आणि इतर पोलिस कर्मचाऱ्यांसह १० आरोपींना अटक करून त्यांच्याविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला होता. चौकशीदरम्यान, एका महिला कॉन्स्टेबलने जबाब दिला की, वडील-मुलाला रात्रभर मारहाण करण्यात आली होती. पोलिस ठाण्यात टेबल आणि लाठ्यांवर रक्ताचे डाग होते. ही साक्ष या प्रकरणात महत्त्वाचा पुरावा ठरली. फर्स्ट डिशनल डिस्ट्रिक्ट अँड सेशन्स जज जी. मुथुकुमारन यांनी उइख चा युक्तिवाद मान्य केला की, दोघांनाही कोठडीत पद्धतशीरपणे छळण्यात आले. त्यामुळे त्यांना कमाल शिक्षा सुनावण्यात आली. मात्र, तपासात हेही समोर आले की, सथानकुलम पोलिस ठाण्याचे उउढत फुटेज सुरक्षित ठेवण्यात आले नव्हते. रेकॉर्डिंग दररोज आपोआप डिलीट होत असे, त्यामुळे महत्त्वाचे पुरावे मिळू शकले नाहीत.

### दोषी ठरविण्यात आलेले पोलिस

दोषी ठरवण्यात आलेल्या पोलिसांमध्ये इन्स्पेक्टर एस. श्रीधर, सब-इन्स्पेक्टर पी. रघु गणेश आणि के. बालकृष्णन, हेड कॉन्स्टेबल एस. मुरुगन आणि ए. समदुरई यांचा समावेश आहे. तसेच, कॉन्स्टेबल एम. मुथुराज, एस. चेल्लादुरई, एक्स. थॉमस फ्रान्सिस आणि एस. वेलुमुथु यांचाही समावेश आहे. या प्रकरणात १०वा आरोपी स्पेशल सब-इन्स्पेक्टर पॉलदुरई याचा खटल्यादरम्यान कोविडमुळे मृत्यू झाला होता.

# शरद पवार, ज्योती वाघमारेंसह १९ सदस्यांनी घेतली खासदारकीची शपथ

**नवी दिल्ली, ६ एप्रिल -**

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, नागपूरच्या माजी महापौर माया इवनाते यांच्यासह १९ नवनिर्वाचित सदस्यांनी आज राज्यसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. राज्यसभेत सभापती सी.पी. राधाकृष्णन यांनी नवनिर्वाचित सदस्यांना सदस्यत्वाची शपथ दिली. यावेळी उपसभापती हरिवंशनारायणसिंह, सांसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू आणि संबंधित पक्षाचे गटनेतेही यावेळी उपस्थित होते.

शपथविधीसाठी शरद पवार व्हील चेअरवरुन सभागृहात आले होते. केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी आपल्या शैलीत शपथ घेतली. शरद पवार आणि रामदास आठवले यांची राज्यसभेवर सलग तिसऱ्यांदा फेरनिवड झाली. हे दोघेही महाराष्ट्रातून निवडून आले आहेत. महाराष्ट्रातून निवडून आलेल्या नागपूरच्या माजी महापौर माया चिंतामण इवनाते यांनी सर्वात पहिल्यांदा शपथ घेतली. त्यांनी मराठीतून शपथ घेतली.



इवनाते यांच्यानंतर दुसऱ्या स्थानावर शरद पवार यांनी शपथ घेतली. भाजपाचे रामराव सखाराम वडकुटे यांनीही आज शपथ घेतली. शिवसेना एकनाथ शिंदे गटाच्या डॉ. ज्योती नागनाथ वाघमारे यांनी राज्यसभा सदस्यत्वाची शपथ घेतांना सर्वांचे लक्ष वेधून घेतले. हातात संविधानाचे पुस्तक आणि डोक्यावर पदर घेऊन वाघमारे यांनी शपथ घेतली.

महाराष्ट्रातून राज्यसभेवर एकूण सात सदस्य अविरोध विजयी झाले, यापैकी पाच जणांनी आज शपथ घेतली. भाजपाचे विनोद तावडे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे पार्थ पवार यांनी अद्याप शपथ घेतली नाही. आज शपथ घेणाऱ्या सदस्यात तामीळनाडूतील सहा, महाराष्ट्र आणि पश्चिम बंगाल प्रत्येकी पाच तर ओडिशातील तीन सदस्यांचा समावेश होता.

तामीळनाडुतून द्रुकचे तिरुची सिवा, के. रवींद्रन, काँग्रेसचे ख्रिस्टोफर मणिकम, डीएमडीकेचे एल. के. सुधीश, अण्णाद्रमुकचे के. एम. थंबीदुराई आणि पीएमकेचे अंबुणी रामदास या सहा सदस्यांनी शपथ घेतली. पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेसचे बाबुल सुप्रियो, मेनका गुरुस्वामी, राजीवकुमार आणि रुक्मिनी मलिक तसेच भाजपाच्या बिस्वजीत सिन्हा यांनी शपथ घेतली. ओडिशातून भाजपाचे के. मनमोहन सामल, बिजू जनता दलाचे संतृप्त मिश्रा आणि अपक्ष दिलीप रे यांनीही शपथ घेतली.


## अभिनेत्री सुबाषिनीने केली आत्महत्या

**◆ चेन्नई, ६ एप्रिल**

छोट्या पडद्यावरील अभिनेत्री सुबाषिनीने आत्महत्या केली. ही घटना मालिकेच्या चित्रीकरणानंतर घडली. चेन्नईतील अय्यप्पंथंगल येथील खाजगी अपार्टमेंटमध्ये राहणारी सुबाषिनी मुळची श्रीलंकेची असून, ती 'कयाल' या मालिकेत काम करत होती. तिचा पती बंगळुरूमध्ये राहतो मात्र चित्रीकरणासाठी ती अनेक वेळा घरापासून दूर राहत होती. माहितीनुसार, रात्री अभिनेत्रीने नवऱ्यासोबत व्हिडीओ कॉलवर संवाद साधला होता. यानंतर काही वेळाने तिने आत्महत्या केली. स्थानिक स्रोतांच्या माहितीनुसार, दोघांमध्ये काही कौटुंबिक वाद सुरू होते आणि या वादातूनच तिने हे टोकाचे पाऊल उचलल्याचे बोलले जात आहे. (वृत्तसंस्था)

# रजा शिल्लक असल्यास द्यावी लागेल रोख रक्कम

## कामगार संहितेच्या नवीन नियमांत तरतूद



**◆ नवी दिल्ली, ६ एप्रिल**

देशातील लाखो नोकरदार लोकांसाठी एक आनंदाची बातमी आहे. केंद्र सरकारकडून लागू करण्यात येत असलेल्या नवीन कामगार संहितेअंतर्गत कर्मचारी रजेच्या नियमांमध्ये ऐतिहासिक बदल करण्यात आले आहेत. आता कामाच्या दबावामुळे रजा चुकवणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्रास होणार नाही. नवीन नियमांनुसार, वर्षाच्या शेवटी शिल्लक राहिलेल्या कोणत्याही अतिरिक्त रजेसाठी कर्मचाऱ्यांना दरवर्षी रोख रक्कम दिली जाईल.

सध्याच्या प्रणालीनुसार, खाजगी कंपन्यांमध्ये अनेकदा वापरा किंवा गमावा धोरण असते. ज्यानुसार वर्षाच्या शेवटी कोणतीही शिल्लक रजा रद्द होते. तथापि, व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामाची परिस्थिती संहिता, २०२० अंतर्गत, आता कर्मचारी कॅलेंडर वर्षाच्या शेवटी जास्तीत जास्त ३० दिवसांची अर्जित रजा पुढील वर्षासाठी पुढे नेऊ शकेल. जर एखाद्या कर्मचाऱ्याकडे ३० दिवसांपेक्षा जास्त रजा शिल्लक असेल तर कंपनीने त्या अतिरिक्त दिवसांची रक्कम कर्मचाऱ्याच्या खात्यात जमा करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, जर वर्षाच्या शेवटी तुमच्याकडे ४५ दिवसांची रजा शिल्लक असेल, तर त्यापैकी ३० दिवस पुढच्या वर्षाच्या खात्यात जमा केले जातील आणि तुम्हाला उर्वरित १५ दिवसांचे पैसे मिळतील. (वृत्तसंस्था)

### रजेची पात्रता आणि इतर प्रमुख बदल

**१८०-दिवसांचा नियम** : पूर्वी, अर्जित रजेसाठी पात्र होण्याकरिता वर्षाला २४० दिवस काम करण्याची अट आता १८० दिवसांपर्यंत कमी करण्यात आली आहे. याचा अर्थ असा की, नवीन कर्मचारीसुद्धा लवकर रजा मिळवण्यासाठी पात्र ठरतील.

**बॉसच्या नकारापासून दिलासा** : जर एखाद्या कर्मचाऱ्याने रजेची विनंती केली आणि व्यवस्थापनाने नकार दिला तर ते दिवस ३०-दिवसांच्या मर्यादेत मोजले जाणार नाहीत. अशा परिस्थितीत, कर्मचारी ३० दिवसांपेक्षा जास्त रजा जमा करू शकेल.

**पूर्ण आणि अंतिम मोबदला** : कर्मचारी कपात किंवा नोकरी समाप्ती झाल्यास कंपन्यांना आता कर्मचाऱ्याला सर्व देय रक्कम आणि रजेची रक्कम २ कामकाजाच्या दिवसांत (४८ तासांत) देणे बंधनकारक असेल.

### हातात येणाऱ्या पगारात वाढ

नवीन कामगार संहितेमध्ये पगार या शब्दाची व्याख्या देखील बदलण्यात आली आहे, ज्यानुसार मूळ वेतन एकूण सीटीसीच्या किमान ५०% असणे आवश्यक आहे. रजा रोखीकरणाची गणना मूळ पगारावर आधारित असल्याने, रजेऐवजी मिळणारी रक्कम आता पूर्वीपेक्षा लक्षणीयरीत्या जास्त असेल. याव्यतिरिक्त, सरकारने रजा रोखीकरणावरील कर सवलतीची मर्यादा ३ लाखांवरून २५ लाखांपर्यंत वाढवली आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना थेट आर्थिक लाभ मिळणार आहे.

## अग्रलेख...

# परंपरेला पाने पुसणे

आजकाल युद्ध ही केवळ दोन देशांच्या सीमेवरची लढाई राहिलेली नाही. त्याचे परिणाम अन्य अनेक देशांना भोगावे लागतात, तेव्हा त्या देशांच्या सामाजिक, राजकीय धैर्याची, स्थैर्याची आणि एकतेची कसोटी असते. स्वातंत्र्यानंतर जेव्हाजेव्हा अशा कोणत्याही युद्धकाळास सामोरे जाण्याची वेळ भारतावर आली, तेव्हा तेव्हा भारताची परंपरा नेहमीच समन्वयाची राहिली आहे. आज मात्र जागतिक स्तरावर दाटलेले युद्धस्थितीसारखे संकट ही भारताच्या दृष्टीने अंतर्गत राजकीय संघर्षाची स्थिती वाटावी असे दिसत आहे. इराण आणि अमेरिका-इस्रायलमधील संहारक युद्धामुळे जगातील अनेक देशांचे कंबरडे मोडले आहे. अनेक देशांचे अर्थकारण लयास गेले आहे आणि ऊर्जा सुरक्षिततेचे गंभीर संकट अनेक देशांवर लादले गेले आहे. अशा परिस्थितीचे चटके भारतातही कमी-अधिक प्रमाणात अपरिहार्य आहेत, पण तरीही, भारताने या परिस्थितीस सामोरे जाताना स्वीकारलेल्या राजनैतिक, सामाजिक आणि परराष्ट्र धोरणविषयक नीतीमुळे अन्य अनेक देशांच्या तुलनेत भारताची स्थिती काहीशी दिलासादायक ठरली आहे. जगातील किंवा भारताच्या शेजारचे अनेक देश या युद्धस्थितीत पुरते कोलमडून गेले आहेत; ते पाहता, स्थैर्य आणि संयमाच्या कसोटीच्या क्षणी समाज आणि राजकीय पक्षांनी ऐक्याचे दर्शन घडविण्याची लोकशाहीची परंपरा जपावयास हवी. याआधी जेव्हा अशी संकटे ओढवली, तेव्हा सत्ताधारी आणि विरोधकांनी सहकार्याच्या आणि देशहिताच्या भावनेने त्यास सामोरे जाण्यासाठी हातात हात घातले. आज या इतिहासाची आठवण करून देण्याची गरज निर्माण झाली आहे. कारण परंपरेचा विसर पडल्यास काय होते, ते आता जाणवू लागले आहे. लोकशाहीत विरोध असणे स्वाभाविक असले, तरी तो विरोध राष्ट्रहिताच्या आड येता कामा नये. जागतिक अपरिहार्यतेमुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी युद्ध करताना, देशातील राजकीय पक्षांनी राजकीय युद्ध थांबवून राष्ट्रीय सामर्थ्य बनले पाहिजे, त्यातच देशाचे खरे हित आहे, ही बाब अधोरेखित करण्याची वेळ आली आहे.

भारतासारख्या विशाल लोकशाहीत राजकीय मतभेद हे चैतन्याचे लक्षण मानले जाते. परंतु जेव्हा विषय राष्ट्रीय सुरक्षेचा आणि सीमेवरील युद्धाचा येतो, तेव्हा हे मतभेद गळून पडणे ही भारताची प्रदीर्घ परंपरा राहिली आहे. इराण-अमेरिका युद्धाच्या संदर्भातही, भारताच्या राजकीय परंपरेचा आणि सद्यःस्थितीचा आढावा घेणे अनिवार्य ठरते. १९६२ च्या भारत-चीन युद्धकाळात किंवा १९७१ च्या बांगला मुक्ती युद्धकाळात सत्ताधारी आणि विरोधकांनी एकमुखाने एक राष्ट्र, एक आवाज या सूत्राचे पालन केले. १९७१ मध्ये जेव्हा भारतीय सैन्याने शौर्य गाजवले, तेव्हा तत्कालीन विरोधी पक्षनेते अटलबिहारी वाजपेयी यांनी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे संसदेत केलेले कौतुक हे भारतीय लोकशाहीच्या सुवर्णकाळाचे उदाहरण आहे. त्यावेळी विरोधकांनी सरकारला धोरणात्मक प्रश्न विचारले, पण लष्कराच्या कर्तृत्वावर किंवा सरकारच्या हेतूवर शंका उपस्थित करून देशाला कमकुवत केले नाही. आज लष्करी कारवायांचे राजकीय भांडवल करण्याच्या किंवा त्या विजयाचे श्रेय देण्याघेण्याच्या राजकारणापायी विरोधक आणि सत्ताधाऱ्यांमध्ये राजकीय युद्धे भडकताना दिसतात. राजकीय प्रचाराच्या मंचावरून सरकारच्या विदेश नीतीविषयी सामान्य जनतेत संभ्रम पसरविणाऱ्या मोहिमा चालविणे ही एक नवी प्रवृत्ती बळावत चालली आहे.

इराण आणि अमेरिका-इस्रायल युद्धामुळे उद्भवलेली परिस्थिती चिंताजनक आहे. आधुनिक ऊर्जेच्या इतिहासात जगाने अशा प्रसंगाचा कधीही सामना केलेला नाही. जगातील २० टक्के कच्चे तेल, २० टक्के नैसर्गिक वायू आणि २० टक्के एलपीजीची वाहतूक जेथून होते, ती होर्मुझची सामुद्रधुनी विस्कळीत झाली आहे. या संघर्षाला कारणीभूत ठरण्यात भारताची कोणतीही भूमिका नसतानाही इतर अनेक देशांप्रमाणे भारतालाही याचा कमी-अधिक प्रमाणात सामना करावा लागत आहे. मात्र, अन्य अनेक देशांतील स्थिती पाहता, भारत अजूनही सुस्थितीत आहे यात शंका नाही. शेजारच्या एका देशाने सर्व शाळा काही काळाकरिता बंद केल्या, सरकारी कार्यालयांच्या कामकाजाचे दिवस कमी केले, सरकारी वाहनांच्या इंधन भत्त्यात कपात केली, कर्मचाऱ्यांना घरून काम करण्याची मुभा दिली. या देशात इतिहासातील सर्वांत मोठी इंधन दरवाढ झाली. दक्षिण-पूर्व आशियातील अनेक देशांना इंधनाचे रेशनिंग करावे लागले. हे पाहता, भारताची कच्च्या तेलाची पुरवठा स्थिती सुरक्षित आहे. विस्कळीत झालेल्या होर्मुझ सामुद्रधुनी मार्गावरून भारताला होणारा कच्च्या तेलाचा पुरवठा सुरळीत आहे. कच्च्या तेलाची अंतर्गत उत्पादनस्थितीही वाढली आहे. तेल शुद्धीकरण प्रकल्प उच्च क्षमतेनिशी कार्यरत आहेत. देशात काही ठिकाणी केवळ अफवा आणि अपप्रचारामुळे गॅस मागणी वाढून पुरवठा साखळी विस्कळीत झाली आणि मागणी-पुरवठ्याचा समन्वय साधण्याकरिता उपाययोजना कराव्या लागल्या. काळाबाजार, नफेखोरीसारख्या अपप्रवृत्ती वाढल्या, पुरवठ्यावर मर्यादा असल्याने जनतेमध्ये चिंतेचे वातावरण पसरले, पण तातडीच्या उपाययोजनांद्वारे जागतिक बाजारपेठांचा दबाव टाळण्यात सरकारला बरेचसे यश मिळाले आहे. खरे म्हणजे, ही अफवा पसरविण्याची, संभ्रम माजविण्याची किंवा राजकीय हिशेब चुकते करण्याची वेळ नाही. समाजाचा कोणताही घटक कोणत्याही राजकीय विचारधारेचा असला तरी संकटाचा सामना करताना एकोपा राखण्यात देशाचे हित सामावलेले आहे. सर्व ऊर्जायोद्ध्यांच्या, संकटाचे व्यवस्थापन करणाऱ्या यंत्रणांच्या आणि राष्ट्रीय हिताच्या पाठीशी एकत्रितपणे उभे राहण्याची ही वेळ आहे. पण विरोधी पक्षाचे जबाबदार मानले जाणारे नेते मात्र या परिस्थितीचा राजकीय फायदा उठविण्यासाठी कंबर कसून प्रचाराच्या मैदानात उतरले आहेत. देशाच्या आर्थिक आणि राजनैतिक सामर्थ्याची कसोटी पाहणाऱ्या या काळात भारताने ज्या संयमाने वाटचाल सुरू ठेवली आहे, ते पाहता भारत ही एक लवचीक जागतिक शक्ती म्हणून उभी राहत आहे. सध्याचे जागतिक संघर्ष, कोविड महामारीचे संकट किंवा हवामान बदल ही संकटे म्हणजे गेल्या दशकभरातील वाटचालींसमोरील मोठी आव्हाने होती. या सर्व धक्क्यांमधून यशस्वीपणे बाहेर पडून भारताने आपल्या अर्थकारणाचे जागतिक स्थान भक्कम केले आहे. म्हणूनच विरोधकांनी देशाच्या राजकीय परंपरेचे पालन करावयास हवे. इराण-अमेरिका संघर्षात भारतात याची गरज असताना विरोधी पक्षनेते राहुल गांधी मात्र, निवडणूक प्रचारसभांमध्ये पंतप्रधानांवर वैयक्तिक हल्ले चढवून त्यांच्या प्रतिमाहननाच्या ट्रम्पप्रणीत मोहिमेचे शिलेदार होऊ पाहात आहेत. काँग्रेसमध्ये राहुल गांधी यांच्या या भूमिकेस पाठिंबा देण्यावरून दुफळी दिसू लागली, ही बाब परंपरेच्या कसोटीस मोठा दिलासा देणारी ठरेल. कमलनाथ, शशी थरूर, आनंद शर्मा आणि मनीष तिवारी यांच्यासारख्या नेत्यांनी भारताच्या परराष्ट्र धोरणाचे कौतुक केले आहे. भारताची भूमिका परिपक्व आणि कुशल असल्याचा दाखला हे नेते देत असताना, राहुल गांधी इंधन समस्येचा बागुलबुवा उभा करून सरकारवर चुकीच्या परराष्ट्र धोरणाचा ठपका ठेवत संभ्रम पसरवू पाहात आहेत.

हे खरे आहे की आजच्या सोशल मीडियाच्या युगात माहितीचा प्रवाह कमालीचा वेगवान झाल्यामुळे अफवा आणि वास्तविकता यातील रेषा धूसर झाली आहे. एकमेकांवरील चिखलफेकीमुळे राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश अनेकदा क्षीण होतो. देशांतर्गत राजकीय पक्षांत, विशेषतः जेव्हा राजकीय ऐक्याची गरज असते, तेव्हाच सत्ताधाऱ्यांना सहकार्य करण्याऐवजी, अस्थिरतेतून सावरण्याच्या प्रयत्नांवर टीका करण्याची चढाओढ लागणे, हे लोकशाहीच्या आरोग्यासाठी घातक आहे. म्हणूनच, सरकार आणि विरोधी पक्ष यांच्यातील सुसंवाद ही आजची गरज आहे. आंतरराष्ट्रीय कारणांच्या अपरिहार्यतेमुळे उद्भवणाऱ्या परिस्थितीत राजकारण न करण्याची भारताची परंपरा आज धूसर झाली आहे. लोकशाहीत सरकारला जाब विचारणे हा विरोधकांचा हक्क आहे; मात्र राष्ट्रहिताच्या मुद्द्यावर जेव्हा राजकारण हे देशाच्या प्रतिमेपेक्षा मोठे होते, तेव्हा ती चिंतेची बाब ठरते. लोकशाहीत 'टीका' हा हक्क असला, तरी 'राष्ट्रहित' हा नेहमीच वादाच्या पलीकडचा विषय मानला गेला आहे. म्हणूनच, परंपरेची आठवण करून देण्याची गरज आहे. ▮▮

## आंतरराष्ट्रीय

# ट्रम्प यांचा क्युबावर डोळा का?

**प्रा. जयसिंग यादव**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या परराष्ट्र धोरणाकडे पाहिले असता एक स्पष्ट पॅटर्न दिसून येतो, तो म्हणजे ज्या देशांनी अमेरिकेच्या प्रभावाला आव्हान दिले किंवा तिच्या पारंपरिक प्रभाव क्षेत्रात असूनही स्वतंत्र धोरणे राबवणाऱ्या देशांवर ट्रम्प दबाव आणतात. इराण आणि व्हेनेझुएलानंतर आता क्युबाच्या संदर्भात वाढत चाललेली आक्रमक भूमिका ही याच धोरणाचा भाग मानली जात आहे. प्रश्न असा आहे की, क्युबावर लक्ष केंद्रित करण्यामागे नेमका उद्देश काय आहे आणि या सर्व प्रक्रियेत अमेरिका कोणाला शह देऊ पाहते आहे? क्युबा हा देश भौगोलिकदृष्ट्या अमेरिकेच्या अगदी जवळ असला तरी राजकीयदृष्ट्या अनेक दशकांपासून अमेरिकेच्या विरोधात उभा राहिला आहे. फिडेल कॅस्ट्रो यांच्या नेतृत्वाखालील क्रांतीनंतर क्युबाने समाजवादी मार्ग स्वीकारला आणि अमेरिकेचा वरचष्मा नाकारला. परिणामी, शीतयुद्धाच्या काळात क्युबा हा सोव्हिएत युनियनचा महत्त्वाचा सहयोगी बनला. ही ऐतिहासिक पृष्ठभूमी आजही अमेरिकेच्या धोरणांवर प्रभाव टाकताना दिसते. आजच्या घडीला क्युबा हा केवळ एक लहान देश नाही, तर अमेरिकेसाठी एक प्रतीकात्मक आणि रणनीतिक आव्हान आहे. क्युबातील विद्यमान व्यवस्थेला कमकुवत करून अमेरिकेस अनुकूल सरकार आणल्यास हा देशच नव्हे, तर संपूर्ण लॅटिन अमेरिकेत अमेरिकेचा प्रभाव पुन्हा मजबूत होऊ शकतो. कदाचित म्हणूनच आता अमेरिकेचा क्युबावर डोळा आहे.

व्हेनेझुएलाचा विचार केल्यास निकोलस मादुरो यांच्या सरकारविरोधात अमेरिकेने उघड भूमिका घेतली होती. आर्थिक निर्बंध, राजकीय दबाव आणि या देशाला आंतरराष्ट्रीय स्तरावर एकाकी करण्याचे प्रयत्न हे त्याचे स्पष्ट उदाहरण आहे. त्याचप्रमाणे इराणवरही अमेरिकेने हल्ला केला. यावरून स्पष्ट होते की, अमेरिका अशा देशांना लक्ष्य करते आहे, जे तिच्या धोरणांशी विसंगत भूमिका घेतात; मात्र या सर्व प्रक्रियेच्या मागे केवळ प्रादेशिक राजकारण नाही, तर जागतिक शक्तिसंतुलनाचाही मोठा भाग आहे. क्युबा हा रशिया आणि चीन या दोन्ही देशांसाठी एक महत्त्वाचा भागीदार ठरत आहे. आर्थिक, लष्करी आणि तांत्रिक सहकार्याच्या माध्यमातून या देशांनी क्युबामध्ये आपला प्रभाव वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे क्युबामध्ये अमेरिकेला अनुकूल सत्तांतर घडवून आणणे म्हणजे अप्रत्यक्षपणे रशिया आणि चीनच्या प्रभावाला मर्यादा घालणे होय. अमेरिकेच्या दृष्टीने पाहता ही एक व्यापक रणनीती आहे. त्यात प्रतिस्पर्धी महासत्तांना त्यांच्या प्रभाव क्षेत्रातून दूर ठेवणे आणि स्वतःचे वर्चस्व टिकवून ठेवणे हा उद्देश आहे. विशेषतः व्लादिमिर पुतिन आणि शी जिनपिंग यांच्या नेतृत्वाखाली रशिया व चीन अधिक आक्रमक आणि आत्मविश्वासपूर्ण भूमिका घेताना दिसत आहेत. अशा परिस्थितीत, अमेरिकेने लॅटिन अमेरिकेसारख्या आपल्या पारंपरिक प्रभाव क्षेत्रात कोणत्याही बाह्य शक्तीचा हस्तक्षेप सहन न करण्याचा निर्धार केला आहे. आजघडीला क्युबामध्ये सत्तांतर घडवून आणण्याचा अमेरिकेचा कोणताही



प्रयत्न स्थानिक असंतोष, आंतरराष्ट्रीय टीका आणि प्रादेशिक अस्थिरता निर्माण करू शकतो. इतिहासाकडे पाहिले असता बाह्य हस्तक्षेपामुळे अनेकदा परिस्थिती जास्त बिघडलेली दिसते. क्युबावर लक्ष केंद्रित करणे हे केवळ एका देशाविरोधातील कारवाई नाही; तर ती एक व्यापक भू-राजकीय खेळी आहे. इराण, व्हेनेझुएला आणि आता क्युबा या सर्व घटनांमधून अमेरिकेची एकच भूमिका स्पष्ट होते, ती म्हणजे आपल्या जागतिक वर्चस्वाला आव्हान देणाऱ्या शक्तींना रोखणे आणि या प्रक्रियेत रशिया आणि चीन हे निश्चितच अप्रत्यक्षपणे अमेरिकेच्या निशाण्यावर आहेत. या पृष्ठभूमीवर पुढील काळात जागतिक राजकारण अधिक ध्रुवीकरणाकडे झुकण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रश्न एवढाच आहे की या शक्तिसंघर्षात लहान देशांचे भविष्य काय असेल? नवीन वर्षाच्या सुरुवातीला कॅरिबियन प्रदेशात मोठा तणाव निर्माण झाला आहे. ट्रम्प यांच्या आदेशानुसार, अमेरिकेच्या तिन्ही सशस्त्र दलांनी एकाच वेळी व्हेनेझुएलावर मोठा हल्ला चढवला. या अचानक आणि मोठ्या हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यास व्हेनेझुएला असमर्थ ठरला. या हल्ल्यानंतरची सर्वांत धक्कादायक बातमी म्हणजे व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांच्या पत्नीला ताब्यात घेऊन अमेरिकेत नेण्यात आले. या घडामोडीमुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात भूकंप झाला. व्हेनेझुएलावरील या हल्ल्यानंतर क्युबा सर्वांत मोठ्या धोक्याचा सामना करत आहे.

खरे तर, ट्रम्प यांनी गेल्या वर्षभरात क्युबाला किमान दहा वेळा धमकी दिली आहे. ट्रम्प यांनी पुन्हा एकदा तीच भावना व्यक्त केली आहे. त्यांनी म्हटले आहे की व्हेनेझुएलानंतर क्युबाचा नंबर लागू शकतो. क्युबाचे अध्यक्ष मिगुएल डियाझ-कॅनेल यांनी देशाच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करत असल्याचा दावा करत या धमक्यांना प्रत्युत्तर दिले आहे. ट्रम्प यांचे हे वक्तव्य अशा वेळी आले आहे, जेव्हा क्युबा एका गंभीर आर्थिक संकटाशी झुंज देत आहे. व्हेनेझुएलाकडून होणारा तेलपुरवठा थांबल्याने येथे इंधनाची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. मादुरो यांच्या अटकेनंतर क्युबाचा प्रमुख ऊर्जा पुरवठा पूर्णपणे खंडित झाला आहे.

अमेरिकेचे क्युबासोबतचे वैर सुमारे ६७ वर्षे जुने आहे. १९५९ मध्ये कॅस्ट्रोने क्युबामध्ये क्रांती घडवून सत्ता काबीज केली, तेव्हा अमेरिकन कंपन्यांकडून जमिनी आणि कारखाने जप्त केले आणि सोव्हिएत युनियनशी युती केली. मात्र अमेरिका डगमगली नाही. तिने क्युबावर आर्थिक नाकेबंदी लादली. ती आजही सुरू आहे. अमेरिकेने अनेक वेळा कॅस्ट्रो यांच्या हत्येचे प्रयत्न केले; पण ते अयशस्वी ठरले. १९६२ मध्ये क्युबन क्षेपणास्त्र संकट उद्‌भवले. रशियाने क्युबामध्ये अण्वस्त्रे तैनात केली. त्यामुळे जग अणुयुद्धाच्या उंबरठ्यावर आले. तेव्हापासून अमेरिका क्युबाला साम्यवादी धोका मानत आहे. ओबामांच्या कार्यकाळात काही सुधारणा करण्याचा प्रयत्न झाला; पण ट्रम्प यांनी पुन्हा आपली कठोरता वाढवली. आता क्युबावर अमेरिकेच्या हल्ल्याचे संकट घोंगावत आहे. ट्रम्प जवळपास वर्षभरापासून क्युबाच्या मागे लागले आहेत. यासाठी अनेक कारणे दिली जात आहेत.

ट्रम्प यांचा आरोप आहे की क्युबाचे संबंध नेहमीच रशिया, चीन आणि इराणशी राहिले असून हा देश दहशतवाद्यांना पाठिंबा देत आहे. यामुळेच ट्रम्प वारंवार क्युबावर हल्ला करण्याची धमकी देत आहेत. त्याच वेळी ते जगात शांतता प्रस्थापित करणारे शांतताप्रिय अध्यक्ष असल्याचा दावाही करतात. २९ जानेवारी रोजी ट्रम्प यांनी क्युबा हा अमेरिकेसाठी एक मोठा धोका असल्याचे वर्णन करत क्युबासंबंधी एका कार्यकारी आदेशावर स्वाक्षरी केली. व्हेनेझुएला क्युबाला ऊर्जा पुरवत होता. अमेरिकेने व्हेनेझुएलावर केलेल्या कारवाईपासून क्युबा ऊर्जासंकटाचा सामना करत असून १६ मार्च रोजी वीजपुरवठा खंडित झाला. त्याचा परिणाम लाखो लोकांवर झाला. गेल्या चार महिन्यांमध्ये तीन प्रमुख वीज प्रकल्पांमध्ये हे संकट गडद झाले आहे. व्हेनेझुएलाकडून मिळणाऱ्या तेल पुरवठ्यात सुमारे ३० टक्के घट झाल्यामुळे क्युबा या संकटाचा सामना करत आहे. क्युबाची अर्थव्यवस्था सुमारे १५ टक्क्यांनी घसरली आहे. इंधन संकटाचा परिणाम वाहतूक आणि उद्योगावर होत आहे. क्युबा बऱ्याच काळापासून तेलाच्या बदल्यात डॉक्टर आणि वैद्यकीय मदत पाठवत आला आहे; परंतु आता हे संतुलन बिघडले आहे. व्हेनेझुएलावरील हल्ला आणि क्युबाबाबतच्या त्याच्या आक्रमक भूमिकेमुळे संपूर्ण लॅटिन अमेरिकेत अस्थिरता वाढली आहे. आंतरराष्ट्रीय समुदायाला ताजा तणाव एका मोठ्या लष्करी संघर्षात बदलू शकतो, अशी चिंता वाटत आहे. व्हेनेझुएलानंतर क्युबाविरुद्ध संभाव्य कारवाईच्या संकेतांनी जागतिक राजकारणात नवीन तणाव निर्माण केला आहे. येत्या काही दिवसांमध्ये अमेरिकेची रणनीती आणि क्युबाची प्रतिक्रिया या संकटाची दिशा ठरवेल. ▮▮

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# विनाशाच्या उंबरठ्यावर असलेला पाकिस्तान

आजपर्यंत भारतासोबत केलेल्या सर्वच युद्धांमध्ये पाकिस्तानने सपाटून मार खाल्ला आहे. ऑपरेशन सिंदूरमध्ये तर भारताने पाकिस्तानात घुसून निर्धारित लक्ष्याचे अवघ्या काही मिनिटामध्ये चिथडे उडविले. एकदा मार खाऊनही बेशरम पाकिस्तानची खुमखुमी अजूनही जिरली नाही. पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी सियालकोट येथे कोलकाता शहरावर दिलेल्या हल्ल्याच्या धमकीने संपूर्ण जगाचे लक्ष वेधले गेले असून, नापाक पाकिस्तानच्या अंताचा तर हा अध्याय नाही ना अशी शंका येऊ लागली आहे. ऑपरेशन सिंदूरने पाकिस्तानी नेत्यांची झोप उडाली होती. हे ऑपरेशन थांबविण्यासाठी त्यांनी अमेरिकेपुढे लोटांगण घातले होते. हे उघड सत्य असून, जगालाही माहीत आहे. त्यामुळे पाकिस्तानने यापुढे कोणतीही केलेली आगळिक त्यांच्या विनाशाचे कारण ठरू शकते. पाकिस्तानी नेते जुन्या भारताची स्वप्नं बघून जर जगत असतील तर त्यांना केवढी मोठी किंमत चुकवावी लागेल, हे त्यांच्या कल्पनाशक्तीच्याही पलिकडे असेल.

संपूर्ण जगामध्ये दहशतवादाचे माहेरघर असलेला पाकिस्तान आज आपल्याच कर्मफळाच्या भोगाने सर्वच आघाड्यांवर मार खात आहे. जगामध्ये भीक मागून देश चालविण्याची पाळी पाकिस्तानवर आली आहे. आपल्या जनतेला दिवसाकाठी एकवेळचे पोटभर अन्न देण्याचीही क्षमता या देशाची राहिली नाही. अमेरिका आणि इराणच्या युद्धानंतर तर पाकिस्तानमध्ये गृहयुद्धासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. देशामध्ये सात दिवस पेट्रोल आणि डिझेल पुरेल एवढाही साठा त्यांच्याजवळ नाही. पाकिस्तानमध्ये आजमितीस पेट्रोल ४६० रुपये



लिटर आणि डिझेल ५०० रुपये लिटर विकले जात आहे. मुजोर पाकिस्तानला वठणीवर आणण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वच बाबतीत आघाडी घेतली आहे. काँग्रेसने या देशामध्ये आणलेली स्वाभिमानशून्यता पूर्णतः पुसून नरेंद्र मोदी यांनी या देशाची खरी ओळख जगाला करून दिली. त्यामुळे पाकिस्तान आज कितीही फुशारकी मारत असला तरी आतून तो भयभीत झाला आहे. नरेंद्र मोदी यांच्या केवळ नावानेही पाकिस्तानी नेत्यांच्या अंगामध्ये कापरे भरत असले तर त्याचे नवल वाटायला नको. नेमक्या याच भीतीने पाकिस्तानची त्रेधातिरपीट उडाली आहे. नव्या शक्तिशाली भारतापुढे पाकिस्तानने आयुष्यभर पोसलेल्या दहशतवानेही नांग्या टाकल्या आहेत. त्यामुळे पाकिस्तानी नेते ख्वाजा आसिफ सारखी बेताल वक्तव्ये करून संपूर्ण जगामध्ये आपले हसे करून घेत आहेत. पाकिस्तानने जो मार्ग स्वीकारला आहे, त्या मार्गावर भविष्यामध्ये पाकिस्तानचा अंत निश्चित आहे.

मुळात पाकिस्तानचा जन्मच द्वेषापायी झाला आहे. त्यामुळे हा द्वेषाग्नी त्यास भस्म केल्याविना शांत बसणार नाही. खरं तर पाकिस्तान भारताशी कोणत्याही क्षेत्रामध्ये बरोबरी करू शकत नाही. याची जाणीव पाकिस्तानलाही आहे. तरीही पाकिस्तान सुधरत नसेल तर दोष कोणाला द्यायचा. नरेंद्र मोदी २०१४ मध्ये पंतप्रधान झाल्यावर त्यांनी पाकिस्तानला सुधारण्याची अनेकदा संधी दिली. स्वतःहून प्रयत्नही केले. परंतु, पाकिस्तानला ती भाषा कळली नाही. 'लातों के भूत बातों से नहीं मानते' हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ओळखल्यावर पाकिस्तान मात्र, मोदी यांना ओळखण्यास कमी पडला. काँग्रेसने देशाची फाळणी केली. नेहरूंनी काहीही कारण नसताना काश्मीरचा प्रश्न युनोमध्ये नेऊन तो चिघळत ठेवला. काँग्रेसची अकार्यक्षमता आणि मताच्या राजकारणापायी पाकिस्तानला बळ मिळत गेले. काँग्रेसच्या या धोरणामुळे आपल्या देशामधील लाखो निरपराध नागरिक पाकिस्तानी दहशतवादाला बळी पडले. परंतु, एखाद्या राष्ट्रभक्ताच्या हाती देशाची सत्ता गेल्यावर त्या राष्ट्राचा सन्मान आणि राष्ट्राभिमान कसा जागृत होतो, याचे उदाहरण पंतप्रधान नरेंद्र मोदीमध्ये बघावयास मिळते. अग्नी ५ या मिसाईलमुळे संपूर्ण पाकिस्तान भारताच्या टप्प्यामध्ये आला आहे. सात हजार किमीवर जाऊन अचूक मारा करणारे हे क्षेपणास्त्र पाकिस्तानचे कोणतेही शहर क्षणात उद्ध्वस्त करू शकते. नरेंद्र मोदी यांनी तिन्ही दलांचे आधुनिकीकरण करून शस्त्रसज्ज केले आहे. ऑपरेशन सिंदूर भारत सरकारने समाप्त न करतात ते थांबविले आहे. पाकिस्तानने भारताविरुद्ध फक्त एक कृती केली तर ऑपरेशन सिंदूरचा दुसरा भाग त्या देशाचे नामोनिशान मिटविण्याएवढे शक्तिशाली असेल. पाकिस्तानने ही वेळ भारतावर आणू नये, हीच इच्छा आहे. ▮▮

९८८१७१७८५६

## इतस्ततः

# उद्योजकतेचा उत्साहवर्धक प्रवास

**दत्तात्रेय आंबुलकर**

गेल्या सुमारे दोन दशकांत भारतीय उद्योग-व्यवसायाच्या प्रगतिशील प्रवासात लघुउद्योग क्षेत्रातील स्टार्टअपमधील नव्या व नावीन्यपूर्ण उद्योगांनी आपली विशेष छाप सोडली असून, देश-विदेश स्तरावर त्यांच्या कार्य-कर्तबगारीची नोंद घेण्यात आली आहे. व्यावसायिक संदर्भात या नव्या स्टार्टअप उद्योग व उद्योजकांनी कधी स्वतःचा लघुउद्योग सुरू करायचा, म्हणजे सर्वच संदर्भात मोठी जोखीम समजली जायची. मात्र, या प्रस्थापित विचारधारणेवर आपली कल्पक प्रेरणा व अथक प्रयत्नशीलतेसह या नवउद्योजकांनी यशस्वीपणे मात केली आहे, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे.

गेल्या २० वर्षांतील या प्रगतिशील परिस्थितीमध्ये बऱ्याच खाचखळग्यांसह विविध टप्पे आढळून येतात. अगदी सुरुवातीला कुणी व विशेषतः युवावस्थेत स्वतःचा नवा व छोटेखानी व्यवसाय सुरू करायचे ठरविल्यास, त्याला प्रेरित-प्रोत्साहित करणाऱ्यांपेक्षा परावृत्त करण्याचेच प्रयत्न होत असत. आज हे चित्र बऱ्याच अंशी बदललेले दिसते. यामागे स्टार्टअपसह लघुउद्योग आणि उद्योजकांनी व्यावसायिक जिद्द, कल्पक क्षमता, कौशल्य व सातत्य यांसह केलेले प्रयत्न महत्त्वाचे ठरले. स्टार्टअप क्षेत्रातील एका पिढीला हे सारे करून स्वतःला सिद्ध करावे लागले. भारतातील लघुउद्योग क्षेत्रातील हे परिवर्तन तसे सहजसाध्य नव्हते. लघुउद्योग क्षेत्रातील अपयशातून शिकून या अपयशी अनुभवानंतर सातत्याने व नव्या उमेदीसह उत्साहाने प्रयत्न करून उल्लेखनीय यश प्राप्त करणाऱ्या लघुउद्योजकांनी आपला आदर्श प्रस्तुत करून ठसा उमटविण्याची उदाहरणे आपल्याकडे दिसून येतात, हे विशेष.

यासंदर्भात 'इन मोबी'चे संस्थापक नवीन तिवारी यांचे उदाहरण नमूद करता येईल. त्यांनी स्टार्टअप स्वरूपात सुरू केलेले चार लघुउद्योग अपयशी ठरले. मात्र, त्यांनी आपल्या जिद्दीसह केलेले प्रयत्न सोडले नाहीत. नवी उमेद व कल्पनांसह प्रयोगशील उद्योजकता केवळ जोपासलीच नाही, तर त्याला प्रयत्नपूर्वक सातत्याची जोड दिली. याचाच परिणाम म्हणजे नवीन तिवारी आज केवळ आघाडीचे व यशस्वी लघु-उद्योजकच ठरले नाहीत, तर त्यांनी मिळविलेल्या यशापोटी आज त्यांच्या व्यवसायाला देशातील पहिला 'युनिकॉर्न' होण्याचा बहुमान मिळाला आहे, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे.

यासंदर्भात उपलब्ध आकडेवारीनुसार, भारतातील जवळजवळ निम्म्या म्हणजेच ४९ टक्के 'युनिकॉर्न' उद्योजकांना आपल्या यशाचा टप्पा गाठण्यासाठी वारंवार प्रयत्न करावे लागले. यामध्ये आपल्या आधीचे प्रयत्न वा त्याला मिळालेले अपयश यामुळे खचून न जाता, या उद्योजकांनी आपले प्रयत्न सुरू करून यशस्वी 'युनिकॉर्न' होण्याचे आपले यश साध्य केले आहे. यामागे त्यांचे सातत्य व कल्पक प्रयत्न ही महत्त्वाची कारणे ठरली. आधीचे वा सुरुवातीच्या टप्प्यातील अपयश आल्याने खचून न जाता, पुन्हा नव्याने व जिद्दीने प्रयत्न करणाऱ्या यशस्वी स्टार्टअप-'युनिकॉर्न' श्रेणीतील उद्योजकांमध्ये 'फिनटेक स्टार्टअप'पैकी 'फ्रीचार्ज-युनिकॉर्न'च्या कुणाल शाह यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. अशाप्रकारे आधी अपेक्षित यश न मिळविणाऱ्या व नंतर 'युनिकॉर्न' स्तराची झेप घेणाऱ्या यशस्वी लघुउद्योजकांची संख्या सध्या ४०हून अधिक आहे. नव्या स्टार्टअप लघुउद्योजकांना अशाप्रकारे बळ मिळण्यामध्ये आर्थिक पाठबळाची मोठी व महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. स्टार्टअपच्या या प्रगतिशील टप्प्यात आज देशांतर्गत सुमारे पाच लाख स्टार्टअप कार्यरत आहेत. सुरुवातीच्या टप्प्यात म्हणजे २०१६ मध्ये त्यांची संख्या जेमतेम ५०० होती. यातून आजवर साध्य झालेल्या आर्थिक उलाढालीच्या संदर्भात सांगायचे म्हणजे भारतीय स्टार्टअपची २०१६ मध्ये असणारी ५.२ दशलक्ष डॉलर्सची उलाढाल २०२४ मध्ये तब्बल १२.६ दशलक्ष डॉलर्सवर जाणे, ही आर्थिक विश्लेषण कंपनीची माहिती यासंदर्भात उल्लेखनीय आहे. परंपरागत स्वरूपात पाहता, भारतीय लघुउद्योगांचा स्वाभाविक भर व्यावसायिक फायद्यावर असायचा. ही स्वाभाविक परंपरा 'एमएसएमई'सह स्टार्टअपमध्ये पण दिसून येते. याचेच प्रतिबिंब 'सेबी'सारख्या आर्थिक व्यवहार-व्यवसाय क्षेत्रातील नियामक संस्थांच्या धोरणात्मक कारभारात दिसून येते. यातूनच 'सेबी'ने कधी तोट्यात चालणाऱ्या कंपन्यांना सार्वजनिक समभाग विक्री करण्यावर निर्बंध घातले होते.

मात्र, 'सेबी'च्या ध्येय-धोरणांत २०२१ मध्ये महत्त्वपूर्ण व मोठे बदल करण्यात आले. त्यामुळे 'सेबी'द्वारा नवे तंत्रज्ञान व संशोधनासह काम करणाऱ्या कंपन्या फायद्यात नसल्या, तरी त्यांच्याकडे पुरेसे आर्थिक पाठबळ व गुंतवणूक असल्यास अशा कंपन्यांना सार्वजनिक समभाग विकण्याची परवानगी दिली. 'झोमॅटो'च्या सार्वजनिक समभाग विक्रीमुळे या नव्या पुढाकाराला प्रगत दिशा प्राप्त झाली. त्यानंतर या आणि अशा श्रेणीतील सुमारे एक डझनहून अधिक कंपन्यांनी अशाप्रकारे व यशस्वी पद्धतीने समभाग विक्री केली, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे.

याशिवाय, आर्थिक-व्यावसायिक क्षेत्रातील अद्ययावत स्वरूपात माहिती संकलन-विश्लेषण करणाऱ्या 'क्रेडिबल' या कंपनीने लघुउद्योग-स्टार्टअप क्षेत्रात केलेल्या अभ्यासानुसार, आजवर सुमारे १००हून अधिक स्टार्टअप कंपन्यांनी २०२० ते २०२५ या काळात कंपनीअंतर्गत 'ई-सॉप' पद्धती व त्याद्वारे सुमारे १.७ दशलक्ष डॉलर्सचे व्यवहार यशस्वीपणे केले आहेत. यातील 'ई-सॉप' म्हणजेच, 'एम्प्लॉई स्टॉक ओनरशिप प्लॅन' योजनेद्वारा अशा कंपन्या व कर्मचारी या उभयतांचा लक्षणीय फायदा झाला आहे.

सरकारी योजना आणि पुढाकारामुळे लघुउद्योग-स्टार्टअप क्षेत्राला नव्या दिशेसह मोठे पाठबळ लाभले आहे. विशेषतः नीती आयोगांतर्गत 'अटल इनोव्हेशन मिशन'अंतर्गत मोठ्या प्रमाणावरील कामकाज झालेले आहे. याचाच पुढचा टप्पा म्हणून 'दि यंग एंटरप्रेन्युअर्स अकादमी'च्या माध्यमातून विद्यार्थी-युवकांना उद्योजकतेसाठी प्रेरणा-प्रोत्साहन व मार्गदर्शन देण्याचे मोठे काम होत आहे. परिणामी, आज आठव्या वर्गातील विद्यार्थी रिशान सिंदवानीने उद्योजकतेला प्रोत्साहन देणाऱ्या 'ऑप्टीमाईझ साईट' या स्वतःच्या संकेतस्थळावरून स्वतःचा व वेगळा व्यवसाय विकसित केला आहे, तर बंगळुरू येथे ११व्या वर्गात शिकणाऱ्या आदित्यनने केवळ आपल्या मोबाईल फोनच्या माध्यमातून विविध व्यावसायिक संकल्पनांचा प्रसार-प्रचार करण्याच्या व्यवसायाला फायदेशीर सुरुवात केली आहे. नव्या पिढीतर्फे व नव्या स्वरूपात सुरू झालेला स्टार्टअप उद्योगांचा हा प्रवास नक्कीच उत्साहवर्धक ठरला आहे. ▮▮

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)
९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### भोंदूगिरी थांबविण्यासाठी समाज जागृती गरजेची

राज्यातील जनता नाशिकमधील खरातसारख्या बुवा, भोंदूंच्या थापांवर विश्वास ठेवून नादी लागते. त्यामुळेच भोंदूंचे पेव पसरले आहे. यातूनच कोट्यवधीची संपत्ती जमा केली जाते. ही समाजाला लागलेली कीड आहे. स्त्रिया लैंगिक अत्याचाराला भोळ्या मानसिकतेतून बळी पडतात. समाज सुधारकांनी सर्वसामान्य जनतेपर्यंत सत्य काय आणि बनवाबनवी काय आहे हे ओळखण्याची क्षमता निर्माण होण्यासाठी नियोजन पद्धतीने काम केले पाहिजे. विशेषतः स्त्रियांमध्ये जागृती निर्माण केली पाहिजे. केवळ कायदे करून त्याचा उपयोग होत नाही. अशा घटना घडल्यावर केवळ चर्चा करण्यापेक्षा विचारवंत, समाज सुधारक, कायदे पंडित, स्त्रियांच्या कैवारी, अंधश्रद्धा निर्मूलनवादी, राजकीय पक्षांची नेते मंडळींनी समाज जागृतीचे काम केले पाहिजे. समाजाकडून प्रतिसाद न मिळाल्याने अशांचे अनैतिक धंदे बंद होतील.

**ॲड. बळवंत रानडे**/पुणे. ९८८१४७३५८०

### 'पैसा नव्हे प्रेमच महत्त्वाचे!' विचारांना चालना देणारा लेख

पैसा नव्हे प्रेमच महत्त्वाचे! हा आसमंतमधील लेख विचारांना चालना देणारा आहे. आपल्या नवीन विभक्त कुटुंब पद्धतीत ज्येष्ठांचे प्रश्न उपस्थित होत आहेत हे वास्तव आहे आणि ते नाकारूनही चालणार नाही. त्यामुळेच ज्येष्ठांना अपत्यांकडून पालनपोषण भत्ता मिळावा, त्यांनी जर स्वतःचे घर मुलांच्या नावावर केले असेल व त्यांना घराबाहेर काढण्यात आले असेल तर ते घर परत घेण्याचा हक्क न्यायालयाने ज्येष्ठांना दिला आहे. असं सरसकट होत नाही पण काही प्रमाणात होतं हे मान्य करावंच लागेल. राज्यात, देशभरात वाढलेली वृद्धाश्रमांची संख्या ज्येष्ठांना नाकारले जाण्याचे प्रमाण दाखविते. काही दशकांपूर्वी आलेल्या नटसम्राट नाटकातही जेवायचं ताट द्यावं पण डोक्यावरचं छप्पर देऊ नये असे म्हटले होतेच. त्यामुळेच विजयपत सिंघानियांनी त्यांच्या अनुभवावरून काही वक्तव्य केलं असेल तर त्याचा मथितार्थ लक्षात घेणे गरजेचेच आहे. फक्त प्रेमावर जगता येत नाही त्यासाठी आर्थिक बळ लागते व ते प्रत्येकाने वृद्धापकाळासाठी जपणे आवश्यक आहे.

**माया हेमंत भाटकर**/बाणेर पुणे

● ● ● ●

### विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबत जागृती महत्त्वाची...

विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबत जागृती ही एक आवश्यक गरज आहे. स्वच्छता फक्त शरीराचीच नाही, तर मनाची देखील शुद्धता आहे. स्वच्छतेची सवय विद्यार्थ्यांमध्ये विकसित झाल्यास त्यांचे आरोग्य चांगले राहते, रोगराई टाळता येते आणि समाजात सकारात्मक बदल घडतो. त्यामुळे शाळांमध्ये, घरात आणि परिसरात स्वच्छतेबाबत जागृती निर्माण करणे खूप गरजेचे आहे. स्वच्छतेबाबत जागृतीसाठी विद्यार्थ्यांना फक्त शिकवणे पुरेसे नाही, तर त्यांना प्रत्यक्ष कृतीतून स्वच्छतेचे महत्त्व समजावून सांगणे आवश्यक आहे. स्वच्छतेसाठी नियमित स्वच्छता उपक्रम राबवावेत, स्वच्छता मोहिमा चालवाव्यात, स्वच्छतेचे फळ कसे आरोग्यासाठी उपयुक्त आहे हे विद्यार्थ्यांना समजावून सांगावे. फक्त बोलणे आणि लिहिण्यापेक्षा कृती महत्त्वाची आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना स्वच्छतेची सवय लावणे आणि त्यांना जागरूक करणे हीच खरी गरज आहे. विद्यार्थी हे देशाचे भावी नागरिक असतात. त्यांच्यात योग्य सवयी रुजवणे अत्यंत आवश्यक आहे.

समाजाच्या प्रगतीसाठी आणि निरोगी जीवनासाठी स्वच्छतेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासून स्वच्छतेच्या सवयी निर्माण झाल्या, तर त्याचा सकारात्मक परिणाम संपूर्ण समाजावर होतो. स्वच्छतेच्या सवयी रुजवणे अत्यंत आवश्यक आहे. शाळा हे केवळ शिक्षणाचे केंद्र नसून चांगल्या सवयी घडवण्याचे ठिकाण आहे. स्वच्छता पाळल्यामुळे अनेक आजारांपासून बचाव करता येतो. हात धुणे, स्वच्छ कपडे घालणे, परिसर स्वच्छ ठेवणे यांसारख्या सवयी विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनात असणे गरजेचे आहे. कचरा योग्य ठिकाणी टाकणे अशा सवयी लहानपणापासूनच लावल्या पाहिजेत. विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबत जागृती केल्यास त्यांचे आरोग्य सुधारते आणि चांगल्या सवयी विकसित होतात. शाळा आणि शिक्षक यांची भूमिका यात अत्यंत महत्त्वाची आहे. यामुळे केवळ वैयक्तिकच नव्हे तर सामाजिक आरोग्यही टिकून राहते. स्वच्छता ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचे महत्त्व ओळखून ते आपल्या जीवनात अंगीकारले पाहिजे. स्वच्छ विद्यार्थी, स्वच्छ शाळा आणि स्वच्छ समाज हे ध्येय साध्य करण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. ▮▮

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# चोरीस गेलेले ९ लाखांचे दागिने हस्तगत

## एक महिला जेरबंद; पंढरपूर शहर पोलिसांची कामगिरी




**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.६ एप्रिल-**

येथील बसस्थानका वरुन महिलेच्या पर्स मधील चोरीस गेलेले सुमारे ९ लाख रुपये किंमतीचे दागिने शहर पोलीसांनी हस्तगत करून दमदार कामगिरी केली. या चोरी प्रकरणी पोलीसांनी एका महिलेस जेरबंद केले आहे.

या कारवाई बाबत पोलीसांनी दिलेली माहिती अशी की, येथील शहर पोलीस ठाण्यात गु. र. नं. १३०/२०२६ भारतीय न्याय संहिता-२०२३ चे कलम ३०३ (२) प्रमाणे दाखल गुन्हयातील फिर्यादी सुषमा दत्तात्रय पाटील( वय. ४४ वर्षे, रा. देगाव ता. पंढरपूर जि. सोलापूर) यांचे १७ मार्च २०२६ पंढरपूर बस स्थानकावर पर्समधील सोन्याचे दागिने अज्ञात चोरटयाने चोरले होते.

त्यानंतर सदर गुन्हयाचा तपास चालू असता सदर गुन्हयाचे तपासकामी पथके तयार करून पंढरपूर व सोलापूर शहरातील एकुण ६२ सी.सी. टी. व्ही फुटेज चेक करून व मोबाईल टॉवर, सी. डी.आर चे तांत्रिक विश्लेषण करून सदर गुन्हयात महिला आरोपी आयेशा युसुफ शेख (वय. ३६ वर्षे, रा. शाहजाहूर दर्गा समोर, १०६ रेहमतबी झोपडपटटी, सिध्देश्वर पेठ, सोलापूर जि. सोलापूर) हिने सदरचा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने तिचा रायचूर कर्नाटक येथे जावुन शोध घेवुन तिला कर्नाटक येथुन ताब्यात घेवुन तिच्याकडे नमुद गुन्हयातील चोरीस गेलेल्या सोन्याचे दागिन्याबाबत तपास केला असता तिने नमुद गुन्हयातील सोन्याचे दागिने एक ४५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठन, एक १२ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन असे एकुण ६ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने अंदाजे ९,००,०००/- रुपये किंमतीचे तिच्याकडुन जप्त करून सदर गुन्हयातील महिला आरोपी हीस अटक करून सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

सदरची कामगीरी ही पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितमकुमार यावलकर, सहा. पोलीस अधीक्षक, पंढरपूर विभाग प्रशांत डगळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे, पंढरपूर शहर पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक नितीन जगताप, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक राजेश गोसावी, सपोफौ शरद कदम, पोह/३९८ सिरमा गोडसे, पोह/१७८९ सचिन हेंबाडे, पोह/१३०७ सोमनाथ पाटील, पोना/५६३ साहिल तांबोळी, पोना/५४६ कृष्णा पकाले, पोकॉ/१२१६ शहाजी मंडले, पोकॉ/१३०४ दिपक नवले, पोकॉ/१५१३ बजरंग बिचुकले, पोकॉ/१२४० हर्षद ठाकर तसेच सायबर शाखा सोलापुर ग्रामीण चे पोशि ११८२ रतन जाधव यांनी केली .

# वीज वितरण अभियंत्याची मोटर सायकल चोरट्याने पळविली

## मंगळवेढ्यात घरसमोर लावली होती गाडी; अज्ञात चोरटयाविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृतसेवा**
**मंगळवेढा दि.६ एप्रिल -**

वीज वितरण कंपनीत सहाय्यक अभियंता म्हणून कार्यरत असलेल्या शरद पाटील यांनी भाड्याच्या घरासमोर लावलेली ४५ हजार रुपये किंमतीची होंडा कंपनीची शाईन मोटर सायकल चोरट्याने चोरुन नेण्याचा प्रकार घडला असून या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुध्द पोलीसात गुन्हा नोंद झाला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी शरद पाटील हे रुक्मिणी माता नगर येथे प्रविण दिक्षीत यांच्या घरी भाड्याने रहावयास असून दि.११ जानेवारी २०१८ रोजी हिरो होंडा कंपनी शाईन मोटर सायकल विकत घेतली होती. दि.१ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजता मोटर सायकल क्रमांक एम.एच.१० सी.वाय.५२५० ही भाड्याने राहत असलेल्या घराच्या समोर लावून ते कार मधून त्यांच्या शिरढोण येथे मुळ गावी गेले होते.

सुट्टी संपल्यानंतर फिर्यादी हे दि.६ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता परत भाड्याने राहत असलेल्या ठिकाणी आल्यावर त्यांना सदरची मोटर सायकल लावलेल्या ठिकाणी दिसून आली नाही. याबाबत घर मालक यांना विचारले असता त्यांनीही माहित नसल्याबाबत सांगीतल्याने फिर्यादीला खात्री पटली की,चोरट्याने मोटर सायकल चोरुन नेली असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

**IDFC FIRST Bank Limited**
**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

### वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, त्यांचे कर्ज आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) यांना देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 122311932 | मालमत्तेवर कर्ज | 1. विशाल गोवर्धन माने 2. गोवर्धन शाहू माने | 14/03/2026 | INR 5,95,573.72/- |

**मालमत्तेचा पत्ता:** ग्रामपंचायत मिल्कट क्रमांक ५६७/२ मधील सर्व तुकडा आणि पार्सल ज्याचे एकूण मोजमाप क्षेत्र ९९६ चौ.फूट आहे. दिव सोलापूर येथे स्थित, उप विभाग उत्तर सोलापूर ग्रामपंचायत वडाळा च्या मर्यादित, वडाळा जवळ, सोलापूर, महाराष्ट्र - ४१३२२२. आणि सीमा: उत्तर: नागनाथ शा. माने, दक्षिण: अंबादास घाडगे, पूर्व: बळीराम व्ही साठे, पश्चिम: ग्रामपंचायत रोड ग्रामपंचायत मिल्कट क्रमांक ५६७/२ मधील सर्व तुकडा आणि पार्सल ज्याचे एकूण मोजमाप क्षेत्र ९९६ चौ.फूट आहे. दिव सोलापूर येथे स्थित, उप विभाग उत्तर सोलापूर ग्रामपंचायत वडाळा च्या मर्यादित, वडाळा जवळ, सोलापूर, महाराष्ट्र - ४१३२२२. आणि सीमा: उत्तर: नागनाथ शा. माने, दक्षिण: अंबादास घाडगे, पूर्व: बळीराम व्ही साठे, पश्चिम: ग्रामपंचायत रोड.

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, खाली स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीला आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे देय रक्कम वसूल करण्यासाठी वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेडम्हणून ओळखले जाते)**

**दिनांक : 07/04/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

**IDFC FIRST Bank Limited**
**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

### वित्तीय मालमत्तेचे सुरक्षाकरण आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा हितसंबंध कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, त्यांचे कर्ज आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) यांना देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 108815729 | मालमत्तेवर कर्ज | 1. शिवराज सुरेश यमदे 2. महानंदा सुरेश यमदे | 03/03/2026 | INR 9,63,063.59/- |

**मालमत्तेचा पत्ता:** ग्रामपंचायत मिलकट क्र. ५६१ ची संपूर्ण जागा, क्षेत्रफळ १०८९ चौ. फूट, मौजे: बेलाती, ग्रामपंचायत बेलाती हद्दीत, तालुका: उत्तर सोलापूर, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-४१३००२, आणि सीमा: पूर्व: शेत, पश्चिम: रस्ता, उत्तर: शेत, दक्षिण: शेत.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 82430395 | घरासाठी लोन | 1. सुदर्शन शंकर क्षिरसागर 2. शंकर नागनाथ क्षिरसागर | 26/02/2026 | INR 16,16,135.34/- |

**मालमत्तेचा पत्ता :** सीटीएस क्रमांक ९२६२ असलेली ती संपूर्ण मालमत्ता, जिचे एकूण क्षेत्रफळ ३२४ चौ. फूट (३०.११ चौ. मीटर) आहे, जी जोधभावी पेठ येथे, सोलापूर शहर महानगरपालिका परिषदेच्या हद्दीत, उपविभाग: उत्तर सोलापूर, विभाग: सोलापूर येथे स्थित आहे आणि जिच्या सीमा खालीलप्रमाणे आहेत: पूर्व: सीटीएस क्रमांक ९२६१ मधील संगीता गर्जेचा परिसर पश्चिम: सीटीएस क्रमांक ९२६२ मधील राजशेखर पंचक्षरीचा परिसर उत्तर: रस्ता दक्षिण: रस्ता

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 3 | 145647619 | मालमत्तेवर कर्ज | 1. यल्लप्पा ज्ञानेश्वर कामाठी 2. संगिता यल्लप्पा कामाठी | 18/03/2026 | INR 5,20,024.36/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिल्कट क्र. १५ चा सर्व तुकडा आणि पार्सल, एकूण २००० चौ. फूट., मौजे येथे स्थित: आंदेवाडी खुर्द, ग्रामपंचायतीच्या हद्दीत: आंदेवाडी खुर्द, तालुका: अक्कलकोट, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-४१३२१६, आणि सीमा: पूर्व: रस्ता पश्चिम: खाजाप्पा हबीब शेख उत्तर: रस्ता दक्षिण: चंद्रकांत विठ्ठल कामाठी

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 4 | 106571334 | मालमत्तेवर कर्ज | 1. वैजिनाथ शिवानंद काळे 2. मिनाक्षी शिवानंद काळे 3. शिवानंद धोडप्पा काळे | 18/03/2026 | INR 4,97,211.08/- |

**मालमत्तेचा पत्ता:** ग्रामपंचायत मिळकत क्रमांक २०६/२ चा सर्व तुकडा आणि पार्सल, एकूण ६५० चौ. फूट. (१३५० फूट), मौजे येथे वसलेले: सुलतानपूर, ग्रामपंचायतीच्या हद्दीत: सुलतानपूर, तालुका: अक्कलकोट, जिल्हा: पुणे, महाराष्ट्र-४१३२२६, आणि सीमा: पूर्व: सिद्धराम काळे पश्चिम: स्वामीनाथ धोंडाप्पा काळे उत्तर: रस्ता दक्षिण: निलाबाई शिवलिंग बिराजदार

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेडम्हणून ओळखले जाते)**

**दिनांक : 07/04/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील व आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णनः (अ) डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे वैराग हद्दीतील खुल्या बिनशेती प्लॉट जागेचा तपशील पुढील प्रमाणेः गट नं.३८३/१ प्लॉट नं. १ क क्षेत्रफळ १.१७.०६ आरचौमी. (११७.०६ चौ.मी.) आकार ११ रु.७० पैसे यासी चतुः सिमा पुर्वेस - नगरपंचायत रस्ता, पश्चिमेस - प्लॉट नं. १ ब ची जागा, दक्षिणेस - प्लॉट नं. २ क ची जागा व उत्तरेस - ४ फूट बोळ, (ब) गट नं.३८३/१ प्लॉट नं. २ क क्षेत्रफळ २.७८.७३ आरचौमी. (२७८.७३ चौ.मी.) आकार २७ रु.८० पैसे याची यासी चतुःसिमाः पुर्वेस - नगरपंचायत रस्ता, पश्चिमेस - प्लॉट नं. २ ब ची जागा, दक्षिणेस - प्लॉट नं. ३ क ची जागा व उत्तरेस - प्लॉट नं.१ क पैकी, येणेप्रमाणे चतुः सिमापुर्वक दोन्ही खुल्या प्लॉटजागा आतील सर्व झाडझुडूपे वगैरे सर्व तद्ंगभुत वस्तुसह, कंपाऊंडसह व वहिवाटीचे हक्कासह.

उपरोक्त वर्णन केलेल्या दोन्ही मिळकती या सौ. पुष्पा रेवणसिध्द कोरे यांच्या स्वतंत्रखरेदी मालकी व कब्जेवहिवाटीची होती व आहे. विद्यमान मालकांनी सदरची प्लॉटजागा त्यांचे प्रांपचिक अडचणीसाठी व मुलांच्या शिक्षणासाठी विक्रीस काढलेली आहे व आमचे अशिलाबरोबर विक्री करणेकामी दि. ०१/०४/२०२६ रोजी नोटरी इसारपावती केलेली आहे. सदर प्लॉटजागा मिळकत निर्वेध, निजोखमी, बिनबोजाची खरेदी देण्याची ग्वाही व भरवसा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलास दिलेला आहे.

तरी वर नमुद प्लॉटजागेवरती कोणाचा हक्क अधिकार, हितसंबंध असल्यास सदर प्लॉट जागेसंदर्भात कोणी साठेखत, खरेदीखत, गहाणखत, बँक बोजा, वाटणीपत्र, मृत्यूपत्र, कोर्ट केसेस, बँक केसेस किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त केला असल्यास किंवा सदर प्लॉटजागेवर कोणाचा बोजा हक्क, हितसंबंध असल्यास तसेच मोजणी संबंधी काही तक्रारी, हरकती असल्यास काही वाद असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात हरकत खालील पत्यावर कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर प्लॉटजागा ही निर्वेध निजोखमी, बिनबोजाची आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही खरेदी पुर्व जाहीर नोटीस दिली असे.

ता. ०६/०४/२०२६

**सही/-**
**संकेत शशिकांत लकशेट्टी**
ॲडव्होकेट
अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय,
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
अशिलातर्फे ॲडव्होकेट

**भा.कृ.अनु.प.- राष्ट्रीय अनार अनुसंधान केन्द्र, सोलापूर**
**ICAR - National Research Centre on Pomegranate**
(Indian Council of Agricultural Research)
NH-65, Solapur-Pune Highway, Kegaon, Solapur-413 255 (M.S.)
T-(0217) 2354330, 2350074, 2350263,F-(0217) 2353533
E mail- nropomegranate@gmail.com, Website- nrcpomegranate.icar.gov.in
**(ISO 9001:2015 Certified Institute)**

## WALK-IN-INTERVIEW

A Walk in interview will be held on **28.04.2026 11:00 AM** at ICAR-National Research Centre on Pomegranate, Kegaon, Solapur for engagement of worker under time bound project on contractual basis at a consolidated remuneration.

| Sl. No. | Name of the Project | Name of Post | Number of Posts |
|---|---|---|---|
| 1. | Establishment and Management of the Field Gene Bank (FGB) for maintenance of plant varieties registered under the Protection of Plant Varieties and Farmers Rights Act 2001 | Field Assistant | 01 |

For more details of posts, application form, essential and desirable qualifications, Job requirements and the terms and conditions please visit our website: nrcpomegranate.icar.gov.in.

**Sd/-**
**DIRECTOR**

## Classifieds

**विकणे आहे**

**दुकान गाळा विक्री / भाड्याने देणे आहे. २२० स्क्वेअर फूट, निर्मिती लँडमार्क इंदिरा नगर, पोस्ट ऑफिसजवळ, रामलिंग नगर, विजापूर रोड, संपर्क - ९४२०५४४६४४**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

## जाहीरनामा

**उमरगा येथील सौ.जी.पी. बनकर, सह दिवाणी न्यायाधीश क स्तर उमरगा**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २३७/२०२६** — **विष्णु वि. निरंक निशानी क्र. ७**

ज्याअर्थी अर्जदार **विष्णु शिवाजी मुगळे, वय ३८ वर्ष, रा. मळगीवाडी ता. उमरगा, जि. धाराशिव**, हा.मु. तुरोरी ता. उमरगा, जि. धाराशिव यांनी त्याचे मयत चुलत अजोबा **कै. तुळशीराम हाणमा मुगळे,** मयताचे मृत्यु समयीचे ठिकाण मळगीवाडी ता. उमरगा, जि. धाराशिव, हे **दिनांक** ०१/०१/१९८७ रोजी मयत झाले असुन त्यांचे इतर वारस **१.** अनिता शिवाजी मुगळे, वय ६५ वर्ष **२.** महेश शिवाजी मुगळे, वय ४५ वर्ष, **३.** नितीन शिवाजी मुगळे, वय ३२ वर्षे, **४.** मनिषा सुरज गायकवाड, वय २६ वर्ष, यांना मयत **कै. तुळशीराम हाणमा मुगळे,** यांच्या मृत्यू पश्चात शासकीय व निमशासकीय कार्यालयीन कामकाजाकरीता वारसा प्रमाणपत्राची मागणी अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार मयताचे वारसदार असल्याबाबत आक्षेप असल्यास या जाहिरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की जर सदर मुदतीत कोणी योग्य त्या हरकती दाखल न केल्यास अर्जदाराच्या वारसा प्रमाणपत्र मिळाल्याच्या मागणीबद्दल पुरावा घेवुन त्याची **कै. तुळशीराम हाणमा मुगळे,** यांचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र हे न्यायालय वरील अर्जदाराना देईल.

**दिनांक** ०६/०४/२०२६
**पुढील तारीख** ०८/०५/२०२६

**स्वाक्षरित/-** **कनिष्ठ लिपीक** — **स्वाक्षरित/-** **सहा.अधिक्षक**

**सह दिवाणी न्यायालय, क. स्तर उमरगा**

## नगर परिषद तुळजापूर

### जाहीर ई- निविदा सूचना

जा.क्र-नपतु/बा.वि/ई-निविदा/२०२६/८१४ — दि.०६/०४/२०२६

### जाहीर ई-निविदा प्रसिद्धीकरण

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० कार्यक्रम अंतर्गत "Construction & Commissioning of Sanitary Landfill, Leachate Tank and other work as per BOQ for Municipal Solid waste Managment Work at Tuljapur Municipal Council under swachh Bharat Mission (Urban 2.0)" या प्रस्तावित कामास जाहीर प्रसिद्धीकरण करून ई प्रणालीद्वारे निविदा मागविण्यात येत आहे.

तरी इच्छुकांनी आपली ई-निविदा ऑनलाईन पद्धतीने दि. ०७/०४/२०२६ ते दि.१४/०४/२०२६ रोजी दु.०५:०० वा पर्यंत या विहित कालावधीत सादर करावीत. प्राप्त व पात्र निविदांचाच विचार केला जाईल. सदरील कामा बाबतीत इतर अटी व शर्ती https://mahatenders.gov.in या पोर्टलवर पहावयास मिळतील.

ई-मेल :-. tuljapurmc@gmail.com

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद तुळजापूर**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन :- डि. व सब डि. सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर शहर महानगर पालिका हद्दवाढ भागातील कसबे सोलापूर येथील जुना सर्व्हे नं. १८७/१ अ यासी नविन सर्व्हे नं. १७८/१ अ यापैकी कलावती नगर म्हणून ओळखले जाणारे येथील प्लॉट नं. १७१ याचे क्षेत्र ६०० चौ. फुट अथवा ५५.७६ चौ. मीटर इतकी आहे.

यासी चतुःसीमा :-
पुर्वेस :-रस्ता — दक्षिणेस : प्लॉट नं. १७२
पश्चिमेस : प्लॉट नं. १६० व १५९ — उत्तरेस :-प्लॉट नं. १७०

येणेप्रमाणे चतुःसीमेतील प्लॉट जागा त्यातील तदंगभुत वस्तूंसह, मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्कासह.

ही प्लॉट जागा लक्ष्मीबाई बालाजी ताटी, रा.१७१/१७२, कलावती नगर, सोलापूर यांचे मालकीची असून त्यांचेकडून ही प्लॉट जागा आमचे अशिल खरेदीने घेणार आहेत. तरीही या प्लॉट जागेवर कोणाचाही कसलाही गहाण, दान, बक्षिस, इसारा पावती, साठेखत, खरेदीखत, वारसा, पोटगी, टाच, बोजा, जप्ती, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, हितसंबंध वा वाद असल्यास, त्यांनी खालील नमूद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचेही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसल्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध नसल्याचे समजून अथवा त्यांनी तो जाणीवपुर्वक स्वेच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशिल लवकरच खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे.

दि. ०६/०४/२०२६

**सही/-**
**ॲड. राजरतन द. श्रीराम**
ऑ. १६२८, कुचन नगर, सोलापूर-५
मो.नं. ९८८१२४०५१६

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः शहर बार्शी व ता बार्शी, जि. सोलापूर येथील आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते कि, मिळकतीचे वर्णन डि. सोलापूर, सब. डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी बिनशेती प्लॉट याचा तपशीलः- **गट नंबर ५३७/२ यामधील बिनशेती प्लॉट नंबर २३ याचे क्षेत्रफळ ३२९.३५ चौ.मी. चे चौ. फुट ३५४३.८०६ आहे. याचा बिनशेती आकार रु. २१७.०० पैसे आहे.** याची मोजमापे :- पूर्व बाजू - मीटर १५.५०, दक्षिण बाजू - मीटर २५.००, पश्चिम बाजू - मीटर १६.८० व उत्तर बाजू - मीटर १८.४० आहे असा संपूर्ण खुला बिनशेती प्लॉट. याची चतुः सिमा पुर्वेस - प्लॉट नंबर २४, दक्षिणेस - डि. पी. रस्ता, पश्चिमेस - रस्ता व उत्तरेस - स. नं. पैकी प्लॉट नं. २१ व २२ आहे, सदर प्लॉटची पाणी व वागणुक दक्षिण व पश्चिम बाजूच्या रस्त्याने जाते व आहे. येणेप्रमाणे चतुः सिमा पूर्वक प्लॉट आतिल दगड, माती वगैरे सर्व तद्ंगभुत वस्तुसह.

सदर बिनशेती प्लॉट श्री सचिन मधुकर वाळूजकर यांच्या खरेदी मालकीचा असून ७/१२ हक्कपत्रकी त्यांच्या नावाची नोंद असून सदर बिनशेती प्लॉट प्रत्यक्ष कब्जे वाहिवाटीस आहे. सदरची बिनशेती प्लॉट ते विक्री करू इच्छितात, सदर बिनशेती प्लॉट विक्री निघाले बाबत आमचे अशिलास समजलेने आमच्या अशिलाने योग्य ती किंमत देऊ केलेने बिनशेती प्लॉट यांनी सदरचा बिनशेती प्लॉट विक्री करणेबाबतचा करार आमच्या अशीलाशी केला. त्या व्यवहारापोटी आमच्या अशिलाकडून साक्षीदारासमक्ष इसार रक्कम स्वीकारली आहे, व खरेदीखत करून देण्याचा व्यवहार आमच्या अशील बरोबर ठरविला आहे.

सदर बिनशेती प्लॉटवर कोणाचेही कसलेही हक्क, हितसंबंध, लीज, दान, गहाण, टाच, बोजा, अशाप्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०७ दिवसाचे आत अशिलातर्फे वकिल यांना खाली दिलेल्या पत्त्यावरती प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबित करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील कोणाची कसलीही हरकत नाही असे गृहीत धरून बिनशेती प्लॉट बिनबोजाचा, क्लिअर टायटल आहे असे गृहीत धरून सदर बिनशेती प्लॉट खरेदी करतील. खरेदीनंतर कोणाची कसलेही हरकत आलेस आमचे अशीलाच्या हक्कावर व अधिकारावर ती बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये या करिता खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. दि. ०६/०४/२०२६.

**सही/-**
**ॲड. अमरदिप राजीव क्षीरसागर**
ऑफिस पत्ता :- गाळा नं. २७, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉम्प्लेक्स सुलाखे हायस्कूल रोड, बार्शी. रा. बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर. (अशिला तर्फे ॲडव्होकेट)

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः डि धाराशिव सब डि व तालुका बार्शी पैकी मौजे म्हसोबाचीवाडी हद्दीतील व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की.

मिळकतीचे वर्णन :- डि धाराशिव सब डि व तालुका बार्शी पैकी मौजे म्हसोबाचीवाडी हद्दीतील अ) ग्रामपंचायत मिळकत नंबरसर्व्हे नंबर १९१ याचे क्षेत्र ४५७.०० चौ. फुट यांसी चतुःसिमा पुर्वेस-ग्रामपंचायत रोड, दक्षिणेस- नानासाहेब कात्रे यांची मिळकत, पश्चिमेस - रामभाऊ गायकवाड यांची मिळकत व उत्तरेस - रामदास कात्रे यांची मिळकत येणेप्रमाणे वर्णनाची खुली घरजागा ही सोनाली नानासाहेब कात्रे यांचे मालकीची असून सदरची जागा हक्कपत्रकी त्यांचे नांवे नोंद आहे. ब) ग्रामपंचायत मिळकत नंबरसर्व्हे नंबर १९२ याचे क्षेत्र ४५७.०० चौ. फुट यांसी चतुः सिमा पुर्वेस - ग्रामपंचायत रोड, दक्षिणेस - लक्ष्मण कात्रे यांची मिळकत, पश्चिमेस - रामभाऊ गायकवाड यांची मिळकत व उत्तरेस - ग्रामपंचायत रोड येणे प्रमाणे वर्णनाची खुली घरजागा ही नानासाहेब रामदास कात्रे यांचे मालकीची असून सदरची जागा हक्कपत्रकी त्यांचे नांवे नोंद आहे. वरील दोन्ही मिळकती बाबत सोनाली नानासाहेब कात्रे व नानासाहेब रामदास कात्रे यांचे हक्कात दिनांक २३/०२/२०२६ रोजी नोंदणकृत बक्षीसपत्र कलेले असून सदरचे दस्त बार्शी येथील दुय्यम निबंधक कार्यालयात अनुसंची दोन मध्ये अनुक्रमांक २६१/२०२६ व २६२/२०२६ वर नोंदलेले आहे. सोनाली नानासाहेब कात्रे व नानासाहेब रामदास कात्रे हे सदरच्या मिळकती बँकेस तारण देऊन त्यावर कर्ज घेऊ इच्छितात. तरी सदर मिळकतीवर कोणाचेही कसलेही हक्क हितसंबंध. उदा. गहाण, दान, लीज. लीन. पोटगी, चोळी, बांगडी, टाच, बोजा, अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आमचे वकिलांना वर दिलेल्या पत्त्यावर प्रत्यक्ष भेटुन कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबीत करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील हे. सदर मिळकतीशी कोणाचाही. कसलाही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही व असल्यास त्याने तो स्वखुशीने सोडून दिलेला आहे, असे समजून सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे, असे समजून सदरची मिळकत आमची पक्षकार बँक तारण घेऊन कर्ज रक्कम वितरीत करेल. कोणची कसलीही हरकत आल्यास ती आमचे अशिलांच्या हक्काधिकारांवर बंधनकारक राहणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये, म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. कळावे.

दिनांक ०६/०४/२०२६

**सही/-**
**ॲड. प्रवीण परशुराम करंजकर पाटील**
ॲडव्होकेट
प्लॉट, कर्मवीर नगर, बार्शी
मो. नं. ९८२२०६५६६१

## जाहीर प्रसिध्दीकरण

नि.नं. ६
दिवाणी किरकोळ अर्ज नं. १३/२०२६

**अक्कलकोट येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात**

**१) मलम्मा बंदप्पा उर्फ मुतण्णा कबाडे**
वय ७४ वर्षे, धंदा : घरकाम,
रा.४१७, शुक्रवार पेठ, सोलापूर.
**२) शिवचलप्पा बंदप्पा उर्फ मुतण्णा कबाडे** **-- अर्जदार**
वय ३९ वर्षे, धंदाः मजूरी,
**३) शिवलिंगप्पा बंदप्पा उर्फ मुतण्णा कबाडे**
वय-३५ वर्षे, धंदाः मजूरी,
४) **सुजाता सायबण्णा शहापूर**
वय-३६ वर्षे, धंदाः घरकाम,
सर्व रा.मु.पो. दुधनी, ता. अक्कलकोट,
जि.सोलापूर,

**विरुध्द**

कोणी नाही **-- सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार नं.१ चे पती असून अर्जदार नं.२ ते ४ यांचे वडिल मयत बंदप्पा गंगाराम कबाडे हे दिनांक १३/०५/२०१२ रोजी राहत्या घरी मु.पो. दुधनी, ता.अक्कलकोट, जि. सोलापूर येथे मयत झालेले आहे. अर्जदार नं.१ चे पती असून अर्जदार नं.२ ते ४ यांचे वडिल मयत बंदप्पा गंगाराम कबाडे यांच्या नावे डिस्ट्रीक्ट सब डिस्ट्रीक्ट सोलापूर तालुका अक्कलकोट मौजे दुधनी येथील बिनशेती प्लॉट जागा यांसी गट नंबर ६ यापैकी बिनशेती प्लॉट नं.१६ यांसी एकूण क्षेत्रफळ १.४०.०० आर.चौ.मी. यांसी आकार १५४.०० रु. पै. इतके असून यातील अर्जदार नं. १ ते ४ हे त्यांचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदार नं.१ ते ४ यांच्या नांवावर वर्ग होवून मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरचा दाखला सदर अर्जदारांसाठी अर्जदार नं. १ ते ४ याच्या नांवे देण्यास कोणाची कांही हरकत असल्यास, संबंधितानी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आंत अगर पुढील नेमल्या तारखेस या न्यायालयात स्वतः अगर अधिकृत एजंटामार्फत हजर होवून कागदोपत्री पुराव्यानिशी आपले म्हणणे मांडावे. सदर मुदतीत कोणाची कांही हरकत न आल्यास, या प्रकरणी पुढील हुकूम केले जातील. तद्नंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार चालणार नाही.

आज दिनांक ०१ माहे ४ इसवी २०२६ रोजी आमच्या सहीनिशी आणि कोर्टाच्या शिक्क्यानिशी प्रसिध्द केले.

**सही/-** **लिपिक** — शिक्का — **सही/-** **हुकुमावरुन** **सहाय्यक अधिक्षक** **दिवाणी न्यायालय क स्तर अक्कलकोट**

## सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः संगमनेर, ता. वार्शी व आसपासचे परिसरातील जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळवण्यात येते की,

डि सोलापुर सब डि ता. वाशी पैकी मौजे संगमनेर येथील जमीन गट नं. ६५ याचे क्षेत्र ११ हे ३१ आर + पो.ख. ५६ आर एकूण क्षेत्र ११ हे ८७ आर, आकार ९ रु ०० पैसे येणेप्रमाणे मिळकत आतील सर्व तद्ंगभुत वस्तुसह सदर मिळकतीचे पोटहिस्से पडलेले असून ते गट नं. ६५/१/१ क्षेत्र ०१ हे ४१ आर पो.ख. ७ आर एकूण क्षेत्र ०१ हे ४८ आर आकार १ रू. १२ पैसे, गट नं. ६५/१/२ क्षेत्र ०१ हे ४१ आर पो.ख. ७ आर एकूण क्षेत्र ०१ हे ४८ आर आकार १ रू. १२ पैसे, गट नं. ६५/१/३ क्षेत्र ०१ हे ४२ आर पो.ख. ७ आर एकूण क्षेत्र ०१ हे ४९ आर आकार १ रू. १३ पैसे, गट नं. ६५७/१/४ क्षेत्र ०१ हे ४२ आर पो.ख. ८ आर एकूण क्षेत्र ०१ हे ५० आर आकार १ रू. १३ पैसे अशा मिळकती आहेत.

येणेप्रमाणे वर वर्णन केलेली मिळकत हि आमचे अशिल ज्ञानदेव मलका जानराव, मलका सटवा जानराव, तुकाराम मलका जानराव, झुंबर मलका जानराव, विठ्ठल सटवा जानराव यानी खरेदी केलेली समाईकातील शेतजमीन आहेत. सदर जमीनीचे अद्यापपावेतो सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. त्या संदर्भात सदर जमीनीविषयी बार्शी येथील सि.ज.ज्यु.डि साहेब यांचे कोर्टात रे.मु.नं. ७७/२०२३ अन्वये दावा चालू आहे. सदर दाव्याचे कामकाज चालू असताना यातील प्रतिवादी नामे सुनिल विठ्ठल जानराव, अनिल विठ्ठल जानराव, लक्ष्मीकांत विठ्ठल जानराव, कालीदास लिंबाजी गवळी, सुरेखा भास्कर जाधव, तुकाराम मलका जानराव हे सदर जमीन विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत व तशी खात्रीशीर माहिती आमच्या अशिलास झालेली आहे. सदर प्रतिवादी यांचेशी कोणीही, कसलाही खरेदीखताचा, साठेखताचा, गहाणखत, दानपत्र, किंवा अन्य कसलाही व्यवहार करू नयेत, जर का व्यवहार केलेस, सदरचे व्यवहार हे बेकायदेशीर ठरतील व ते व्यवहार आमचे अशिलाचे हिश्यावर बंधनकारक राहणार नाहीत. तसेच जर इतर त्रयस्थ व्यक्तिनी व्यवहार केलेस त्यांची फसगत झाल्यास त्यास आमचे अशिल हे जबाबदार राहणार नाहीत. याची नोंद घ्यावी त्यामुळे सदरचे मिळकतीबाबत कोणाचीही फसगत होवू नये म्हणून व आमचे अशिलाचे हक्क, हिश्याची जाणीव करुन देण्यासाठी ही सावधानतेची जाहिर नोटीस दिली असे.

दि. ०७/०५/२०२६

**सही/-**
**ॲड. सुदर्शन उत्रेश्वर सोनवणे**
ॲडव्होकेट
जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी
मो. ९८३४५८७८२६
अशिलातर्फे ॲडव्होकेट



## महत्त्वाचे

### सात्त्विक-चिरागची आशियाई बॅडमिंटन स्पर्धेतून माघार

**नवी दिल्ली :** भारताची प्रमुख पुरुष दुहेरी जोडी सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टीने आगामी बॅडमिंटन आशिया स्पर्धेमधून माघार घेतली असून, त्यांचे प्रशिक्षक टॅन किम हर यांनी सोमवारी या वृत्ताला दुजोरा दिला. जागतिक क्रमवारीत चौथ्या क्रमांकावर असलेली ही जोडी स्पर्धेत भाग घेणार नाही, कारण रन्कीरेड्डी खांद्याच्या दुखापतीतून सावरत आहे. गत महिन्यात स्विस ओपनच्या उपांत्यपूर्व फेरीपूर्वीही या जोडीने दुखापतीमुळे माघार घेतली होती, असे कोरियन प्रशिक्षकांनी सांगितले. त्यांच्या अनुपस्थितीत, पुरुष दुहेरीमध्ये हरिहरन आमसाकरुणन आणि एम. आर. अर्जुन हेच एकमेव भारतीय खेळाडू स्पर्धेत असतील. महिला दुहेरीतील त्रिशा जॉली व गायत्री गोपीचंद या जोडीनेही स्पर्धेतून माघार घेतली आहे. तथापि, त्यांच्या अनुपस्थितीचे कारण अद्याप निश्चित झालेले नाही.

### रग्बी प्रीमियर लीग हैदराबाद येथे १६ जूनपासून

**नवी दिल्ली :** रग्बी इंडियाने सोमवारी जाहीर केले की, रग्बी प्रीमियर लीगची (आरपीएल) दुसरी आवृत्ती १६ ते २८ जून या कालावधीत हैदराबाद येथील गचीबोवली स्टेडियमवर आयोजित केली जाणार आहे. गत वर्षी मुंबईत झालेल्या पहिल्या आवृत्तीच्या यशानंतर, दुसऱ्या आवृत्तीमध्येही पहिल्या सत्रातील त्याच सहा फ्रॅन्चायझींचा समावेश असेल. याद्वारे एक उच्च-दर्जाचे व्यासपीठ कायम राखले जाईल. यात भारतातील व आंतरराष्ट्रीय स्तरावरील अव्वल खेळाडूंचा सहभाग असेल आणि चाहत्यांना रग्बीचा एक रोमांचक व कृती-संपन्न अनुभव मिळेल. हैदराबादचे एक जागतिक क्रीडा केंद्र म्हणून उदयास येणे हे तेलंगणाच्या दीर्घकालीन धोरणात्मक दृष्टीकोनाचे आणि आंतरराष्ट्रीय भागीदारीसाठी असलेल्या संस्थात्मक पाठिंब्याचे प्रतिबिंब आहे, असे तेलंगणा सरकारचे विशेष मुख्य सचिव जयेश रंजन म्हणाले.

### भारतीय महिला हॉकी संघ अर्जेंटिना दौऱ्यासाठी सज्ज

**नवी दिल्ली :** भारतीय महिला हॉकी संघ एका महत्त्वपूर्ण परदेशी मोहिमेसाठी सज्ज होत असताना, अर्जेंटिनाचे भारतातील राजदूत मारियानो कौसिनो यांनी या दौऱ्यावर जाणाऱ्या संघाला शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांनी दोन्ही देशांमधील वाढत्या क्रीडा संबंधांवरही प्रकाश टाकला. भारतीय संघातील सदस्यांनी नुकतीच नवी दिल्ली येथील अर्जेंटिनाच्या वाणिज्य दूतावास विभागात भेट दिली. अर्जेंटिनाविरुद्धच्या चार सामन्यांच्या द्विपक्षीय मालिकेसाठी रवाना होण्यापूर्वी, व्हिसाशी संबंधित औपचारिकता पूर्ण करण्यासाठी त्यांनी ही भेट दिली होती. या आठवड्याच्या अखेरीस संपूर्ण संघ आमच्या राष्ट्रीय महिला हॉकी संघाविरुद्धचे सामने खेळण्यासाठी अर्जेंटिनाला रवाना होईल. दोन्ही संघ त्यांचे सहकार्य अधिक दृढ करत असताना, त्यांचा हा दौरा अत्यंत फलदायी ठरेल अशी आम्हाला आशा आहे, असे त्यांनी म्हटले आहे. हैदराबाद येथे नुकत्याच पार पडलेल्या हॉकी महिला विश्वचषक पात्रता फेरी स्पर्धेत भारताने केलेल्या दमदार कामगिरीच्या पार्श्वभूमीवर हा दौरा होत आहे.

### शेल्टन-अँड्राडेला पहिले दुहेरीचे विजेतेपद

**ह्युस्टन :** अँड्रेस अँड्राडे व बेन शेल्टन या या पुरुष दुहेरीच्या जोडीने अमेरिकन मेन्स क्ले कोर्ट टेनिस स्पर्धेतील आपली स्वप्नवत कामगिरी पूर्णत्वास नेली. या दोघांनी उत्स्फूर्त खेळाचे प्रदर्शन करीत आपले पहिले टूर-स्तरीय विजेतेपद जिंकले.



शेल्टन-अँड्राडेने अव्वल मानांकित ब्राझिलियन जोडी- ऑरलँडो लुझ व राफेल मातोस या जोडीवर पिछाडीवरून मुसंडी मारत ४-६, ६-३, १०-६ असा विजय मिळविला. सध्या एटीपी क्रमवारीत नवव्या क्रमांकावर असलेल्या शेल्टनला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत थियागो ऑगस्टिन तिरान्तेकडून पराभव पत्करावा लागला होता; परंतु दुहेरीच्या सामन्यांमध्ये त्याने आपला लढा सुरूच ठेवला आणि आपले पहिले एटीपी टूर दुहेरी विजेतेपद पटकावले.

### सॅमसन, बुमराह पुरस्कारासाठी नामांकित

**नवी दिल्ली :** भारताचा यष्टिरक्षक-फलंदाज संजू सॅमसन, आघाडीचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह व दक्षिण आफ्रिकेचा फलंदाज कॉनर एस्टरहुइझेनला मार्च २०२६ साठीच्या पुरुष महिन्याचा सर्वोत्तम खेळाडू पुरस्कारासाठी नामांकित करण्यात आले आहे. २०२६ च्या पुरुष टी-२० विश्वचषकाची सुरुवात ज्याने संघाबाहेर बसून (राखीव खेळाडू म्हणून) केली होती, त्या सॅमसनने चेन्नईमध्ये झिम्बाब्वेविरुद्ध झालेल्या सुपर-एट्स साम न्यापासून संघात स्थान मिळाल्यावर, या स्पर्धेतील आपल्या वैयक्तिक कामगिरीचा प्रेरणादायी प्रवास घडवला.

# मुंबई पुनरागमनास, राजस्थान लय कायम राखण्यास उत्सुक

## रोहित, यशस्वी, वैभवच्या फलंदाजीकडे लक्ष



यशस्वी जयस्वाल



रोहित शर्मा

**आजचा सामना**

**राजस्थान रॉयल्स वि. मुंबई इंडियन्स**
**स्थळ :** बरसापारा क्रिकेट स्टेडियम, गुवाहाटी
**वेळ :** सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

◆ **गुवाहाटी, ६ एप्रिल**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात मंगळवारी येथील बरसापारा क्रिकेट स्टेडियमवर राजस्थान रॉयल्स व मुंबई इंडियन्स यांच्यात रोमांचक टी-२० सामना होणार आहे. एकीकडे अजिंक्य राजस्थान रॉयल्स आपल्या विजयाची लय कायम राखण्यास उत्सुक आहे, तर तिकडे पाच वेळचा विजेता मुंबई इंडियन्स पुनरागमन करण्यास उत्सुक आहे, त्यामुळे यशस्वी जयस्वाल आणि रोहित शर्मा यांसारखे स्टार खेळाडूंच्या कामगिरीवर सर्वांचे लक्ष असणार आहे.

कागदावर पाहता, राजस्थान रॉयल्स व मुंबई इंडियन्स हे दोन्ही संघ अत्यंत समतोल व तुल्यबळ वाटतात. त्यामुळे, मंगळवारी सायंकाळी गुवाहाटी येथे या दोन संघांमध्ये एक अत्यंत चुरशीचा सामना पाहायला मिळेल, अशी अपेक्षा चाहत्यांना नक्कीच करता येईल.

राजस्थान रॉयल्सने या नवीन हंगामातील आपल्या सुरुवातीच्या दोन सामन्यांमध्ये दोन विजय नोंदवले आहेत. पहिल्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्सचा दणदणीत पराभव केल्यानंतर, अहमदाबाद येथे त्यांनी गुजरात टायटन्सवर सहा धावांनी, पण अत्यंत रोमहर्षक असा विजय मिळवला. या स्पर्धेचे पहिले विजेते ठरलेल्या राजस्थान रॉयल्स संघाची फलंदाजी फळी अत्यंत मजबूत आहे; यामध्ये वैभव सूर्यवंशी व यशस्वी जयस्वाल या आक्रमक सलामी जोडीचा समावेश असून, कर्णधार रियान पराग आणि ध्रुव जुरेल हे देखील त्यांना भक्कम साथ देत आहेत. तसेच, नव्या चेंडूने केला जाणारा त्यांचा गोलंदाजीचा माराही पाहण्यासारखा आहे; यामध्ये जोफ्रा आर्चर व नांद्रे बर्गर हे दोघे मिळून गोलंदाजीची धुरा सांभाळत आहेत.

दुसरीकडे, मुंबई इंडियन्स संघाला दिल्ली कॅपिटल्सकडून नुकत्याच झालेल्या निराशाजनक पराभवाचा सामना करावा लागला आहे. हा संघ सध्या गुणतालिकेत सहाव्या स्थानावर आहे. कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध मिळवलेल्या विजयासह त्यांनी २०२६ च्या हंगामातील आपले पहिले दोन गुण कमावले आहेत. पुन्हा एकदा आपल्या भारतीय खेळाडूंच्या मुख्य गटावर कामगिरीसाठी विसंबून असेल, आणि कर्णधार हार्दिक पांड्या संघात परतण्याची अपेक्षा आहे. मिचेल सॅण्टनरचे संघात पुनरागमन होणे देखील अत्यंत महत्त्वाचे ठरेल; यामुळे संघाला फिरकी गोलंदाजीचा पर्याय उपलब्ध होतो, त्यामुळे त्यांना ट्रेंट बोल्टच्या सोबतीने तीन भारतीय वेगवान गोलंदाजांना खेळवणे शक्य होईल.

राजस्थान रॉयल्ससाठी विजय मिळवणे म्हणजे प्ले-ऑफसाठी पात्र ठरणाऱ्या संभाव्य प्रबळ दावेदारांपैकी एक म्हणून आपले स्थान अधिक भक्कम करणे ठरेल, तर दुसरीकडे, नवी दिल्लीत दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध झालेल्या निराशाजनक कामगिरीतून लवकरात लवकर सावरण्याची मुंबईची तीव्र इच्छा असेल.

गुवाहाटीमध्ये सायंकाळच्या वेळी हवामान उष्ण आणि दमट राहण्याची शक्यता आहे. तापमान सुमारे २८ अंश सेल्सिअस राहील आणि आर्द्रता जास्त असेल. पावसाचा फारसा परिणाम अपेक्षित नसल्याने संपूर्ण सामना खेळला जाईल.

तथापि, दुसऱ्या डावात दव महत्त्वाची भूमिका बजावेल, त्यामुळे फलंदाजी करणाऱ्या संघाला धावांचा पाठलाग करणे अधिक सोपे जाईल. बरसापारा क्रिकेट स्टेडियमच्या खेळपट्टी संतुलित असून फलंदाजांना किंचित अधिक अनुकूल आहे.

◀*(वृत्तसंस्था)*

## देवदत्तला संघाबाहेर दीर्घकाळ ठेवणे कठीण : कार्तिक

**नवी दिल्ली :** २०२६ च्या आयपीएलमध्ये देवदत्त पडिक्कलने सध्या जी सातत्यपूर्ण आणि आत्मविश्वासपूर्ण कामगिरी केली आहे, ती पाहता त्याला भारतीय संघाबाहेर दीर्घकाळापर्यंत ठेवणे कठीण जाईल, असे मत : रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचे (आरसीबी) फलंदाजी प्रशिक्षक व मार्गदर्शक दिनेश कार्तिकने व्यक्त केले. पडिक्कलने २९ चेंडूंत ५० धावांची खेळी केली, या हंगामातील त्याचे हे सलग दुसरे अर्धशतक होते व बंगळुरू येथील एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर चेन्नई सुपर किंग्जविरुद्ध (सीएसके) आरसीबीला ३ बाद २५० अशी विशाल धावसंख्या उभारून देण्याचा पाया रचला. या सामन्यात आरसीबीने अखेर ४३ धावांनी विजय मिळविला.

सर्वात पहिली गोष्ट जी प्रकर्षाने दिसून येते, ती म्हणजे त्याचा दृढनिश्चय. अशा प्रकारच्या खेळपट्टीवर, जिथे सुरुवातीला धावा करणे सहज शक्य नसते, तिथे अनेक फलंदाज मोठा फटका मारण्याचा अट्टहास करतात आणि परिणामी आपली विकेट गमावून बसतात. जेव्हा परिस्थिती कठीण होती, तेव्हा संयम राखण्याचे मोठे धाडस देवदत्तने दाखवले, असे तो म्हणाला. एकदा का त्याला पहिली चौकार-सीमा मिळाली, की त्यानंतर त्याने आपल्या खेळाचा वेग बदलल्याचे स्पष्टपणे दिसून आले. तो क्रिकेटच्या नियमांनुसार योग्य असे फटके खेळत आहे आणि चेंडूवर जोरदार प्रहार करून त्याला सीमेपार पाठवत आहे.

## कोलकाता-पंजाब सामन्यात पावसाचा व्यत्यय

कोलकाता, दि.६ एप्रिल-

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात सोमवारी ईडन गार्डन्स स्टेडियमवर कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) आणि पंजाब किंग्स दरम्यानच्या सामन्यात वेगवान गोलंदाज झेव्हियर्स बार्टलेटने केकेआरला धक्का दिल्यानंतर पावसाने व्यत्यय आणला. पावसामुळे खेळ थांबला तेव्हा केकेआरने ३.४ षटकांत २ बाद २५ धावा केल्या होत्या व सलामीवीररहाणे नाबाद ८ धावांवर, तर रघुवंशी नाबाद ७ धावांवर खेळत होते.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेत कर्णधार अजिंक्य रहाणे व फिन ॲलन ही सलामी जोडी मैदानावर आली. सामन्याच्या दुसऱ्याच षटकांत मध्यम गती वेगवान गोलदाज झेव्हियर बार्टलेटने केकेआरला दोन जबरदस्त हादरे दिले. बार्टलेटने चौथ्या चेंडूवर फिन ॲलनला ( ६) व सहाव्या चेंडूवर कॅमेरॉन ग्रीनला (४) यष्टीमागे प्रभसिमरन सिंगकडे झेल सोपविण्यास भाग पाडले.

रहाणे व अंगकृश रघुवंशी धावा गोळा करण्याचा प्रयत्न करीत असतानाच पावसाने हजेरी लावली एक तास उलटूनही जोरदार आलेला पाऊस थांबेना.

सामन्याच्या षटकांची मर्यादा कमी करण्याचा विचार सुरु झाला. अखेर पाऊस थांबला, तर स्थानिक वेळेनुसार रात्री ११.१४ वाजता सामना पुन्हा सुरु होईल तसेच हा ासमना रात्री ११.४० वाजता संपणे अनिवार्य आहे

# महेश कोठे जयंतीनिमित्त स्केटिंग उत्सव; ५० स्पर्धकांचा सहभाग





### विजेत्यांना चषक व प्रमाणपत्रांचे वितरण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

महेश कोठे यांच्या ६२ व्या जयंतीदिनानिमित्त दत्तात्रय बडगंची मित्र परिवाराच्या वतीने स्केटिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. ही स्पर्धा रविवार, दि. ५ एप्रिल २०२६ रोजी सोना चांदी कॉम्प्लेक्स, प्रगती चौक, जुना विडी घरकुल येथे उत्साहात पार पडली.

या स्पर्धेत ५ ते १४ वयोगटातील सुमारे ५० मुला-मुलींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. बालकांनी आपल्या कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन करत स्पर्धेला रंगत आणली. विजेत्या स्पर्धकांना चषक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

याकार्यक्रमास नगरसेवक प्रथमेश कोठे, प्रशांत पल्ली, सतीश सिरसिल्ला, अविनाश दासरी यांची प्रमुख उपस्थिती होती. स्केटिंग प्रशिक्षक युसूफ पिरजादे यांनी स्पर्धकांना मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे बालकांमध्ये क्रीडा संस्कृतीला चालना मिळत असल्याची भावना नगरसेवक प्रथमेश कोठे यांनी व्यक्त केले. दरम्यान, स्पर्धेचे आयोजक दत्तात्रय बडगंची यांनी या स्पर्धेमागील उद्देश स्पष्ट करताना बालकांमध्ये खिलाडूवृत्ती रुजावी यासाठी सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याचे सांगण्यात आले. यावेळी दत्तात्रय बडगंची मित्रपरिवार आदींसह खेळाडू आणि पालक उपस्थित होते.

## सोलापूर स्पोर्ट्सचे क्रिकेट प्रशिक्षण शिबिर १० एप्रिलपासून

**सोलापूर, दि. ६ एप्रिल**

सोलापूर स्पोर्ट्स इन्स्टिट्यूटच्या वतीने सलग २३ व्या वर्षी उन्हाळी लेदर बॉल क्रिकेट प्रशिक्षण शिबीर १० एप्रिल ते १० जून या कालावधीत कै. पांडुरंग पुंजाल मैदान येथे आयोजित केले आहे.

हे प्रशिक्षण सकाळी ६:३० ते ८:३० आणि सायंकाळी ४ ते ६ या दोन सत्रांत चालणार आहे. इच्छुक खेळाडूंनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन व्यंकटेश पुंजाल यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी सचिव वासुदेव दोरनाल (९८९०७७९८२९ अथवा ७४१०००२९६८) यांच्याशी संपर्क साधावा.

# आर्या पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांचे राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ६ एप्रिल-**

विठ्ठल प्रतिष्ठान, निमगाव (टें) संचलित आर्या पब्लिक स्कूल, माढा येथील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय टेंग सू डो क्रीडा स्पर्धेमध्ये उल्लेखनीय यश संपादन करून शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे. महाराष्ट्र शासन क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे, जिल्हा क्रीडा कार्यालय बुलढाणा व जिल्हा परिषद बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत राज्यातील आठ विभागांमधून तब्बल ३८४ खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता.

या स्पर्धेत १४ वर्षाखालील गटामध्ये शौर्य नवनाथ तांबिले याने प्रथम क्रमांक पटकावला. तसेच अश्वतेज सुनील चौगुले याने द्वितीय क्रमांक, तर सूर्या शरद सुरवसे आणि विराज राजेश वेळापुरे यांनी तृतीय क्रमांक मिळवला.

१७ वर्षाखालील मुलींच्या गटामध्ये आर्या शरद सुरवसे हिने द्वितीय क्रमांक, तर आर्या हरिश्चंद्र शिरतोडे हिने तृतीय क्रमांक मिळवला.

१७ वर्षाखालील मुलांच्या गटामध्ये ओम सोमनाथ गोरे याने द्वितीय क्रमांक, तर आर्यन ब्रह्मदेव धायगुडे याने तृतीय क्रमांक मिळवून शाळेचा गौरव वाढवला.



या सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक श्री. शुभम पुरवत यांचे उत्कृष्ट मार्गदर्शन लाभले. त्यांच्या परिश्रमामुळेच विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले. या सर्व यशस्वी खेळाडूंचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा मा. आमदार बबनदादा शिंदे, सोलापूर जिल्हा दूध संघाचे चेअरमन मा. रणजीत शिंदे, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा प्रणिता शिंदे, प्राचार्य थोरात एस. जे., कार्यालयीन अधीक्षक संभाजी पाटील तसेच सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



# शिक्षक क्रिकेट स्पर्धेत 'रिचा ब्लास्टर' संघ अजिंक्य

### '४० प्लस पर्व 3' स्पर्धेत हरलीन हिटर संघ उपविजेता

**सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

टीचर क्रिकेट क्लब आयोजित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी '४० प्लस क्रिकेट स्पर्धा पर्व ३' स्पर्धेत 'रिचा ब्लास्टर' संघाने विजेतेपदावर आपले नाव कोरले.

रेल्वे मैदानावर अत्यंत चुरशीच्या झालेल्या या स्पर्धेतील अंतिम सामन्यात 'रिचा ब्लास्टर' संघाने हरलीन हिटर संघास हरविले. शिवसेना-शिंदे गटाचे नेते अमोल बापू शिंदे यांच्या हस्ते विजेत्या संघांना करंडक व पारितोषिके प्रदान करण्यात आली. या प्रसंगी संजीवनी फाउंडेशनचे अध्यक्ष शराकेश उदगिरी उपस्थित होते.

विजेत्या संघाला प्रकाश स्वामी यांचे तर द्वितीय संघाला बापू राऊत यांचे प्रायोजकत्व लाभले होते. तृतीय क्रमांकाचा बहुमान मसूद सिद्धिकी प्रायोजित 'चरणी चॅम्पियन्स' संघाने मिळवला, तर इरशाद शेख प्रायोजित 'जेमीमा जागवार' या संघाला चतुर्थ क्रमांकावर समाधान मानावे लागले.

ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी अरविंद ताटे, नागेश खुणे, सचिन खरात, रवी चव्हाण, श्रीकांत काशीद व भालचंद्र हंचाटे, श्रीनिवास पाटील, षणमुख गुत्तरगी, दुर्गेश भदे, सुनील शिंदे व विनोद कोळी यांचे सहकार्य लाभले.

वैयक्तिक कामगिरी : मालिकावीर : संपत लेंडवे. फलंदाजः संपत लेंडवे, गोलंदाजः शिवाजी वसपटे. क्षेत्ररक्षकः सचिन क्षीरसागर.





# ज्येष्ठांचा आदर्श घेऊन तरुणांनी सायकलिंगकडे वळावे : आ. रणजितसिंह

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ६ एप्रिल-**

श्री क्षेत्र पंढरपूर ते श्री क्षेत्र घुमाण (पंजाब) या सायकल वारीच्या माध्यमातून आज आरोग्य उत्तम रहावे म्हणून ज्येष्ठ नागरिक मोठ्या प्रमाणात सायकलिंगकडे वळले आहेत ही अभिमानाची बाब आहे. या ज्येष्ठांचा आदर्श घेऊन तरुणांनी सायकलिंगकडे वळावे, असे आवाहन आ. रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी केले.

सायकल रायडर्स असोसिएशनच्या वतीने जागतिक आरोग्य दिन व माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या वाढदिवसानिमित अकलूज ते अकलूज या सुमारे ७५ किलोमीटर माळशिरस तालुका सायकल राईड चे आयोजन करण्यात आले होते. अकलूज येथील विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकुल येथून सकाळी ६ वाजता अकलूज नगर परिषदेचे नगरसेवक सयाजीराजे मोहिते पाटील यांच्या हस्ते या सायकल राईडचा शुभारंभ करण्यात आला. अकलूज - माळीनगर -२५/४ - महाळुंग - श्रीपूर - बोरगाव - माळखांबी - बोंडले - वेळापूर - खुडूस - माळशिरस - संग्रामनगर - अकलूज असा या सायकल राईडचा मार्ग होता. माळशिरस येथे पंचायत समिती सभागृहात सभापती दत्ताभैय्या मगर यांनी सायकल रायडर्सचे स्वागत केले. त्याप्रसंगी आयोजित समारंभात आ मोहिते पाटील बोलत होते. प्रमुख अतिथी म्हणून कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील, सभापती दत्ताभैय्या मगर, इशिता मोहिते-पाटील, गटविकास अधिकारी रघुनाथ पांढरे उपस्थित होते.

यावेळी सायकलिंग काळाची गरज या विषयावर आंतरराष्ट्रीय सायकल रायडर्स सतीश जाधव (मुंबई) यांचे व्याख्यान झाले. ते म्हणाले, सायकल राईड सारखे उपक्रम समाजात आरोग्य विषयी जागरूकता निर्माण करतात, एकत्रितपणे सकारात्मक ऊर्जा देतात आणि नव्या पिढीला योग्य दिशा दाखवतात. घुमाण सायकल वारीने आरोग्य संपन्न वारीचा नवा आदर्श घालून दिला आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते पाटील म्हणाले, सायकलिंगला अनन्य साधारण महत्व आहे. पूर्वी गरिबीमुळे सायकलीने प्रवास करावा लागत होता. आज आरोग्य उत्तम रहावे म्हणून सायकलिंग करावी लागत आहे ही चांगली बाब आहे. अकलूज येथील विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकुल येथे शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा शीतलदेवी मोहिते पाटील यांच्या हस्ते व अकलूजचे उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व नगराध्यक्षा रेश्मा अडगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत सहभागी सायकल रायडर्सना मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या राईडचे आयोजन सायकल रायडर्स असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष सूर्यकांत भिसे, उपाध्यक्ष डॉ सुभाष कोकणे, सचिव सुरेंद्र पिसे, सह सचिव सुधाकर सोनवणे, विश्वस्त हर्षल सरोदे यांनी केले होते.



### सायकल राईडचे ठिकठिकाणी उत्साही स्वागत

सायकल रायडर्स असोसिएशनच्या वतीने आयोजित केलेल्या अकलूज ते अकलूज या सुमारे ७५ किलोमीटर सायकल राईडचे श्रीपूर येथे श्री पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या पांडुरंग सायकल क्लबने, बोंडले येथे डॉ जयंत चव्हाण, वेळापूर येथे रिपाइंचे तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे यांनी, खुडूस येथे माजी सभापती मच्छिंद्र ठवरे यांनी, चव्हाण वस्ती येथे संदीपान चव्हाण यांनी तर अकलूज येथे अकलूज नगर परिषदेच्या वतीने मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# अरणमध्ये घुमणार सावता महाराजांच्या भक्तीचा जागर

## २४ ऑगस्टला मुख्यमंत्र्यांच्या हस्ते स्मारकाचे भव्य भूमिपूजन; पालकमंत्री जयकुमार गोरे यांची घोषणा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

शासनाने आरण येथील श्री संत सावता महाराज संजीवन समाधी स्मारकासाठी १५० कोटीचा निधी मंजूर केलेला होता त्यानंतर कोटी निधीसाठी प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. या स्मारकाच्या कामाचे मुख्यमंत्री महोदय यांच्या हस्ते दिनांक २४ ऑगस्ट २०२६ रोजी भूमिपूजन करण्याचे नियोजित आहे. तरी सर्व शासकीय यंत्रणांनी यासाठी आवश्यक असलेल्या शासकीय प्रक्रिया पूर्ण करून घ्याव्यात, असे निर्देश ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित श्री संत शिरोमणी सावता माळी महाराज संजीवन समाधी व जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांचे स्मारक आढावा बैठकीत पालकमंत्री जयकुमार गोरे बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस., मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, पंढरपूर सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता





अमित निमकर, वसेकर महाराज, माढा प्रांताधिकारी ज्योती आव्हाड, मंगळवेढा प्रांताधिकारी अमित माळी, सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी श्रीकांत कुंटला, प्रीतम कुंटला, जि. प. बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. कुलकर्णी उपस्थित होते. पालकमंत्री गोरे पुढे म्हणाले की, राज्य शासनाकडून ८९.०७ कोटी निधी ला प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेला आहे. मंजूर निधीप्रमाणे टेंडर प्रक्रिया राबवावी. या स्मारकासाठी अंमलबजावणी यंत्रणा म्हणून जिल्हा परिषद कामकाज पाहणार आहे. तरी जिल्हा परिषदेने हे स्मारक भव्य दिव्य होण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व उपाययोजना कराव्यात. यासाठी काही अडचणी असतील तर त्याही येथे मांडाव्यात.

परंतु या सरकाचे काम कोणत्याही परिस्थितीत २४ ऑगस्ट रोजी सुरू झाले पाहिजे, यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी परस्परात योग्य समन्वय ठेवून अत्यंत गतिमान पद्धतीने कामकाज करणे अपेक्षित असल्याचे गोरे यांनी सुचित केले. तसेच मंदिर परिसरातील आठ ते दहा एकर जागा भूसंपादनासाठी दहा कोटी मागणी प्रस्ताव पाठवण्याचेही त्यांनी सुचित केले. यावेळी जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी श्री संत सावता महाराज स्मारकाच्या अनुषंगाने प्रशासन गतीने काम करून सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल असे सांगितले. स्मारकाच्या जवळील भूसंपादित करण्यात येणाऱ्या जागेच्या मालकाशी दोन ते तीन बैठका झालेल्या असून थेट भूसंपादनाची प्रक्रिया राबवून भूसंपादन करण्यात येईल, असे माढा उपविभागीय अधिकारी श्रीमती आव्हाड यांनी सांगितले.

श्री जगत ज्योती महात्मा बसवेश्वर स्मारक मंगळवेढा शेजारील चोखामेळा नगर हद्दीतील कृष्ण तलावा शेजारील जागा श्री जगत ज्योती महात्मा बसवेश्वर स्मारकासाठी देण्याबाबत प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयात देण्यात आलेला आहे. यातील किमान १५ एकर जागा स्मारकासाठी उपलब्ध करून द्यावी. तसेच कृष्ण तलावाच्या सुशोभीकरणाचाही प्रस्ताव आराखड्यात घ्यावा, असे निर्देश पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले. तसेच या स्मारकाचा आराखडा करण्यासाठी वास्तुविशारद यांची नियुक्ती करण्याबाबत ही सुचित करण्यात आले.

## थोडक्यात...



### मंद्रूप परिसरात सुरळीत वीजपुरवठा करण्याची मागणी

**दक्षिण सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

मंद्रूप येथील वीज वितरण कार्यालयाकडून वारंवार वीजपुरवठा खंडीत करण्यात येत आहे. त्यामुळे ऊन्हाळी पिकांना व फळबागांना पाणी देणे मुश्कील बनला आहे. त्यामुळे पिके करपून शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे. ऊन्हाची तीव्रता अधिक असल्यामुळे पिकांना दोन ते तीन दिवसाआड पाणी द्यावे लागते, मात्र वीज वितरण कार्यालयाकडून वीजपुरवठा सुरळीत होत नसल्याने आठ ते दहा दिवसाला पाणी देण्याची वेळ आली आहे. त्यातही मोटार चालू केल्यावर एक ते दोन तास वीज गायब होत असल्याने विज येईपर्यंत प्रतीक्षा करावी लागते. त्यामुळे शेतकर्यांचे लाखो रूपयांचे नुकसान होत आहे. म्हणून सुरळीत वीजपुरवठा करण्याच्या मागणीचे निवेदन वीज वित्तरण अधीक्षक अभियंता यांना राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष गुरूनाथ जोडमोटे यांनी दिले. मंद्रूप वीज कार्यालयातून दिवसातून दहा ते पंधरा वेळा वीज बंद करण्यात येत असल्याने इलेक्ट्रीक साहीत्यही जळत आहेत. म्हणून शेतकरी व रूग्णांचे त्रास दूर करण्यासाठी आपण मंद्रूप वीजकार्यालयाला सुरळीत व अखंडीत वीजपुरवठा करण्याचे आदेश द्यावेत. अन्यथा मंद्रूप वीज वितरण कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी शिवानंद हिरेमठ, माशाप्पा कोळी, निंगप्पा कुमठेकर, काशिनाथ जेऊरकर, रामचंद्र जोडमोटे, सोमनाथ रेवतगाव, सुभाष गिरगाव, पिंटू अडोळे आदी उपस्थित होते.



### रमेश बागवेंना विधान परिषदेत संधी द्या; काँग्रेस पदाधिकाऱ्यांची मागणी

**टेंभूर्णी, दि. ६ एप्रिल-**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची पारंपरिक वोट बँक मानल्या जाणाऱ्या मातंग समाजाला न्याय देण्यासाठी तसेच समाजाच्या नेतृत्वाला बळकटी देण्यासाठी माजी गृहमंत्री रमेश बागवे यांना विधान परिषदेत संधी देण्यात यावी, अशी मागणी काँग्रेस कमीटीचे जिल्हा उपाध्यक्ष रामभाऊ वाघमारे यांनी जिल्ह्यातील काँग्रेस पक्षातील कार्यकर्त्यांनी सोलापूर येथे पक्ष निरिक्षक निरीक्षक देवाशिष पटनायक आणि मोहन जोशी यशराज पारखी आणि भाऊसाहेब आसबे यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे मागणी केली. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष रामभाऊ वाघमारे, जिल्हाउपाध्यक्ष सौदागर जाधव, उपाध्यक्ष रफिक शेख, माढा तालुका उपाध्यक्ष अनिल गवळी, उत्तर सोलापूर युवकचे तालुकाध्यक्ष महेश लोंढे, शहर काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष लखन, गायकवाड, धनराज वाघमारे उपस्थित होते.

### मेस्टा संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी घाडगे

**बार्शी, दि. ६ एप्रिल-**


महाराष्ट्र इंग्लिश स्कूल ट्रस्टीज असोसिएशन (मेस्टा-एफ) या संघटनेची वार्षिक आढावा बैठक सोलापूर येथे पार पडली. या बैठकीस जिल्ह्यातील सुमारे १४८ संस्थाचालक उपस्थित होते. कोअर कमिटीच्या उपस्थितीत नवीन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. बैठकीस प्रदेशाध्यक्ष हरीष शिंदे व राज्य सचिव गणेश नील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला. यावेळी संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी संभाजी घाडगे यांची निवड करण्यात आली.



जिल्हा उपाध्यक्षपदी सचिन पवार, जिल्हा सचिवपदी शरद अनंतकवळस, जिल्हा संघटकपदी गणपत मोरे तर जिल्हा खजिनदारपदी अमोल दुर्वे यांची निवड जाहीर करण्यात आली. बैठकीत शाळांच्या विविध अडचणी सोडवण्यासाठी ठोस पावले उचलण्याचा निर्धार करण्यात आला. नवीन जिल्हाध्यक्ष संभाजी घाडगे यांनी संस्थाचालक व शिक्षकांच्या अडचणी सोडवण्यासाठी संघटना कटिबद्ध राहील. शिक्षण क्षेत्रातील गुणवत्ता वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील, असे सांगितले.

## निधन वृत्त...

### नारायण देशमुख



**सांगोला, दि. ६ एप्रिल -**

महूद (ता.सांगोला) येथील सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक नारायण सदाशिव देशमुख (वय-१००) यांचे शनिवार दि. ४ एप्रिल रोजी रात्री निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे.

### विजय करणकोट



**सोलापूर, दि. ६ एप्रिल -**

येथील ज्येष्ठ वृत्तपत्र विक्रेते विजय करणकोट यांचे दि. ६ एप्रिल रोजी निधन झाले. ते मागील ४० वर्षांपासून वृत्तपत्र विक्री व्यवसायात होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, तीन मुली, नातवंडे असा परिवार आहे. मृत्यूसमयी ते ७७ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थीवावर पद्मशाली स्मशानभूमीत अंतिमसंस्कार करण्यात आले. वृत्तपत्र क्षेत्रातील मान्यवर मंडळी तसेच वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते आणि व्यापारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

### महावीर दोशी



**अकलूज, दि. ६ एप्रिल -**

अकलूज येथील प्रसिध्द व्यापारी महावीर मोतीचंद दोशी (वाघोलीकर) वय ६९ यांचे रविवार दि. ५ एप्रिल रोजी हृदयविकाराने रात्री ११:२० वा. निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे

# हिंदू म्हणून टिकायचे असेल तर इतिहास समजला पाहिजे

- ॲड. तुकाराम चिंचणीकर
- श्रीपूर येथे विराट जागृती हिंदू संमेलन

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर दि.६ एप्रिल-**

सर्व जगात हिंदू संस्कृतीने समृद्ध असलेला आपला देश परकिय आक्रमणे, फंद फितूरी यामुळे खंडित झाला. आपल्या देशाला परत परम वैभावी करण्यासाठी हिंदू म्हणून आपण जात पात न मानता एक होणे काळाची गरज आहे. त्यासाठी प्रथम हिंदू म्हणून टिकायचे असेल तर इतिहास समजला पाहिजे असे उग्दार हिंदू महासभेचे ॲड. तुकाराम चिंचोलीकर यांनी काढले.

श्रीपूर (ता.माळशिरस) येथे विराट जागृती हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते त्या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला शंभर वर्ष पूर्ण होत असून या शंभर वर्षात संघाने केलेली सामाजिक




कामे समाजा समोर यावीत तसेच संघाने दिलेल्या पंच परिवर्तनाचे प्रत्येकाने आचरण करावे यासाठी हिंदू सम्मेलनाचे आयोजन करण्यात आले होते. संम्मेलनास शक्तिपात महायोग साधन चैतन्य कुटी (माळीनगर) चे प. पू. स्वामी श्रीपाद तीर्थ महाराज, सामाजीक कार्यकर्ते संदीप सावेकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

प्रथम आशिर्वचनात स्वामी श्रीपाद तीर्थ यांनी संतानी दिलेल्या शिकवणुकी प्रमाणे आपले वर्तन व आचरण ठेवणे म्हणजेच हिंदू धर्म वाढविणे होय असे सांगून प्रत्येक घरामध्ये ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, दासबोध, शिवचरित्र, गीता या धार्मिक ग्रंथांचे वाचन व मनन होणे गरजेचे असल्याचे सांगितले.

तर सावेकर यांनी रा. स्व. संघाचे सामाजिक समरता, पर्यावरण संरक्षण, कुटूंब प्रबोधन, स्व बोध, व नागरी कर्तव्य या पंच परिवर्तनाची माहिती दिली. याप्रसंगी रा. स्व. संघाचे तालुका संघचालक भिष्माचार्य कुदळे, ता. कार्यवाह बाळासाहेब खरात, महाळुंग - श्रीपूरचे माजी प. स. सदस्य अनिल जाधव, अनिल मुंडफणे, विक्रमसिंह लाटे, उद्योजक संदीप सुरेश घाडगे, जांबूडचे सरपंच राहूल खटके, ब्रिमा सागरले डे. मॅनेजर नरेश पाठक, सतीश डिंगरे उपस्थित होते. प्रास्ताविक शेखर कुलकर्णी यांनी केले. प्रमुख अतिथींची स्वागत सुरज शिन्दे, मल्हारी जाधव यांनी केले. परिचय शाम मांगले तर प्रेरणा गित गजानन मोकाशी यांनी म्हटले. सूत्रसंचालन प्रा. नितीन देशपांडे यांनी केले.

# सुमारे ५० हजार मिळकतींची नोंद महापालिकेकडे नाही

**सोलापूर :** सोलापूर शहरात सुमारे सव्वातीन लाख मिळकती आहेत. दरम्यान सुमारे ५० हजार हून अधिक मिळकतींची नोंद सोलापूर महापालिकेकडे नाही. त्याचा शोध घेण्यासाठी सर्वेक्षण केले जाणार आहे. मिळकतदारांनी स्वतःहून आपल्या मिळकतीची आकारणी अर्जाद्वारे करून घेतल्यास त्यांना पाच टक्के सूट देण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिली.

शहरात सुमारे ५० हजार हून अधिक मिळकतीची नोंद अद्याप झाली नाही. अशा मिळकतींचे सर्वेक्षण केले जाणार आहे. त्यांची आकारणी ही प्रशासनाकडून करण्यात येणार आहे. अशा मिळकती आढळल्यास मागील सहा वर्षाची आकारणी केली जाणार आहे. दरम्यान, संबंधित मिळकतदारांनी स्वतःहून महापालिकेकडे अर्ज करून मिळकतीची आकारणी करून घ्यावी. तीन महिन्यापर्यंत स्वतःहून आकारणी केल्यास संबंधितांना पाच टक्के सूट देण्यात येणार आहे, असे उपायुक्त लोकरेंनी स्पष्ट केले.

### शेतात पाणी द्यायला सांगितल्याने

# कासेगावात अल्पवयीन मुलाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

गावातील यात्रेच्या दिवशी मला शेतात पाणी देण्यास का सांगता, असे म्हणत रागाच्या भरात १७ वर्षांच्या मुलाने कासेगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथील शेतात गळफास घेऊन आत्महत्या केली. हरिदास अशोक मोरे, असे त्या मुलाचे नाव आहे. रविवारी (ता. ५) सकाळी आठच्या सुमारास हा प्रकार उघडकीस आला.

हरिदास इयत्ता अकरावीत शिकत होता. रविवारी गावाची जत्रा होती. मात्र, उन्हाळ्यामुळे पिकांना पाणी द्यायचे असल्याने वडिलांनी त्याला शेतात जायला सांगितले होते. पिकांना पाणी देऊन जत्रेला ये, असे त्यांनी बजावले होते. पण, गावच्या जत्रेच्या दिवशी शेतात का जाऊ, असे म्हणत तो मित्राची दुचाकी घेऊन शेतात गेला. त्याचा राग पाहून कुटुंबीयांना संशय आला. त्यामुळे वडिलांनी त्याच्या भावाला थोड्या वेळाने शेतात पाठवले. तोपर्यंत हरिदासने शेतातील पत्र्याच्या शेड मध्ये लोखंडी अँगलला दोरीच्या साहाय्याने गळफास घेतला होता. हे दृश्य पाहताच त्याच्या भावाने सत्तूरने दोरी कापून त्याला खाली उतरवले आणि लगेचच वडिलांना बोलावून घेतले. त्याला तातडीने सोलापूर येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. हरिदासच्या पश्चात आई-वडील, दोनउ भावंडे व आजोबा असा परिवार आहे.

**तालुकास्तरावर दोनदा कुस्तीत पटकावले विजेतेपद**

मेहनतीने व जिद्दीने लाल माती गाजवणारा, भविष्यातील एक तगडा पैलवान अशी हरिदासची ओळख होती. इयत्ता अकरावीत शिकणा-या हरिदासने कुस्तीच्या लाल आखाड्यात आपले वेगळे स्थान निर्माण केले होते. त्याने सलग दोन वर्षे तालुकास्तरावर कुस्तीत विजेतेपद पटकावले होते. गावातील जय हनुमान तालमीत तो दररोज सराव करत होता. त्याची पिळदार शरीरयष्टी आणि कुस्तीतील चपळाईमुळे भविष्यात तो गावाचा नावलौकिक वाढवेल, अशी सर्वांना आशा होती.

# पंचाचार्य जगद्गुरूंची भव्य अड्डपालखी मिरवणूक व विविध धार्मिक कार्यक्रम

**मुक्तेश्वर शिवाचार्य महास्वामीजींच्या सुवर्ण अमृत महोत्सवानिमित्त आयोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. ६ एप्रिल-**

वेळापूर ता. माळशिरस येथील श्री बृहन्मठ येथे जेष्ठ मठाधिपती श्री. ष. ब्र. १०८ शिवाचार्य शिरोमणी मुक्तेश्वर महास्वामी यांच्या अमृत महोत्सव व सुवर्ण पट्टाभिषेक महोत्सवानिमित्त दि. ९ एप्रिल २०२६ ते १३ एप्रिल २०२६ या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाची सुरुवात दि. ९ एप्रिल २०२६ रोजी पहाटे ६ वाजता ध्वजारोहणाने होणार आहे. त्यानंतर पहाटे ६.३० ते सकाळी ८ या वेळेत गुरुगादीस रुद्राभिषेक, सकाळी ८.३० ते ११ या वेळेत गणेश याग व महारुद्रयाग स्वाहाकार तसेच श्रीगुरूंच्या हस्ते दाम्पत्यांना शुभाशीर्वाद दिले जाणार आहेत.

सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत भजन-कीर्तन व संगीत कार्यक्रम, दुपारी ४ ते सायंकाळी ७ या वेळेत नवचंडी याग स्वाहाकार, सायंकाळी ७.३० ते ७.४५ या वेळेत श्रीगुरूंचे तुलाभार व श्रीगुरूंच्या हस्ते दाम्पत्यांना शुभाशीर्वाद, तर रात्री ८ ते ९ या वेळेत धर्मसभा असा दैनंदिन कार्यक्रम दि. ९ ते ११ एप्रिल या तीन दिवसांत पार पडणार आहे. दि. १२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी



१० वाजता अय्याचार व शिवदिक्षा संस्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून यासाठी पूर्व नोंदणी सुरू आहे. यानंतर रात्री ८ वाजता पंचाचार्य जगद्गुरूंच्या दिव्य सान्निध्यात व अनेक शिवाचार्यांच्या उपस्थितीत धर्मसभा होणार असून त्यानंतर उपस्थितांना महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे.महोत्सवाचा समारोप दि. १३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९ वाजता जगद्गुरूंचे दिव्य सान्निध्यात श्री बृहन्मठ वेळापूरचे जेष्ठ मठाधिपती श्री. ष. ब्र. १०८ शिवाचार्य शिरोमणी मुक्तेश्वर महास्वामी यांना हरिद्रलेपन व अभ्यंग स्नान घालून करण्यात येईल. त्यानंतर सकाळी १०.३० वाजता उपस्थित शिवाचार्य, संत-महंत तसेच सामाजिक, राजकीय व विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार सोहळा पार पडेल.

सकाळी ११ वाजता शिवाचार्य धर्मसंदेश व पंचाचार्य जगद्गुरूंचे प्रमुख आशिर्वचन झाल्यानंतर धर्मसभेची सांगता होऊन उपस्थितांना महाप्रसाद देण्यात येईल.

या ऐतिहासिक धार्मिक सोहळ्यास सर्व भाविकांनी सहकुटुंब उपस्थित राहून पंचाचार्य जगद्गुरूंचे दर्शन, कार्यक्रमांचा लाभ व गुरूकृपा घ्यावी, असे आवाहन श्री बृहन्मठ वेळापूरचे नूतन मठाधीपती श्री. ष. ब्र. १०८ सदाशिव शिवाचार्य महास्वामी यांच्या वतीने करण्यात आले आहे. पाचही जगद्गुरूंची वेळापूर शहरातून अड्डापालखी मिरवणूक १२ एप्रिल रोजी दुपारी ४ ते रात्री ८ या वेळेत पाचही जगद्गुरूंची भव्य-दिव्य अड्डापालखी मिरवणूक (पालखी मैदान ते श्री बृहन्मठ वेळापूर) काढण्यात येणार आहे.

या मिरवणुकीत रंभापुरी पीठाचे श्री. श्री. श्री. १००८ वीरसिंहासनाधिश्वर प्रसन्न रेणुक वीरसोमेश्वर शिवाचार्य महास्वामीजी, उज्जैन पीठाचे श्री. श्री. श्री. १००८ सद्धर्मसिंहासनाधिश्वर सिद्धलिंग राजदेशीकेंद्र शिवाचार्य महास्वामीजी, श्रीशैल पीठाचे श्री. श्री. श्री. १००८ सुर्यसिंहासनाधिश्वर डॉ. चन्नसिद्धराम पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामीजी, काशी पीठाचे श्री. श्री. श्री. १००८ ज्ञानसिंहासनाधिश्वर डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी, काशी पीठाचे श्री. श्री. श्री. १००८ ज्ञानसिंहासनाधिश्वर डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी या पंचाचार्य जगद्गुरूंचे दिव्य सान्निध्य लाभणार आहे.

# दिव्यांगांच्या समायोजनात पेच; १८ वर्षांवरील प्रवेशाचा प्रश्न अनुत्तरित

**नियमित शाळांमध्ये सुविधांचा अभाव; सीईओ जंगम यांनी शासनाकडे मागवले मार्गदर्शन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ एप्रिल -**

जिल्ह्यातील दिव्यांग शाळांमधील विद्यार्थ्यांचे नियमित शाळांमध्ये समायोजन करण्याचे शासनाचे आदेश असले, तरी त्याच्या अंमलबजावणीत अनेक व्यावहारिक अडचणी उभ्या राहत आहेत. विशेषतः १८ वर्षांवरील दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रवेश कुठे द्यायचा, हा गंभीर प्रश्न प्रशासनासमोर निर्माण झाला आहे.




या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी शासनाकडे मार्गदर्शन मागवले आहे. कारण, १८ वर्षांवरील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र शाळांची व्यवस्था उपलब्ध नाही.

जिल्ह्यातील दिव्यांग शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी निवास, विशेष शिक्षक आणि आवश्यक सुविधा उपलब्ध असतात. मात्र, नियमित शाळांमध्ये अशा सुविधा मोठ्या प्रमाणावर नसल्याने समायोजन प्रक्रियेत अडथळे निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, अनेक दिव्यांग शाळा निवासी स्वरूपाच्या आहेत, तर नियमित शाळांमध्ये निवासाची सुविधा उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची प्रक्रिया अधिक गुंतागुंतीची ठरणार आहे. दरम्यान, जिल्ह्यातील सर्व दिव्यांग शाळांमधील विद्यार्थ्यांची पडताळणी करण्यात आली असून, ज्या शाळांमध्ये विद्यार्थी नाहीत, त्या शाळांची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आला आहे.शासनाच्या आदेशानुसार समायोजन प्रक्रिया राबवली जाणार असली, तरी दिव्यांग विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा नियमित शाळांमध्ये उपलब्ध करून देणे हे मोठे आव्हान ठरणार आहे. यासंदर्भात शासनाकडून स्पष्ट मार्गदर्शन आल्यानंतरच पुढील निर्णय घेण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

> दिव्यांग शाळांमधील विद्यार्थ्यांचे नियमित शाळांत समायोजन करण्याच्या सूचना आहेत. मात्र, १८ वर्षांवरील विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत स्पष्टता नसल्याने शासनाकडे मार्गदर्शन मागवले आहे.
> **- कुलदीप जंगम, सीईओ जि.प.**

# शेळ्यांना पाणी पाजायला गेलेल्या चिमुरड्याचा नदीत बुडून मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील होनमुर्गी परिसरात एका हृदयद्रावक घटनेने खळबळ उडाली आहे. शाळा सुटल्यानंतर मित्रांसोबत शेळ्या चारण्यासाठी गेलेल्या एका पाचवीतील विद्यार्थ्याचा सीना नदीच्या पात्रात बुडून मृत्यू झाला.



समर्थ कोळी (वय अंदाजे १०-११ वर्षे) असे या मृत मुलाचे नाव असून, या दुर्घटनेत त्याच्या इतर दोन मित्रांना सुदैवाने वाचवण्यात यश आले आहे. शनिवारी दुपारी शाळा सुटल्यानंतर समर्थ आणि त्याचे तीन मित्र-मैत्रिणी आपल्या शेळ्या घेऊन रानात गेले होते. दुपारच्या कडक उन्हामुळे तहानलेल्या शेळ्यांना पाणी पाजण्यासाठी हे सर्वजण सीना नदीच्या पात्राजवळ पोहोचले. सध्या नदी दुधडी भरून वाहत असून पाण्याचा प्रवाह अत्यंत वेगवान आहे. शेळ्यांना पाणी पाजत असताना, उन्हाच्या तडाख्यामुळे या चिमुरड्यांना नदीत पोहण्याचा मोह झाला. पाण्याचा अंदाज न आल्याने तिघेही मित्र नदीच्या पात्रात उतरले. मात्र, पाण्याचा प्रवाह प्रचंड असल्याने तिघेही वाहून जाऊ लागले. यावेळी काठावर असलेल्या त्यांच्या सोबतच्या मुलीने आरडाओरडा केल्याने परिसरातील नागरिकांनी तातडीने धाव घेतली. एकाचा अंत, दोघांना जीवदान स्थानिकांनी प्रसंगावधान राखून पाण्यात उडी घेतली आणि वाहून जाणाऱ्या दोन मुलांना सुखरूप बाहेर काढले. मात्र, समर्थ पाण्याचा वेग जास्त असल्याने खोलवर ओढला गेला. बराच वेळ शोध घेतल्यानंतर त्याचा मृतदेह हाती लागला. होनमुर्गी गावातील एका उमद्या शाळकरी मुलाचा अशा प्रकारे अंत झाल्याने संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे. पालकांनी पावसाळ्यात दुथडी भरून वाहणाऱ्या नद्यांपासून मुलांना लांब ठेवावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# डॉ. आंबेडकर जयंतीची मिरवणूक रविवारीच निघणार

- भारतरत्न डॉ.आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव समितीची घोषणा
- एक बेस, एक टॉप, क्लिअर साऊंड राहणार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ एप्रिल-**

सोलापूर शहरात विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवानिमित्त मंगळवार, दि.२१ एप्रिल नव्हे तर रविवार दि.१९ एप्रिल २०२६ रोजी मिरवणूक काढण्यात येणार आहे. एक बेस, एक टॉप, क्लिअर साऊंड या मिरवणुकीत राहणार आहे, अशी माहिती भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती उत्सव समितीचे राजाभाऊ सरवदे, राजाभाऊ इंगळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव समितीने काही दिवसांपूर्वी पारंपारिकरित्या रविवारी ऐवजी मंगळवारी मिरवणूक काढण्याचा निर्णय जाहीर केला होता. परंतु रविवारीच मिरवणूक काढण्यासंदर्भात लोकभावना व्यक्त झाली होती. याबाबत पोलिस प्रशासनाशी चर्चा करुन हा निर्णय घेण्यात आला. मंत्री, अधिकाऱ्यांच्या वाहनांचा ताफा मिरवणुकीत येणार नाही यावरही चर्चा करण्यात आली.

गेल्या दोन वर्षापासून डॉ.आंबेडकर जयंती मिरवणुकीचे दोन मार्ग सुरू झाले होते.

काही मंडळांच्या मनमानीपणामुळे अनेक मंडळांना आपली मिरवणूक पुढे जाता येत नसल्याच्या तक्रारी होत्या. काही मंडळांच्या मी पणामुळे इतर मंडळांच्या मिरवणुका पुढे जाण्यात अडथळा निर्माण होत होता. एकाच ठिकाणी काही मंडळे तळ ठोकून थांबत होती. यामुळे अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत होते, असेही त्यांनी सांगितले.

आता एक मार्ग एक परवाना तोही पारंपारिक मार्ग राहणार आहे. प्रत्येक मंडळास पंधरा मिनिटाची समान संधी प्रत्येक चौकात देण्यात येणार आहे. रविवारी सकाळी ११.३० वाजता मिरवणुकीस प्रारंभ करण्यात येणार आहे.

मरिआई चौक, श्री सिद्धेश्वर मंदिर मार्गे आणि डफरीन चौक मार्गे येणाऱ्या प्रत्येकी एक-एक मंडळास डॉ.आंबेडकर चौकातून पुढे जाता येईल, असे नियोजन करण्यात येत आहे.

या पत्रकार परिषदेस सुबोध वाघमोडे, ॲड.संजीव सदाफुले, प्रवीण निकाळजे, के.डी.कांबळे, राजा कदम, शशिकांत कांबळे, अरुण भालेराव, लौकिक इंगळे, विनीत गायकवाड, योगेश कांबळे, अजित गायकवाड, सुग्रीव जेटीथोर, शिवम सोनकांबळे, पृथ्वीजित सरवदे, प्रबुध्दकुमार दोड्यानूर आदी उपस्थित होते. दरम्यान, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथील मंडपाचे पूजन विश्वस्तांच्या हस्ते करण्यात आले.

### एकूण ४८५ मंडळांपैकी २१० मंडळ काढणार मिरवणूक

भीम जयंती उत्सवामध्ये एकूण ४८५ मंडळे आहेत. त्यापैकी २१० मंडळांकडून मिरवणूक काढण्यात येते. पूर्वी बैलगाड्यांमधून मिरवणूक काढण्यात येत होती. आता तो प्रवास कंटेनरपर्यंत पोहोचला आहे. १३ एप्रिलच्या मध्यरात्री १२ वाजता विविध मंडळाकडून प्रतिमेची प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. रविवार दि.१९ एप्रिल रोजी भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.

### मिरवणुकीचा पारंपारिक मार्ग राहणार असा

पार्क स्टेडियम जवळील विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून व सामुदायिक बुध्दवंदना घेऊन मिरवणुकीस प्रारंभ करण्यात येणार आहे. डफरीन चौक, जुना एम्प्लॉयमेंट चौक, वाडिया हॉस्पीटल, चांदणी चौक, महापौर निवास, स्टेशन चौक, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक, सुपर मार्केट, मेकॅनिक चौक, नवी पेठ, दत्त चौक, माणिक चौक, सोन्या मारुती चौक, मधला मारुती, मंगळवार पेठ, चाटी गल्ली, बाळीवेस, तरटी नाका पोलिस चौकी, छत्रपती शिवाजी महाराज चौक या मार्गावरुन ही मिरवणूक निघणार आहे. बुधवार पेठ परिसरातील मिलिंद नगर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर अस्थीविहार प्रेरणाभूमिसमोर पंचाची चावडी येथे मिरवणूकीची सांगता होईल.

## थोडक्यात...

### उत्पादनांचे स्थान भक्कम करण्यासाठी अनेकविध प्रयत्न करावे लागतात

**सोलापूर, दि.६ एप्रिल-**

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्वतःच्या उत्पादनांचे स्थान भक्कम करण्यासाठी अनेकविध प्रयत्न करावे लागतात. जागतिक बाजारपेठेत स्वतःचे स्थान निर्माण करण्यासाठी सर्टिफिकेशनचा उपयोग होतो, असे प्रतिपादन ज्येष्ठ सर्टिफिकेशन तज्ज्ञ व युरोफिन्सचे स्वप्नील सावजी यांनी केले. युरोफिन्स, टीडीएफ, सोलापूर गारमेंट मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, नारायणा स्कूल, पॉवरलूम डेव्हलपमेंट अँड एक्स्पोर्ट कौन्सिल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या 'इंटरनॅशनल सर्टिफिकेशन फॉर एक्स्पोर्ट रेडीनेस' या विषयावरील परिसंवादात ते बोलत होते. यावेळी टीडीएफचे अध्यक्ष सिध्देश्वर गड्डम, गारमेंट मॅन्युफॅक्चरर्सचे अध्यक्ष सतीश पवार, युरोफिन्सचे जीएम सुनील गुप्ता, देवेंद्रप्पा नगराल, पॉवरलूम डेव्हलपमेंट ॲन्ड एक्स्पोर्ट प्रमोशन कौन्सिलचे सहायक संचालक पंकेश चिपकर, नारायणा स्कूलच्या प्राचार्या परवीन जमादार, सुजय निकते उपस्थित होते.

### 'भाजपा'प्रणित ओबीसी मोर्चाच्या शहराध्यक्षपदी विजय महिंद्रकर

**युवा मोर्चाच्या अध्यक्षपदी कुडक्याल**

**सोलापूर, दि.६ एप्रिल-**



भारतीय जनता पार्टीप्रणित ओबीसी मोर्चाच्या शहराध्यक्षपदी विजय महिंद्रकर तर ओबीसी युवा मोर्चाच्या अध्यक्षपदी अविनाश कुडक्याल यांची एकमताने निवड करण्यात आली. भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांनी ही निवड जाहीर केली अन्य पदाधिकारी असे; उपाध्यक्ष-भीमाशंकर बिराजदार, अनिल उपरे, संतोष गायकवाड, बालाजी भिंगारे, अमोल टाकळीकर, सरचिटणीस-सिध्दाराम खजूरगी, विठ्ठल सरवदे, अंबादास सकीनाल, कार्यकारिणी सदस्य-द्वारकाधीश क्षीरसागर. मंडलनिहाय अध्यक्षांची नावे याप्रमाणे; शहर उत्तर पूर्व-अमरनाथ सामल, शहर उत्तर मध्य-अजय उदगिरी, शहर उत्तर पश्चिम-अनिकेत परदेशी, शहर मध्य पूर्व-विकास बसुदे, शहर मध्य मध्य-सागर म्हेत्रे, शहर मध्य पश्चिम-अमित माकणे, दक्षिण पूर्व-अंबादास लोकुर्ते, दक्षिण मध्य-मनीष गंजाळकर, दक्षिण पश्चिम-विजय काळे.




### चन्नवीर चिट्टे मित्र परिवारच्या वतीने स्व. अनिल दासरी स्मृत्यर्थ पाणपोई

**सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

भाजपा स्थापना दिनाचे औचित्य साधून चन्नवीर चिट्टे मित्र परिवाराच्या वतीने भवानी पेठ येथे 'पाणपोई' सुरू करण्यात आली. स्व.अनिल दासरी यांच्या स्मरणार्थ सुरु करण्यात आलेल्या या पाणपोईचे उद्घाटन डॉ.आनंद आलुरे, भाजपाचे ज्येष्ठ कार्यकर्ते नरसप्पा पुजारी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी गुरुनाथ कोळी, कल्याण करजगी, श्रीनिवास दासरी, पप्पू क्षीरसागर, किरण वल्लाल, सद्दाम कोसगीकर, नितीन हलसगी, करण हलसगी, श्रीनाथ संदुपटला, अभिषेक वल्याळ, प्रथमेश ताटी, सोमनाथ कलशेट्टी, ओम जमादार साईनाथ सज्जे आदी उपस्थित होते.




### भाजपा स्थापना दिनादिवशी नगरसेवक किसन जाधव यांच्याकडून प्रेरणादायी संदेश

**सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

सोलापूर महानगरपालिका प्रभाग क्रमांक २२ येथे भारतीय जनता पार्टीचा स्थापना दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. रेल्वे लाईन परिसरातील सोनामाता प्रशालेसमोर असलेल्या नगरसेवक किसन जाधव यांच्या संपर्क कार्यालयासमोर भाजपा ध्वजाचे विधिवत ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ.केशव हेडगेवार आणि राष्ट्रीय जनसंघाचे सहसंस्थापक पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमांचे पूजन करून झाली. ४६ वर्षे समर्पणाची, ४६ वर्षे राष्ट्रसेवेची या भावनेतून साजऱ्या करण्यात आलेल्या या कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. नगरसेवक किसन जाधव, नगरसेविका चैत्राली गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते शिवराज गायकवाड, युवा नेते चेतन गायकवाड यांच्या हस्ते मिठाई वाटप करण्यात आले. याप्रसंगी माणिक कांबळे, वसंत कांबळे, फिरोज पठाण, राम शिवप्पा गायकवाड, वैभव प्रचंडे यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते उपस्थित होते.



**सोलापूर : भारतीय जनता पार्टीच्या स्थापना दिनानिमित्त भाजपाच्या सोलापूर शहराध्यक्षा तथा नगरसेविका रोहिणी तडवळकर यांनी सोमवारी दैनिक तरुण भारतच्या कार्यालयास सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी कार्यकारी संचालक तथा समूह मुख्य संपादक दिलीप पेठे यांच्या हस्ते त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी मुख्य संपादक प्रशांत माने, राम तडवळकर उपस्थित होते.**

## नूतनीकृत कामांचे पालकमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ एप्रिल-**

महापालिका अंतर्गत जिल्हा वार्षिक योजनेतून सन २०२५-२०२६ च्या निधीमधून सोलापूर मनपाच्या मालकीच्या कोटणीस कॉम्पलेक्स येथे अंतर्गत नूतनीकरण कामांचे उद्घाटन पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी आमदार देवेंद्र कोठे, महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, स्थायी समितीच्या सभापती रंजीता चाकोते, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, नगरसेविका रोहिणी तळडवकर, नियंत्रण अधिकारी तपन डंके, कनिष्ठ अभियंता चेतन प्रचंडे, हेडगेवार रक्तपेढीचे सुहास जोशी, मिलिंद फडके, प्रकाश कुलकर्णी, अभिजित टाकलीकर, माधव देशपांडे आदी उपस्थित होते.

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त**

## लहान मुलांसाठी मोफत हृदय तपासणी, शस्त्रक्रिया शिबिर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त लहान मुलांसाठी रविवार, दि.१२ एप्रिल रोजी सोलापूर जिल्हा सामान्य रुग्णालयात सकाळी १० ते ४ वाजेपर्यंत २ डी इको मशीनद्वारे मोफत हृदय तपासणी, शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आल्याची माहिती शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांनी पत्रपरिषदेत दिली.

आजपर्यंत अशा शिबिरातून १० हजार पेक्षा जास्त बालकांवर शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातील लहान मुलांसाठी मोफत २डी इको तपासणी आणि हृदय शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले असून, गरजू रुग्णांना याचा लाभ घेण्याचे आवाहन शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख मंगेश चिवटे यांनी केले आहे.

शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष, डॉ. श्रीकांत शिंदे फाऊंडेशन, ज्युपिटर हॉस्पिटल (ठाणे), आरोग्यदूत फाऊंडेशन आणि शिवसेना सोलापूर जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर पार पडणार आहे. या शिबिरासाठी प्रमुख तज्ज्ञ डॉक्टर डॉ. आशुतोष सिंग आणि डॉ. पुजा सिन्हा उपस्थित राहणार आहेत.

२डी इको शिबिरामध्ये ज्या बालकांसाठी पुढे शस्त्रक्रिया करायच्या आहेत, त्यांची मोफत शस्त्रक्रिया जुपिटर हॉस्पिटल, ठाणे या ठिकाणी मोफत होतील. आरोग्य शिबिरासाठी सिव्हिल सर्जन डॉ. वर्षा डोईफोडे या सहकार्य करत आहेत. या पत्रकार परिषदेस शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे कार्याध्यक्ष रामहरी राऊत, एकनाथ स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे प्राचार्य बापूसाहेब अडसूळ, मनिष काळजे, सुरज जम्मा आदी उपस्थित होते.

## प्रत्येक राशींच्या व्यक्तींनी इष्टदेवतेची उपासना करावी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ६ एप्रिल -**

उपसना नियमित अखंड असायला हवी. दुःखात देवाची आठवण होते, सुखात नाही. प्रत्येक राशीच्या व्यक्तीनी इष्टदेवतेची उपासना करावी. सदगुरुंची उपसना सर्वश्रेष्ठ आहे सदगुरू ची उपासना नियमीत करा आपल्या वरचे सर्व संकटे टळतात. यशाची सारी दारे सदगुरू च्या उपासनेमुळे उघडली जातात, असे प्रतिपादन ह.भ.प. माधव कुलकर्णी यांनी केले.

वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान येथे समर्थाच्या १४८ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित धर्म संकीर्तन महोत्सवात ३ रे पुष्प गुंफताना ह.भ.प. माधव कुलकर्णी यांनी प्रवचनसेवा स्वामी चरणी सादर केली. ह.भ.प.माधव कुलकर्णी यांनी प्रत्येक राशीच्या व्यक्तीचे स्वभाव वैशिष्टे बलस्थाने, कमतरता सांगितली. प्रत्येक राशीच्या जातकांनी इष्टदेवतेची उपसना उपाय सांगितले. सर्वात श्रेष्ठ सदगुरुची उपासना भक्ती करा. सदगुरू तुमची संकटे दुर करतील असे मत प्रवचन सेवेत ह भ प कुलकर्णी यांनी व्यक्त केले .

ह.भ.प.माधव कुलकर्णी यांचा सत्कार वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान मंदिर समिती चेअरमन महेश इंगळे यांच्या हस्ते सचिव आत्माराम घाटगे विश्वत महेश गोगी उज्वलाताई सरदेशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.

याप्रसंगी प्रथमेश इंगळे, प्रा.शिवशरण अचलेर, प्रसाद पाटील, श्रीशैल गवंडी, मनोज जाधव, ऋषी लोणारी, स्वामी लोणारी, काशीनाथ इंडे, बाळासाहेब कुलकर्णी, राजु भोसले, महादेव तेली, लक्ष्मण पाटील, प्रसाद सोनार, अशोक कडगंची, ओंकार पाठक, अक्षय सरदेशमुख, गिरिष पवार, संजय पवार, रमेश शिंदे, सुनिल पवार, बाळासाहेब एकबोटे यांच्यासह स्वामीभक्त उपस्थित होते.





# तंत्र-मंत्र, अंगारे-धुपारे यांच्या नावाखाली महिलांचे मोठ्या प्रमाणात शोषण : आडम

**'माकपा'ने केले भोंदू अशोक खरात याच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ एप्रिल -**

तंत्र-मंत्र, अंगारे-धुपारे यांच्या नावाखाली महिलांचे व सर्वसामान्य नागरिकांचे मोठ्या प्रमाणात शोषण सुरू आहे. अशोक खरात याच्या प्रकरणात अनेक लोकप्रतिनिधी, अधिकारी व मंत्री सामील असल्याचे समोर येत असून, ही अत्यंत गंभीर बाब आहे, असे रोखठोक प्रतिपादन माजी आमदार नरसय्या आडम यांनी केले.

राज्यात वाढत चाललेल्या अंधश्रध्दा, तंत्र-मंत्र आणि बुवाबाजीच्या नावाखाली होत असलेल्या शोषणाविरोधात माकपा अर्थात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी कुख्यात भोंदू अशोक खरात प्रकरणाच्या निषेधार्थ करत त्याच्या प्रतिकात्मक पुतळ्याला फाशी देऊन दहन करण्यात आले.

या प्रकरणात सामील असलेल्या ३९ आमदारांची नावे जाहीर करून त्यांचे तत्काळ राजीनामे घ्यावेत. संविधानाने अपेक्षित केलेला वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारण्याऐवजी काही लोकप्रतिनिधी अंधश्रध्देला खतपाणी घालत आहेत. त्यामुळे समाजात चुकीचा संदेश जात आहे, असेही ते म्हणाले.

यावेळी महिला संघटनेच्या राज्याध्यक्ष नसीमा शेख, माकपाच्या राज्य कमिटी सदस्या नलिनी कलबुर्गी, राज्य सचिव मंडळ सदस्य एम.एच.शेख, जिल्हा सचिव युसुफ शेख आदींनी आपल्या भाषणातून अंधश्रध्दा, बुवाबाजी यांसह शासनाच्या चुकीच्या धोरणांविरुध्द आगपाखड केली. निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांना शिष्टमंडळाद्वारे निवेदन सादर करण्यात आले.

या आंदोलनात लिंगव्वा सोलापुरे, शकुंतला पाणीभाते, अफसाना बेग, दत्ता चव्हाण, ॲड.अनिल वासम, व्यंकटेश कोंगारी, रंगप्पा मरेड्डी, हनिफ सारखेड, फातिमा बेग, विल्यम ससाणे, दाऊद शेख, नरेश दुगाणे, दीपक निकंबे, विक्रम कलबुर्गी, अकील शेख, वीरेंद्र पद्मा, बालकृष्ण मल्याळ, विजय हरसुरे, बापू साबळे, रफिक काझी, बालाजी तुम्मा, सनी शेट्टी, बजरंग गायकवाड आदी सामील झाले होते.

### मुख्य मागण्या

अशोक खरातसह त्याला समर्थन देणाऱ्या सर्व लोकप्रतिनिधी व सहकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. राज्यभरातील भोंदू बाबांविरोधात विशेष मोहीम राबवावी. प्रत्येक पोलीस ठाण्यात अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष स्थापन करावा. जादूटोणा विरोधी कायद्याचे नियम तात्काळ तयार करून कठोर अंमलबजावणी करावी.सोशल मीडियावरील अंधश्रद्धा पसरवणाऱ्या जाहिरातींवर बंदी घालावी व नियमनासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करावी. अंधश्रद्धा व जादूटोणा विरोधी कायदा २०१३ साठी नियम तातडीने लागू करावेत.



**सोलापूर शहरात सोमवारी सकाळी पुनम गेट समोर अखिल भारतीय सफाई मजदूर युनियन सोलापूर शहर यांच्या वतीने राज्य सरकार सफाई कर्मचाऱ्यांच्या विविध विविध प्रलंबित मागण्यासाठी आंदोलन करण्यात आले. (छायाचित्र केवल तिवारी)**

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर | मंगळवार, ७ एप्रिल २०२६
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


# पुढील वर्षभरात 'भाजपा'चे नवे कार्यालय

- पालकमंत्री गोरे यांनी व्यक्त केला संकल्प
- भाजपा स्थापना दिनानिमित्त ध्वजारोहण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

पुढील वर्षभरात सोलापूर शहर जिल्हा 'भाजपा'चे नवे कार्यालय उभे करण्याचा संकल्प पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केला. भारतीय जनता पक्षाच्या ४६ व्या स्थापना दिनानिमित्त पोटपाडी चौकातील भाजपा कार्यालयात आयोजित ध्वजारोहण कार्यक्रमात ते बोलत होते.

व्यासपीठावर आमदार देवेंद्र कोठे, भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, महापौर विनायक कोंड्याल, माजी आमदार दिलीप माने, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, स्थायी समितीच्या सभापती रंजीता चाकोते यांची प्रमुख उपस्थिती होती. पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, भारतीय जनता पक्षाने स्थापनेपासूनच राष्ट्रप्रथम ही विचारधारा स्वीकारत आपल्या कार्यकर्त्यांमध्ये रुजवली आहे. सेवा, समर्पण आणि संघटन या तत्त्वांवर आधारित कार्यपध्दतीमुळे भारतीय जनता पक्ष जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष म्हणून ओळखला जातो.



भाजपाने अवघ्या दोन खासदारांवरुन ३०० खासदार संख्येपर्यंत मजल मारली आहे. महाराष्ट्रात पुन्हा एकदा मोठ्या संख्येने आमदार निवडून आले आहेत. सोलापूर महानगरपालिकेत ८७ नगरसेवक निवडून आणले. नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्यांमध्ये एकहाती सत्ता आणली. पक्षाचा प्रचंड मोठा विस्तार होत आहे. लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना पक्षाचे काम अधिक विस्तृत आणि प्रशस्त जागेत करता यावे. त्यांना सन्मानाने बसण्याची जागा असावी या उद्देशाने प्रशस्त कार्यालय उभारण्याचा संकल्प करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

### अपुरी जागा अन् टाळ्यांचा कडकडाट

भाजपाच्या स्थापनेपासून सोलापूर महानगरपालिकेच्या इतिहासात प्रथमच प्रचंड मोठ्या संख्येने भाजपाचे नगरसेवक निवडून आले आहेत. सोलापूर महानगरपालिकेची निवडणूक झाल्यानंतर प्रथमच झालेल्या पक्षाच्या स्थापना दिनाच्या कार्यक्रमास प्रचंड मोठी गर्दी झाली होती. जमलेल्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या संख्येच्या तुलनेत भाजपा कार्यालयातील जागा अपुरी पडली. परिणामी, अनेक कार्यकर्त्यांना कार्यालयाच्या प्रवेशद्वारात उभे राहून मान्यवरांची भाषणे ऐकावी लागली. दरम्यान, पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आपल्या भाषणातून भाजपाच्या नव्या कार्यालयाचा संकल्प बोलून दाखवताच उपस्थितांनी टाळ्यांचा एकच कडकडाट केला.

## थोडक्यात...

### शिवीगाळ केल्याबाबत जाब विचारल्याने मारहाण

**सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

शिवीगाळ केल्याबाबत जाब विचारण्यास गेले असता दोघांनी शिवीगाळ करुन कोयत्याने व लोखंडी पाईपने मारहाण केल्याची घटना घडली आहे. यात हकीकत अशी की, दि. ५ एप्रिल रोजी मुजम्मिल उर्फ उमर मूर्तज सय्यद (वय-२०, रा. बोरामणी नाका, सोलापूर) यांच्या भावजीला शिवीगाळ केल्याबाबत जाब विचारण्यास गेले असता कैफ जमखंडी व अझरुद्दीन जमखंडी (रा. तेलंगी पाच्छा पेठ) यांनी मुजम्मिल याला शिवीगाळ करून कैफ जमखंडी याने कोयत्याने उजव्या हातावर मारून जखमी केले. अझरुद्दीन जमखंडी याने लोखंडी पाईपने व मुजम्मिल यांना व सलमान यास मारहाण करून जखमी केले. याबाबत दि.५ एप्रिल रोजी जेलरोड पोलिस ठाण्यात दोघांविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास राठोड करत आहेत.

### माहेरुन पैसे घेऊन ये म्हणत विवाहितेचा केला छळ

**सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

लग्नात मानपान केला नाही, हुंडा दिला नाही, गाडी दिली नाही, माहेरुन सोने व घर घेण्यासाठी पैसे घेऊन ये, असे म्हणत पती व सासऱ्याने विवाहितेला शारीरिक व मानसिक त्रास दिल्याची घटना घडली. यात हकीकत अशी की, एप्रिल २०२५ ते २३ जानेवारी २०२६ दरम्यान जावेद पती, इसाक सासरे, रा. नन्हेगाव, जि. सोलापूर यांनी हिनाकौसर जावेद शेख, रा. २४३ एकता नगर सोलापूर यांना लग्नात मानपान केला नाही, हुंडा दिला नाही, गाडी दिली नाही, तू माहेरून ५ लाख रुपये घेऊन ये, सोने व घर घेण्यासाठी पैसे घेऊन ये असे बोलून शारीरिक व मानसिक त्रास दिला. याबाबत दि. ५ एप्रिल रोजी जेलरोड पोलिस ठाण्यात दोघां विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास कांबळे करत आहेत.

### मागील भांडणाचा राग; फायटर व कोयत्याने मारहाण

**सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

मागील झालेल्या भांडणाचा राग मनात धरून एका व्यक्तीस फरशी, फायटरने मारून जखमी केले. तर त्याच्या भावाला कोयत्याने मारून जखमी केल्याची घटना सोलापूर शहरात घडली आहे.



यात हकीकत अशी की, दि.५ एप्रिल रोजी अझरुद्दीन महबूब जमखंडी (रा.तेलंगी पाच्छा पेठ, सोलापूर) हे घरी असताना सलमान सय्यद (रा. रविवार पेठ, सोलापूर) याने मागील झालेल्या भांडणाचा राग मनात धरून अझरुद्दीन यांना फरशीने कपाळावर, फायटरने बरगडी, नाकावर व पायावर मारून जखमी केले. अझरुद्दीन यांचा भाऊ कैफ यास कोयत्याने उजव्या पायाचा पोटावर मारून जखमी केले. याबाबत दि. ५ एप्रिल रोजी दोघांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास मस्के करत आहेत.

### ट्रॅक्टर चालकाने दिली दुचाकीला धडक


**सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

हैदराबाद ते पुणे हायवेवर जाणाऱ्या ट्रॅक्टर च्या चालकाने वेगाने येऊन एका दुचाकीच्या समोरील चाकास धडक दिल्याने त्यात ते जखमी झाले आहेत. दि. ५ एप्रिल रोजी हैदराबाद रोड ते पुणे हायवे रोडवर जाणारा ट्रॅक्टर क्रमांक २८७५ च्या अज्ञात चालकाने वेगाने येऊन उमेश रेवणसिद्ध चोल्ले (वय-५०, रा.महालक्ष्मी सोसायटी, शेळगी, सोलापूर) यांच्या दुचाकी क्रमांक एमएच १३ बी एफ ९५३५ ला समोरील चाकास धडक दिल्याने त्यात ते जखमी झाले आहेत. याबाबत जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात दि.५ एप्रिल रोजी अज्ञात ट्रॅक्टर चालका विरोधात गुन्हा दाखल आहे. तपास रुपनर करत आहेत.

# निधी वाटपाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर; ६०/४० टक्के फॉर्म्युल्याची जिल्हा परिषदेत चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ मार्च-**

जल्हा परिषद सदस्यांना निवडून येऊन जवळपास दोन महिने उलटले असतानाही विकास कामांसाठी आवश्यक निधी मिळालेला नाही. त्यामुळे सदस्यांमध्ये नाराजी वाढत असून, पूर्वीप्रमाणे '६०/४०' फॉर्म्युला पुन्हा लागू करावा, अशी मागणी जोर धरत आहे. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




सोमवारी पालकमंत्री जयकुमार गोरे सोलापूर दौऱ्यावर आले असून त्यांनी जिल्हा नियोजन सभागृहात विविध बैठका आयोजित केल्या आहेत. भाजपच्या कार्यक्रमानंतर होणाऱ्या या बैठकीत जिल्हा परिषद सदस्य आणि महानगरपालिकेतील नगरसेवक सहभागी होणार आहेत. विकास कामां मधील अडचणी, निधी वाटप आणि प्रलंबित प्रस्ताव या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा होणार असल्याची माहिती आहे. जिल्हा परिषदेत नुकतीच अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि विषय समिती सभापतींची निवड पूर्ण झाली आहे. १५ एप्रिल रोजी विषय समिती सदस्यांची निवड होणार असून २२ एप्रिलपासून पहिली सर्वसाधारण सभा होणार आहे. या सभेनंतर जिल्हा परिषदेच्या नव्या कामकाजाला अधिकृत सुरुवात होणार आहे. मार्च अखेर संपल्यानंतर प्रशासकीय खर्चाचा टप्पा संपुष्टात आला असून १ एप्रिलपासून नव्या आर्थिक वर्षातील खर्च मंजुरीची प्रक्रिया सुरू झाली आहे.

सेस फंडावर अध्यक्षांचा अधिकार राहणार असला तरी शासनाकडून मिळणाऱ्या विविध योजनांच्या निधीवर सदस्यांचे प्राधान्य असावे, अशी भूमिका सदस्यांनी घेतली आहे. गेल्या चार वर्षांत जिल्हा परिषदेत पदाधिकारी नसल्यामुळे प्रशासनाची सूत्रे अधिकाऱ्यांकडे होती. त्या काळात विविध समि त्यांमध्ये आमदार सदस्य म्हणून कार्यरत होते आणि त्यांच्या शिफारशीवर पालकमंत्र्यांकडून विकास कामांना मंजुरी दिली जात होती. आता निवडून आलेल्या सदस्यांना त्यांच्या मतदारसंघातील कामांसाठी अधिकार मिळावेत, अशी मागणी जोर धरत आहे. पूर्वी पदाधिकारी कार्यरत असताना राबवण्यात आलेल्या या पद्धतीनुसार ६० टक्के कामे सदस्यांच्या तर ४० टक्के कामे पालकमंत्र्यांच्या शिफारशीवर मंजूर होत होती. आता हाच फॉर्म्युला पुन्हा लागू झाल्यास सदस्यांच्या विकास कामांना गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

नवीन आर्थिक वर्षाच्या सुरुवातीलाच निधी वाटपाचा प्रश्न तापल्यामुळे या मुद्द्याला राजकीय रंग चढू लागला आहे. विशेषतः विकास कामांसाठी निधीची अपेक्षा असलेल्या सदस्यांकडून हा विषय आक्रमकपणे मांडला जात आहे. आता होणाऱ्या बैठकीत पालकमंत्री जयकुमार गोरे '६०/४० टक्के फॉर्म्युला पुन्हा लागू करण्याबाबत कोणता निर्णय घेतात, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### पूर्वीची कार्यपध्दती समजून घेत आहोत

पूर्वीची कार्यपद्धती समजून घेत आहोत. ६० / ४० टक्के फॉर्म्युलाबाबत अद्याप स्पष्टता नाही. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासोबतच्या बैठकीत यावर सविस्तर चर्चा केली जाणार आहे. असे जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी भूमिका स्पष्ट करताना सांगितले.

# धार्मिक भावना दुखावल्या प्रकरणी एकाविरुध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

शंकराबद्दल आक्षेपार्ह मेसेज सोशल मीडियावर प्रसारित करून धार्मिक भावना दुखावल्याबद्दल बोरामणी (ता.दक्षिण सोलापूर) गावातील तरुणाविरुद्ध तालुका पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गौस रहीम मुजावर असे त्या तरुणाचे नाव आहे.

बोरामणी येथील गौस मुजावर याने श्री शंभू महादेवाबद्दल व त्यांच्या भक्तांनाही उद्देशून आक्षेपार्ह मेसेज सोशल मीडियावर टाकला होता. सजिल रोजी रात्री गौसने त्याच्या त्याची वर आक्षेपार्ह मेसेज टाकला. त्याची गंभीर मागणी केली. श्रीराम प्रतिष्ठानच्या वतीने पोलिस अधी कार्यालयास निवेदन देण्यात आले. यावेळी नागेश विभूते, प्रवीण विभूत, परमेश्वर कुरकुटे, संतोष चेंडके, लखन साळुंके आदी उपस्थित होते. हिंदू-मुस्लिम धर्मातील एकोपा बिघडवत दोन धर्मांत तेढ निम्ग करण्याचा प्रयत्न करणाऱ्या गौसवर कठोर कारवाई करावी, अशी त्यांची प्रमुख मागणी होती. ब्रह्मनाथ महाराजांच्या जत्रेपूर्वी गौसने जाणीवपूर्वक हे कृत्य केल्याचाही आरोप श्रीराम प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी केला. सहायक पोलिस निरीक्षक कदम तपास करीत आहेत.

**गौसचा पोलिसांकडून शोध**

श्री शंभू महादेवाबद्दल आक्षेपार्ह पोस्ट फेसबुकवर टाकून धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या गौस मुजावरविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. २ एप्रिलपासून तो गावात फिरकलेला नाही. पोलिस त्याचा शोध घेत आहेत. चौकशीनंतर थेट न्यायालयात दोषारोपपत्र पाठविले जाणार आहे.

# आयटी पार्कला मोफत जागा देण्याचा मार्ग होणार मोकळा



**शासकीय दरानुसार जागेची किंमत ३ कोटी १६ रुपये**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ एप्रिल-**

सोलापुरात होटगी येथे साकारल्या जाणाऱ्या आयटी पार्कसाठी जलसंपदा विभागाकडून मोफत जागा घेण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. जलसंपदा विभागाने आतापर्यंत कोणालाही मोफत जागा दिलेली नाही. आयटी पार्कसाठी मोफत जागा देण्याबाबत सोलापूरच्या जलसंपदा विभागाने पुण्यातील जलसंपदाच्या वरिष्ठ कार्यालयाकडे मार्गदर्शन मागितले आहे. हे मार्गदर्शन आल्यानंतर आयटी पार्कला मोफत जागा देण्याबाबतचा मार्ग मोकळा होणार आहे. त्यानंतर जागा हस्तांतरणाची पुढील कार्यवाही केली जाणार आहे.

शासकीय दरानुसार या जागेची किंमत ३ कोटी १६ लाख रुपये एवढी आहे. ही जागा मोफत मिळाल्यास सोलापुरातील आयटी पार्क मध्ये उद्योजकांना स्वस्तात जागा मिळणार आहे. जलसंपदा विभागाच्या जागा देणे, दिलेल्या जागा रद्द करणे, जागांचे भाडे ठरविणे यासह मालमत्तेसंदर्भातील इतर निर्णय कृष्णा खोरे विकास महामंडळाचे नियामक मंडळ घेते. जलसंपदा विभागाकडून मार्गदर्शन आल्यानंतर मोफत जागेचा प्रस्ताव नियामक मंडळाकडे पाठविला जाणार असल्याचे सांगण्यात येते. जलसंपदा विभागाने यापूर्वी पर्यटन विकास महामंडळाला व लॉजिस्टिक पार्कला त्यांची जागा मोबदला घेऊन दिली आहे. लॉजिस्टिक पार्कच्या जागेवर आता आयटी पार्क उभारले जाणार आहे. ही जागा आयटी पार्कला देण्यापूर्वी लॉजिस्टिक पार्कला जागा देण्याचा झालेला निर्णय रद्द करण्याची आवश्यकता आहे. साधारणतः तीन महिन्यांतून एकदा नियामक मंडळाची बैठक होते. लॉजिस्टिक पार्कला दिलेली जागा रद्द झाल्यानंतरच आयटी पार्कच्या जागेचा प्रस्ताव मंजूर होणार आहे.




सोलापूर : जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयातील रस्त्याची दुरावस्था, प्रशासन या गोष्टीकडे पाहणार का? अशी नागरिकात चर्चा तथापि अप्पर जिल्हाधिकारी, महसूल कार्यालय, एसपी ऑफिस, या सर्व ऑफिसची वर्दळ सुरू आहे. नागरिकांना नाहक या खराब रस्त्याचा त्रास होत आहे. (छायाचित्र केवल तिवारी)

# घराकडे जात असताना चारचाकीने दिली धडक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ एप्रिल-**




राहत्या घराकडे जात असताना चार चाकी वाहन भरधाव चालवून एक व्यक्तीच्या वाहनास मागून धडक दिल्याने त्यात त्यांच्या डोक्याला, उजव्या खांद्याला, मार लागून दोन्ही हाताला खरचटुन करून जखमी केले आहे.

यात हकीकत अशी की, रमेश भीमाशंकर बडगंची (वय ६०, रा.एफ ग्रुप, जुना विडी घरकुल, सोलापूर) यांची दुचाकी क्रमांक एमएच १३ सीए झेडओ ०२८८ वरून राहत्या घराकडे जात असताना चंदन काटाजवळ रशीद महसूलदार (रा.जवळगा, लातूर) यांनी त्यांच्या ताब्यातील चारचाकी वाहन क्रमांक एमएच २४ बीएक्स ४४९५ ही भरधाव चालवून रमेश बडगंची यांच्या वाहनास मागून धडक दिल्याने त्यात त्यांच्या डोक्याला, उजव्या खांद्याला, मार लागून दोन्ही हाताला खरचटुन करून जखमी केले आहे. याबाबत दि. ५ एप्रिल रोजी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास माने करत आहेत.

# अखेर मंद्रूपचे ग्रामसेवक जोडमोटे यांचा पदभार काढला

## दक्षिणच्या बीडीओंनी घेतला पुढाकार | दैनिक तरुण भारतचे आहे लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.६ एप्रिल-**

दहा महिन्यापासून बदली होऊनही मंद्रूपचे ग्राम सेवक जोडमोटे यांचा रखडलेला पदभार कुशाबा इंगळे यांच्याकडे हस्तांतर करण्यात आला. दक्षिण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी मनोज राऊत यांनी सोमवारी ग्रामसेवक जोडमोटे यांना पदभार सोडण्याचे आदेश दिले. त्यामुळे दहा महिन्यापासून 'दैनिक तरुण भारत'ने पाठपुरावा केलेल्या बातमीला यश मिळाल्याचे दिसून येते.

जून महिन्यामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी जिल्ह्यातील ८४ ग्रामसेवकांची बदली केली होती. यावेळी मंद्रूपचे प्रभारी ग्रामसेवक नागेश जोडमोडे यांचीही बदली झाली असताना ते राजकीय दबाव आणून पदभार देण्यास तयार नव्हते.



बदली झालेले ग्रामसेवक कुशाबा इंगळे दोन वेळा पदभार घेण्यासाठी मंद्रूपला आले असतानाही ग्रामपंचायत सदस्यांनी पदभार न देताच त्यांना परत पाठवले होते. दक्षिणचे बीडीओ मनोज राऊत यांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन सोमवारी ६ एप्रिल २०२६ रोजी नागेश जोडमोटे यांचे पदभार काढून कुशाबा इंगळे यांच्याकडे हस्तांतर करण्याचे आदेश दिले. त्यानुसार विस्तार अधिकारी युसुफ पठाण यांनी उपस्थित राहून पदभार हस्तांतरण झाली.

**विविध योजना, कार्यक्रमांमुळे प्रक्रिया प्रलंबित**

मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी मंद्रूपचे ग्रामसेवक जोडमोटे यांची बदली केली होती. मात्र शासनाच्या विविध योजना व कार्यक्रमांमुळे पदभार प्रक्रिया प्रलंबित होती. यासाठी वारंवार पत्रव्यवहारही करण्यात आला होता. मात्र हस्तांतर रखडले होते. त्यामुळे सोमवारी विस्तार अधिकाऱ्यांच्या समक्ष ग्राम सेवकांचे पदभार हस्तांतरण प्रक्रिया झाली.

**मंद्रूपच्या विकासाला हातभार लावण्याची अपेक्षा**

ग्रामसेवक जोडमोटे हे स्थानिक असल्यामुळे मनम ानी कारभार करीत होते. निंबर्गी सजा असल्यामुळे मंद्रूप ग्रामपंचायत कार्यालयात क्वचितच दिसत होते. त्यामुळे ग्रामपंचायत कारभारामध्ये अस्ताव्यस्तपणा आला आहे. शिवाय कामकाजावरही नाराजी आहे.



# कडक निकषांमुळे अपात्र लाडक्या बहिणींचा लाभ बंद

## एप्रिलअखेर संपणार पडताळणी; मेपासून केवळ पात्र महिलांच्या खात्यात दरमहा १५०० रुपये

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या निकषांनुसार प्रत्येक लाभार्थी महिलेची पडताळणी झाली आहे. पात्र लाडक्या बहिणीनाच दरमहा १० तारखेपूर्वी १५०० रुपये दिले जाणार आहेत. आता ३० एप्रिलपर्यंत 'ई-केवायसी'तील त्रुटींच्या दुरुस्तीसाठी मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर मे महिन्यापासून निकषांत अपात्र ठरलेल्या सर्व महिलांचा लाभकायमचा बंद होईल, असे जिल्हा महिला व बालविकास कार्यालयाकडून सांगण्यात आले.

विधानसभा निवडणुकीत सोलापूर जिल्ह्यात १८ वर्षाकीत महिला मतदारांची संख्या १८ लाख ७७ हजारांपर्यंत होती. विधानसभा निवडनुकीपूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिदि यांनी सुरू केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत ११ लाख २१ हजार महिला लाभार्थी होत्या. योजनेच्या लाभासाठी २१ ते ६५ वर्षांतील महिलाच पात्र असताना देखील सोलापूर जिल्ह्यातील लाभार्थी महिलांची संख्या संशयास्पद होती. अशीच स्थिती राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात होती.

विशेष बाब म्हणजे राज्यातील अडीच कोटी महिलांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपये सुद्धा नाही, यावर प्रश्न उपस्थित झाला.

मात्र, जूनअखेर जाहीर झालेल्या योजनेचे अर्ज सप्टेंबरपर्यंत मागविण्यात आले आणि पुढे नोव्हेंबरमध्ये विधानसभा निवडणुका झाल्या. त्यामुळे पडताळणी होऊ शकली नाही. त्यानंतर लाभार्थींची योजनेच्या प्रत्येक निकषांनुसार पडताळणी करण्यात आली. त्यात अपात्र कोण ठरले, कोणाचा लाभ बंद झाला, याबाबत महिलांमध्ये संभ्रम आहे. मात्र, मे महिन्यात ज्यांना १५०० रुपये येणार नाहीत त्या महिला निकषांत अपात्र ठरल्या, असे समजावे लागेल, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

### महिला अपात्र ठरलेले प्रमुख निकष

- लाभार्थी महिलेच्या नावे किंवा कुटुंबाकडे चारचाकी वाहन
- केंद्र व राज्याच्या वैयक्तिक योजनेचा लाभ घेणाऱ्या महिला
- २१ वर्षांपेक्षा कमी आणि ६५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या महिला
- ई-केवायसी न केलेल्या आणि वार्षिक उत्पन्न अडीच लाखांवर असलेल्या महिला




### योजनेची सोलापूरची सद्यःस्थिती

| | |
|---|---|
| जिल्ह्यातील महिला मतदार | १८.७७ लाख |
| लाडकी बहिणीच्या लाभार्थी | ११,२०,५६३ |
| पडताळीत अंदाजे अपात्र | ३.५० लाख |
| ई-केवायसी चुकलेले | : ९८,०२१ |
| वयात अपात्र ठरलेल्या महिला | १८,८१२ |

### या' वेबसाइटवर शोधता येईल नाव

मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थींना आपले नाव यादीत या आहे की नाही, हे ladakibahin. maharashtra.gov.in वेबसाइटवर लॉगिन करून पाहता येते. 'अर्जदार लॉगिन' या पर्यायावर क्लिक करून त्याठिकाणी मोबाईल नंबर आणि पासवर्ड टाकावा लागतो. 'लाभार्थी यादी' किंवा 'अर्जाची स्थिती' हा पर्याय निवडून त्याठिकाणी आधार क्रमांक किंवा अर्ज क्रमांक टाकल्यावर आपले नाव त्या यादीत आहे की नाही, हे समजते.

---

## यात्रेहून परतणाऱ्या दांपत्याचे सोन्याचे दागिने लुटले

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.६ एप्रिल-**

तालुक्यातील कुसळंब गावाच्या शिवारात झटापट करुन दांपत्याकडील सोन्याचे दागिने हिसकावून नेल्याची घटना घडली असून, या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, प्रशांत अशोक मुंढे (वय २९, रा. राऊत चाळ, दत्तनगर, बार्शी) हे आपल्या पत्नी साक्षी यांच्यासह दि. ४ एप्रिल रोजी सायंकाळी येरमाळा (जि. धाराशिव) येथे देवीच्या यात्रेनिमित्त दर्शनासाठी गेले होते. दर्शन आटोपून ते दोघे सायंकाळी परत येत असताना सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास कुसळंब गावाच्या शिवारातील रस्त्यालगत असलेल्या पाण्याच्या टाकीजवळ आले. यावेळी काळ्या रंगाच्या मोटारसायकलवरुन आलेल्या दोन अज्ञात इसमांनी त्यांच्या स्कुटीच्या जवळ येत अचानक हल्ला केला. मोटारसायकल चालवणाऱ्या इसमाने प्रशांत मुंढे यांच्या अंगाला धक्का मारला. त्यानंतर मागे बसलेल्या इसमाने झटापट करत त्यांच्या पत्नीच्या गळ्यातील सुमारे १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण व कानातील २ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गुंड हिसकावले. तसेच दुसऱ्या इसमाने प्रशांत मुंढे यांच्या हातातील सुमारे ५ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी जबरदस्तीने काढून घेतली.

या दरम्यान आरोपींशी झटापट झाली असून त्यात प्रशांत मुंढे यांच्या डाव्या हाताला व तोंडाला दुखापत झाली आहे. घटनेनंतर दोन्ही आरोपी मोटारसायकलवरून शेतातील कच्च्या रस्त्याने पांगरीच्या दिशेने पळून गेले. पीडितांनी आरडाओरडा केल्यानंतर परिसरातील नागरिक घटनास्थळी जमा झाले. या घटनेत एकूण २.२ तोळे सोन्याचे दागिने लंपास करण्यात आले असून, प्रशांत मुंढे यांनी दोन अज्ञात चोरट्यांविरोधात तक्रार दाखल केली आहे. संबंधित आरोपी पुन्हा दिसल्यास ओळखू शकतो, असेही त्यांनी नमूद केले आहे. या प्रकरणी पोलीस पुढील तपास करत असून, आरोपींचा शोध सुरु आहे.

---

## होम मिनिस्टर कार्यक्रमातून कलागुणांना वाव : डॉ. जानकर



**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. ६ एप्रिल-**

महिलांसाठी आयोजित करण्यात आलेल्या 'होम मिनिस्टर' या स्पर्धेमुळे महिलांना आपल्या अंगभूत कलागुणांना वाव देण्याची संधी मिळाली असून या स्पर्धेत सहभागी झालेल्या महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत पैठणीसह विविध आकर्षक बक्षिसे जिंकावीत, असे प्रतिपादन वेळापूर ग्रामपंचायत सदस्या डॉ. स्नेहल जानकर यांनी केले.

वेळापूर येथील आराध्य दैवत अर्धनारी नटेश्वर यात्रेनिमित्त आमदार उत्तमराव जानकर यांच्या मार्गदर्शनाखाली बाजारतळ, वेळापूर येथे यात्रा कमिटीच्या वतीने आयोजित 'होम मिनिस्टर' कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या.

यावेळी व्यासपीठावर पंचायत समिती सदस्या विमलताई जानकर, जिल्हा परिषद सदस्या सौ. मीनाक्षी मिलिंद सरतापे, रिपाई तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, वेळापूरचे सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच नानासाहेब मुंगूसकर, दीपकआबा राऊत, अमृतराव माने देशमुख, रविराज गायकवाड, हनुमंत वायदंडे, सीमा खाडे, प्रियांका आडत, रहीम मुलाणी, काशिनाथ आडत, ॲड. विठ्ठल मंडले, रणजीत साठे, कार्याध्यक्ष अमोल मंडलिक, खजिनदार दादा तुपे, विनायक भगत, सचिव अभिजीत साठे, विजय पवार, मनोहर माने, शंकर आडत, धनंजय शिवपुजे, रणजीत सरवदे उपस्थित होते.

स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांमध्ये वैशाली मेहरे यांनी प्रथम क्रमांक पटकावत एलईडी टीव्ही व मानाची पैठणी मिळवली. पूजा सुतार यांनी द्वितीय क्रमांक मिळवत मिक्सर व मानाची पैठणी जिंकली, तर चांदणी घाडगे यांनी तृतीय क्रमांक पटकावत कुलर व मानाची पैठणी प्राप्त केली. तसेच रूपाली परशेट्टी, मनीषा म्हसवडे, मंजुषा भोसले, शितल बनसोडे, शिवानी सुतार, प्रियंका आडत व सौ. वैशाली पिसे यांनी मानाच्या पैठण्या जिंकल्या. विजेत्या स्पर्धकांना पं. स. सदस्या विमलजानकर, जि. प. सदस्या मीनाक्षी मिलिंद सरतापे, अनिता बनसोडे, प्रियंका आडत व सीमा खाडे यांच्या हस्ते बक्षिसे व मानाच्या पैठण्या देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन विठ्ठल मदने व रणजीत सरवदे यांनी केले.

---

## अर्धनारी नटेश्वर यात्रेनिमित्त गजी ढोल स्पर्धा उत्साहात



**तभा वृत्तसेवा**
**वेळापूर, दि. ६ एप्रिल-**

वेळापूर नगरीचे आराध्य दैवत अर्धनारी नटेश्वर यात्रेनिमित्त यात्रा कमिटी, वेळापूर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या गजी ढोल स्पर्धा मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडल्या. यात्रेच्या पार्श्वभूमीवर आयोजित या स्पर्धेला ग्रामस्थ व भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या स्पर्धेमध्ये एकूण दहा ढोल संघांनी सहभाग नोंदवत आपल्या दमदार तालांनी उपस्थित प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. ढोल-ताशांच्या गजरात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात झालेल्या या स्पर्धेमुळे यात्रेच्या उत्साहात आणखी भर पडली. स्पर्धेतील विजेत्या संघांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमास यात्रा कमिटीचे अध्यक्ष काशिनाथ आडत, सुरेश पिसे, धनंजय माने देशमुख, मिलिंद सरतापे, दीपक राऊत, महादेव मेहत्रे, यात्रा कमिटीचे उपाध्यक्ष ॲड. विठ्ठल मंडले, उपाध्यक्ष रणजीत साठे, कार्याध्यक्ष अमोल मंडलिक, खजिनदार दादा तुपे, सरचिटणीस विनायक भगत, सचिव अभिजीत साठे, सेक्रेटरी विजय पवार तसेच सदस्य मनोहर माने, चंद्रकांत बनकर, शंकर आडत, बाळासाहेब आडत, वसंत आडत आदींची उपस्थिती होती. स्पर्धेचे समालोचन दीपकआबा राऊत यांनी केले.

---

## कुमठे गावातून दुचाकी गेली चोरीला

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

कुमठे गावातून यांची होंडा कंपनीची एक्टिवा मोटरसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.या हकीकत अशी की, दि. २४ मार्च रोजी प्रसाद राजेंद्र नंदनगी, वय २५, रा. घर नंबर ९६, माळे गल्ली, कुमठे गाव, सोलापूर यांची काळ्या कलरची होंडा कंपनीची ५० हजार रुपयांची किमतीची एक्टिवा मोटरसायकल क्रमांक एम एच १३ इ एम ००७१ ही माळे गल्ली, कुमठे गाव येथून अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. याबाबत दि. ४ एप्रिल रोजी विजापूर नाका, पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास फुटाणे करत आहेत.

---

## शिंदे विद्यालयाचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा**
**टेंभुर्णी, दि. ६ एप्रिल-**

अकोले (खुर्द) (ता.माढा) येथील बबनरावजी शिंदे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी भारतीय अभिरूप शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले.





सातारा येथील भारतीय अभिरूप शिष्यवृत्ती परीक्षा संस्थेमार्फत २५ जानेवारी २०२६ रोजी घेण्यात आलेल्या या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवत उत्कृष्ट कामगिरी केली आहे. यामध्ये श्रेया पाटील हिने इयत्ता ५ वीमध्ये ३०० पैकी २३८ गुण मिळवत जिल्ह्यात १२ वा क्रमांक पटकावला. तसेच प्रभास शिंदे याने २३४ गुणांसह जिल्ह्यात १४ वा क्रमांक मिळवला. याशिवाय रणवीर पाटील याने २१८ गुण मिळवत केंद्रात प्रथम क्रमांक मिळवला, तर प्रतिक पाटील हिने २०८ गुण मिळवत केंद्रात द्वितीय क्रमांक प्राप्त केला. या यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक धनुसिंग रजपूत व जहागीरदार यांचे कौतुक होत आहे. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल करमाळा तालुक्याचे माजी आमदार तथा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजयमामा शिंदे, संस्थेचे सचिव व प्राचार्य राजेंद्र अभिमान ठोंबरे, संभाजी अनपट, प्राचार्या मधुरा सुरवसे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

---

## अंजनगाव (खे) येथील शिवरायांच्या पुतळ्याचे स्थलांतर

- लोकप्रतिनिधी जिल्हा प्रशासन व पोलिसांच्या शिष्टायला यश
- गावातील दोन्ही समाजाकडून समंजस्याची भूमिका

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ६ एप्रिल-**

माढा तालुक्यातील अंजनगाव खे येथे १ एप्रिल रोजी मध्यरात्री छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवल्यानंतर अंजनगाव खे येथील दोन गटात वादाला सुरुवात होऊन गेल्या चार दिवस गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. एक गट पुतळा बसवला आहे त्याच ठिकाणी ठेवण्यास आग्रही होता तर दुसरा गट पुतळा त्या ठिकाणाहून हटवण्यासाठी आग्रही होता या वादातून दोन्हीकडून आंदोलनाला सुरवात झाली होती. या आंदोलनाला गेली तीन दिवस काहीस हिंसक वळण लागले होते त्यातून गावात व परिसरात मोठे तणावाचे वातावरण निर्माण झाले. या सर्व घडामोडीवर नियंत्रण आणण्यासाठी लोकप्रतिनिधी व प्रशासनाच्या वतीने अविरतपणे प्रयत्न करण्यात येत होते. त्या प्रयत्नाला शनिवारी यश आले आणि सामंजस्य पद्धतीने छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा त्या ठिकाणाहून स्थलांतरित करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाने



मोठा बंदोबस्त तैनात केला होता.

पालकमंत्री जयकुमार गोरे माजी आमदार राजन पाटील आमदार अभिजीत पाटील जिल्हा प्रशासन व पोलीस प्रशासनाच्या शिष्टाईला व गावातील दोन्ही गटाने दाखवलेली समंजस्याची भूमिका हा वाद मिटण्यासाठी अतिशय महत्त्वाची ठरली आहे. शिवरायांच्या पुतळा सुशोभीकरणासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी १ कोटी रुपयांचा निधी देणार असल्याचे सांगितले.

पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी जिल्हाधिकारी एस कार्तिकेयन यांनी समन्वय आणि एकोप्याची भूमिका बजावत परिस्थिती सुरळीत करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. तसेच या घटनेत सोलापूर पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी अत्यंत संयम आणि समन्वयाची भूमिका घेत, दिलेल्या तोडग्यावर दोन्ही बाजूंच्या नागरिकांनी एकमत दर्शवले अंजनगाव (खे) येथील दोन्ही समाजातील नागरिकांनी दाखवलेला संयम आणि सहकार्य वाद मिटण्यास मोलाचा ठरला आहे. याप्रक्रियेत पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, पोलीस उपविभागीय अधिकारी अंजली कृष्णा, पोलीस अधिकारी प्रशांत डगळे, पोलीस उपाधीक्षक देवळेकर, प्रांताधिकारी जयश्री आव्हाड, तहसीलदार संजय भोसले, माढ्याचे पोलीस निरीक्षक राहुल शिंदेंनी, तसेच इतर प्रशासनातील अधिकाऱ्यांनी समन्वयाची भूमिका घेत शांतता राखण्याचे प्रयत्न केले.

### ग्रामस्थ बाबूराव माळी यांच्या हस्ते पुतळ्याचे पूजन

शनिवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास प्रशासनाच्या वतीने मंदिराच्या जागेतील पुतळा शिवभक्तांना मान्य असलेल्या जागेत स्थलांतरीत करण्याचे काम सुरु झाले. यासाठी महसूल व पोलिस यंत्रणेने गावातील पूर्ण परिसर ताब्यात घेतला होता. यावेळी संपूर्ण इंटरनेट सेवा बंद होती. पुतळा स्थलांतराचे चित्रण करण्यास निर्बंध घातले होते. यावेळी विशेष पोलिस महानिरीक्षक सुनील फुलारे,पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, प्रांताधिकारी जयश्री आव्हाड, पोलिस उपविभागीय अधिकारी अंजना कृष्णमूर्ती व तहसीलदार संजय भोसले, गुन्हे शाखेचे संजय जगताप व अंजनगाव खे. येथील ग्रामस्थ माळी व इतरांच्या हस्ते पुतळ्याचे पूजन करण्यात आले.

---

## महत्वाचे...



### तिफण राज्यस्तरीय उत्कृष्ट वाडमय पुरस्कार सोहळा

**बार्शी, दि. ६ एप्रिल-**

छत्रपती संभाजीनगर येथे एका कार्यक्रमात अरुण नवले यांच्या 'जागल' या ग्रामीण कादंबरीला उत्कृष्ट साहित्य निर्मिती पुरस्कार प्रदान करण्यात आला. तिफण साहित्य चळवळ ही महाराष्ट्रातील एकमेव ग्रामीण साहित्य चळवळ आहे. याप्रसंगी अध्यक्ष डॉ. वासुदेव मुलाटे लेखक, समिक्षक, प्रमुख पाहुणे डॉ.ललिता गादगे जेष्ठ लेखिका, डॉ. सर्जेराव जिगे, प्रा मच्छिंद्र गोडे, प्रा डॉ. रमेश जाधव, प्रा. डॉ. रामचंद्र झाडे, तिफा तिफण मासिकाचे संपादक प्रा. डॉ शिवाजी हुसे, पुरस्कार प्राप्त लेखक, इतर मान्यवर, साहित्यिक यांच्या उपस्थितीत ग्रामीण लेखक अरुण नवले यांना सन्मानित करण्यात आले. शाल.सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, पुस्तक देऊन त्यांना गौरविण्यात आले. अरुण नवले यांच्या कादंबरीला हा चौथा पुरस्कार आहे. साहित्य रसिकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. आतापर्यंत साहित्य क्षेत्रांतील महत्त्वाचे पुरस्कार त्यांना प्राप्त झाले आहेत.



### कन्हेरगाव ग्रामस्थांकडून संयुजा जाधवचा सत्कार

**टेंभुर्णी, दि. ६ एप्रिल-**

कन्हेरगाव येथील रहिवासी असलेल्या संयुजा संजय जाधव (रा. भांडगाव) हिची पिंपरी-चिंचवड शहर पोलिस दलात निवड झाल्याबद्दल गावकऱ्यांच्या वतीने तिचा उत्साहात सत्कार करण्यात आला. हा सत्कार समारंभ माजी ग्रामपंचायत सदस्य संपत चव्हाण यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आला होता. रामोशी वस्तीमध्ये जय मल्हार संघटनेच्या वतीने हा कार्यक्रम पार पडला. यावेळी संयुजा जाधव हिचा पुष्पहार, शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास धनंजय मोरे, किसनराव खोचरे, मनीषा चव्हाण, दशरथ चव्हाण, संजय जाधव, संजय उर्फ बाळासाहेब डोके-पाटील, अशोकराव लांडगे, अनिल चव्हाण, कुमार चव्हाण, उमेश चव्हाण, गणेश जाधव, दादासाहेब चव्हाण, सुरेश माने, महादेव जाधव, दिनकर चव्हाण, सुनील चव्हाण, सुधीर चव्हाण, सुरज जाधव, तानाजी वीर, हनुमंत पाटोळे, आनंदा चव्हाण, बानू चव्हाण, सुलभा जाधव, राधाबाई माने, सुमन चव्हाण, सुरेखा चव्हाण, रूपाली चव्हाण, कल्पना चव्हाण, कोमल जाधव, मनीषा जाधव, वैशाली माने, प्रियंका मदने, प्रियंका चव्हाण, रेश्मा चव्हाण, शकुंतला चव्हाण, यमाई जाधव, बायडाबाई चव्हाण, पद्मिनी चव्हाण उपस्थित होते.



### एलपीजी दरवाढीविरोधात बैठक घ्या; अन्यथा आंदोलनाचा इशारा

**सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

सोलापूर जिल्ह्यात ऑटो रिक्षासाठी वापरल्या जाणाऱ्या एलपीजी इंधनाच्या दरात अचानक व अनियमित वाढ होत असून, विविध पंपांवर वेगवेगळे दर आकारले जात आहेत. काही ठिकाणी ८२.१५, काही ठिकाणी ८५ तर काही ठिकाणी ९९.९५ प्रति लिटर दराने इंधन विक्री होत असल्याने रिक्षाचालकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे. या दरवाढीमुळे हजारो रिक्षाचालकांचे दैनंदिन उत्पन्न ठप्प झाले असून, त्यांच्या कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे. माजी आमदार नरसय्या आडम यांनी पालकमंत्री यांना विनंती करत सांगितले की, या गंभीर प्रश्नावर उपाययोजना करण्यासाठी संबंधित अधिकारी व एलपीजी पंप चालकांची पुढील दोन दिवसांत बैठक घेण्यात यावी. यावर पालकमंत्री यांनी सकारात्मक प्रतिसाद देत लवकरात लवकर बैठक आयोजित करण्याचे आश्वासन दिले आहे. दरम्यान, वाहतूक संघटना संयुक्त महासंघाचे प्रदेशाध्यक्ष रियाज सय्यद यांनी रिक्षाचालकांना माहिती देताना स्पष्ट इशारा दिला की, येत्या शुक्रवारपर्यंत या प्रश्नावर ठोस तोडगा निघाला नाही, तर सोलापूर रिक्षा संघटना कृती समितीची तातडीची बैठक घेऊन मोठ्या आंदोलनाचा निर्णय घेण्यात येईल. यावेळी माजी आमदार नरसय्या आडम मास्टर, युसुफ मेजर,रियाज सय्यद, महिपती पवार, आतिश शिंदे, मोहसिन बागवान, प्रदीप शिंगे, अमोल दुर्के, राजू सिदगणे, संतोष गायकवाड, भोसले उपस्थित होते.



### श्री रामलिंगेश्वर यात्रा उत्साहात

**द. सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

येथील रामलिंगेश्वर यात्रेला भाविकांचे दंडवत घालणे, नंदिध्वज मिरवणूक, श्री राम प्रतिमेचे पूजन आणि गूळ, खोबरे प्रसाद वाटप, सनई चौघड्यांचा मंगलमय आवाज हर हर महादेवचा जयघोष करीत भक्तांच्या जल्लोषात मिरवणूक संपन्न झाली. सोमवारी पहाटे तीन वाजल्यापासून श्रीच्या मूर्तीस अभिषेक, रुद्रपठण इत्यादी धार्मिक कार्यक्रम करण्यात आले. मोहोळ येथील सदभक्त भाऊसाहेब नागनाथ गावडे यांनी महाप्रसाद सेवा रुजू केली आहे. मिरणुकीत ग्रामस्थ प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार, काशिनाथ बिराजदार, संतोष वळसंगे, रामलिंग चितले, इरेश सुतार, संगप्पा उदंडे, सिद्राम शेळगे, सरपंच पैगंबर मुल्ला श्रीशैल चितले उपस्थित होते.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## कर्मवीर पारितोषिकासाठी पंढरपुरातील महाविद्यालयाची आज प्रत्यक्ष तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ६ एप्रिल-**

रयत शिक्षण संस्थेच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी देण्यात येणाऱ्या कर्मवीर पारितोषिकासाठी पात्र ठरलेल्या महाविद्यालयांच्या प्रत्यक्ष तपासणी प्रक्रियेला वेग आला असून, पंढरपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयाला मंगळवार, दिनांक ७ एप्रिल रोजी समिती भेट देणार आहे.

या तपासणीसाठी नियुक्त समितीमध्ये चेअरमन म्हणून प्रि. डॉ. साळुंखे एस. टी. (यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच सदस्य म्हणून प्रि. डॉ. कदम एल. डी. (डी.पी. भोसले कॉलेज, कोरेगाव), प्रा. पाटील जे. एन. (यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा) आणि श्री. कांबळे एस. आर. (सिनिअर क्लार्क, ऑडिट डिपार्टमेंट, रयत शिक्षण संस्था, सातारा) यांचा समावेश आहे. संस्थेकडून प्राप्त माहितीनुसार, १५०० पेक्षा अधिक विद्यार्थीसंख्या असलेल्या महाविद्यालयांची प्राथमिक निवड करण्यात आली असून, त्यामध्ये पंढरपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचा समावेश आहे.

महाविद्यालय प्रशासनाने आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली असून, समितीच्या स्वागताची तयारी पूर्ण केली आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी दिली आहे.



### महत्त्वाचे

## श्रीक्षेत्र केगाव येथे श्री सिध्दारूढ यात्रेस उद्यापासून प्रारंभ




**सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

अक्कलकोट तालुक्यातील श्री क्षेत्र केगाव (बु) (खु) येथे सालाबादप्रमाणे यंदाही सदगुरू श्री सिद्धारूढ महास्वामींची यात्रा बुधवार ८ एप्रिलपासून सुरू होणार आहे. यात्रेदरम्यान ८ एप्रिल ते ११ एप्रिलपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. नवीन निर्माण केलेल्या सदगुरू श्री सिद्धारूढ मंदिराचे बांधकाम पूर्ण केल्याने अनेक मठाधिश्वरांच्या उपस्थितीत श्री सिद्धारूढ मूर्ती प्रतिष्ठापना व कळसारोहण समारंभ तसेच संत महात्म्यांचे प्रचवन कार्यक्रम होणार आहे. अशी माहिती मंदिर समितीच्यावतीने संपर्कप्रमुख शिवशरण दारफळे यांनी पत्रकाद्वारे दिली. गुरूवार ९ एप्रिल ते ११ एप्रिलपर्यंत विविध विषयावर महत्म्यांचे प्रवचन होणार आहे. गुरूवार ९ रोजी सकाळी ८ वा. केगाव खु. हनुमान मंदिर येथून श्री सिद्धारूढ महास्वामी यांचे पालखी, नवीन मुर्ती व कळश यांचे रथोत्सव मिरवणूक आणि सुहासिनींचा कुंभमेळा केगाव बु. येथील श्री सिद्धारूढ मंदिरापर्यंत निघणार आहे. शुक्रवार १० रोजी सकाळी नव्या मंदिरात सदगुरू श्री सिद्धारूढ महास्वामीजी यांची मूर्ती प्रतिष्ठापना व कळसारोहण कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर श्री सिद्धारूढ मूर्तीस रूद्राभिषेक व महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. हे सर्व कार्यक्रम सदगुरू डॉ. शिवकुमार महास्वामीजींच्या सतप्रेरणेने होणार आहेत. या कार्यक्रमांसाठी सदगुरू डॉ. शिवानंद भारती महास्वामी, सदगुरू डॉ. शिवकुमार महास्वामी, मातोश्री लक्ष्मीताई, श्री. चिदधानांनद भारती महास्वामी, श्री प.पू. सुशांतदेवी, श्री स्वरूपानंद स्वामी, श्री शंकरानंद स्वामी, प.पू. आनंदशास्त्री, श्री निर्भयानंद ब्रह्मचारी, प.पू. गोपालशास्त्री, प.पू. हणमंत महाराज, मातोश्री जयश्री खानापुरे यांच्या उपस्थित होणार आहेत. केगाव येथील मठास सोलापुरातील ओंकार आश्रम मठाचे मातोश्री सुशांतदेवी यांच्यातर्फे मूर्ती देण्यात आली. तर मूर्ती प्रतिष्ठापना पूजा सविता व नागनाथ संगप्पा टेंगळे यांच्या हस्ते होणार आहे. महाप्रसाद अमोगसिद्ध कळी, मल्लिकार्जून व्हनकोरे, लक्ष्मण दुधनी, तुकप्पा पवार, बसवराज मुडवे, शरणबसप्पा ढंगी तर अल्पोपहार कल्मेश्वर आहेरवाडी, भोजप्पा कोळी, अश्विनी व रेवती दिकसंगी, मंडपसेवा मल्लिकार्जुन विद्यालयाच्यावतीने करण्यात येणार आहे.



## समाजकल्याण योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणार

✻ सभापती संस्कृती सातपुते यांचा निर्धार

**सोलापूर, दि.६ एप्रिल**

जिल्हा परिषद समाजकल्याण सभापती संस्कृती सातपुते यांनी आपल्या कार्यकाळाची प्रभावी सुरुवात करत समाजातील वंचित घटकांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचवण्याचा ठाम निर्धार व्यक्त केला आहे. सोमवारी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत जिल्हा परिषदेतील सर्व पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. बैठकीनंतर सातपुते यांनी अधिकृतपणे कामकाज हाती घेतले. यावेळी त्यांनी जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच सर्व सभापतींची भेट घेऊन त्यांचा सत्कार केला. दरम्यान, पत्रकारांशी संवाद साधताना सातपुते म्हणाल्या की, समाजकल्याण विभाग हा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्याचा प्रभावी माध्यम आहे. मिळालेल्या पदाला प्रामाणिकपणे न्याय देत प्रत्येक योजना वंचित लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील.यासोबतच विभागातील कर्मचाऱ्यांची कमतरता लक्षात घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात येणार असून, समाजकल्याण विभागातील रिक्त पदे तातडीने भरण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाकडे पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मुलींची वसतिगृहे तसेच दिव्यांग शाळांमधील सोयी-सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी विशेष लक्ष देण्यात येणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.माजी आमदार राम सातपुते यांच्या सामाजिक कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच आपण राजकीय वाटचाल करत असल्याचे सांगत, मिळालेल्या जबाबदारीला पूर्ण प्रामाणिकपणे न्याय देईन, अशी ग्वाही सातपुते यांनी दिली.

# पोखरापूर नवोदय विद्यालयात झेडपीच्या शाळांचा डंका

## गुणवत्ता यादीत ६० विद्यार्थ्यांची बाजी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ एप्रिल**

सोलापूर जिल्ह्यातील १० तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण घेणाऱ्या इयत्ता ६ वीच्या ६० विद्यार्थ्यांनी मोहोळ तालुक्यातील पोखरपूर येथील नवोदय विद्यालयाच्या प्रवेश पात्रता परीक्षेत घवघवीत यश मिळवून आपला प्रवेश निश्चित केला आहे. केंद्रीय सी.बी.एस.सी अभ्यासक्रम पद्धतीच्या या परीक्षेत झेडपीच्या ६० विद्यार्थ्यांनी मेरिटमध्ये गुण मिळवून जिल्ह्याचे नाव गौरविण्यात केले आहे.

सोलापूर जिल्ह्यासाठी एकूण ८० जागांपैकी ६० जागांवर झेडपीच्या विद्यार्थ्यांनी आपली मोहर उमटवली आहे. तर उर्वरित जागांवर खासगी अनुदानित आणि विनाअनुदानित इंग्रजी मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांनी जागा कमावल्या आहेत. जिल्हा परिषदेच्या शाळेच्या या कामगिरीमुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण उंचावले आहे. जानेवारी महिन्यात ही परीक्षा नवोदय विद्यालयाच्या वतीने घेण्यात आली. त्यासाठी जिल्ह्यातील विविध जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून सदरची सराव चाचणी करून घेतली होती.

दरम्यान, काही विद्यार्थी केवळ एक गुण कमी पडल्याने गुणवत्ता यादीतून बाहेर पडले. औंढी जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण घेणारी गार्गी ही केवळ एका गुणांनी मागे राहिली. तिला ९५.१७ टक्के मिळाले. तर गुणवत्ता यादी ९६ टक्क्यांवर बंद झाली. त्यामुळे तिचा मोठा हिरमोड झाला. मात्र जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील सर्वाधिक १२ विद्यार्थ्यांनी नवोदय विद्यालयाच्या पात्रता प्रवेश परीक्षेत मोठे यश मिळविले आहे.

### ग्रामीण भागातील शिक्षणाची वाढती गुणवत्ता; हे तर शिक्षक-विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे द्योतक

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी नवोदय प्रवेश परीक्षेत मिळवलेले यश हे केवळ निकालापुरते मर्यादित नसून, जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षणाची वाढती गुणवत्ता अधोरेखित करणारे आहे. मर्यादित साधन सामग्रीतही शिक्षकांनी घेतलेले परिश्रम, विद्यार्थ्यांची जिद्द आणि पालकांचा वाढता सहभाग यामुळे हे यश शक्य झाले आहे. या यशातून ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्था सक्षम होत असल्याचे स्पष्ट होत असून, योग्य मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण प्रयत्न केल्यास ग्रामीण विद्यार्थीदेखील कोणत्याही स्पर्धात्मक परीक्षेत आपली छाप उमटवू शकतात, हे पुन्हा सिद्ध झाले आहे.

### प्रतिभावंत विद्यार्थ्यांना शिक्षण मोफत मिळणार

भविष्यात सोलापूर जिल्हा परिषदेच्या शाळेतील ६०हून अधिक विद्यार्थ्यांना नवोदय विद्यालयाच्या या पात्रता प्रवेश परीक्षेत उत्तीर्ण करण्यासंबंधी विशेष प्रयत्न केला जाईल.तसे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यामुळे जिल्ह्यातील प्रतिभावंत विद्यार्थ्यांना सहावी ते बारावी पर्यंतचे शिक्षण मोफत आणि दर्जेदार मिळणार आहे.

- **कादर शेख,** प्राथमिक शिक्षणाधिकारी

### नवोदय विद्यालयाच्या पात्रता प्रवेश परीक्षेत गुणवत्ता यादीत आलेल्या तालुकानिहाय विद्यार्थ्यांची आकडेवारी

| तालुका | विद्यार्थी संख्या |
|---|---|
| बार्शी | २ |
| करमाळा | १० |
| अक्कलकोट | ४ |
| माढा | ७ |
| मंगळवेढा | ५ |
| मोहोळ | २ |
| पंढरपूर | १ |
| सांगोला | ६ |
| दक्षिण सोलापूर | १ |

## मोटरसायकल स्वारास ट्रकची धडक; दोघांचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. ६ एप्रिल-**

मंगळवेढा -मरवडे मार्गावर भरधाव वेगातील कंटेनरने दुचाकीला पाठीमागून जोरात दिलेल्या धडकेत आसबेवाडीतील दोघांचा मृत्यू झाल्याची घटना आज सायंकाळी ४.३० वाजता घडली आसुन चालक मोहमंद कबरूद्दिन (रा.झारखंड) याच्याविरूध्द गून्हा दाखल झाला आहे.

या अपघाताची फिर्याद तानाजी मोरे (रा.आसबेवाडी) यानी दिली असून यामध्ये म्हटले आहे की नारायण रतीलाल आसबे वय ३५ व उमेश गमन खटकाळे वय ३८ हे मंगळवेढ्यातील आपले कामकाज उरकून बजाज कंपनीची दुचाकी क्रमांक एम एच १३ डी जी ११९ वरून आसबेवाडी गावाकडे जात असताना मंगळवेढ्यापासून काही अंतरावर असलेल्या लक्ष्मी देवी मंदिराजवळ पाठीमागून येणाऱ्या टाटा कंपनीच्या एम एच ०४ जेके १४०१ या सहा चाकी ट्रकने पाठीमागून दिलेल्या धडकेत गंभीर जखमी होऊन नारायण आसबे याचा जागीच ठार झाला तर उमेश खटकाळे यांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला यातप्रकरणी ट्रक चालक मोहम्मद मकरूद्दीन मोहम्मद साबीरुद्दीन रा. घुगुलिया पोस्ट टाटीदरभंगा हजारीबाग झारखंड याच्यावर भरधाव वेगाने वाहन चालवून अपघातास कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.आधिक तपास पोलीस करीत आहेत.

## महापुरुषांचे पुतळे उभारताना शासकीय नियमांचे पालन करा

▶▶ सहाय्यक पोलिस अधीक्षक प्रशांत डगळे यांचे आवाहन
▶▶ भोसे गावात नियमानुसारच बसणार शिवरायांचा पुतळा
▶▶ पूर्व परवानगी घेण्याचा ग्रामस्थांचा आदर्श निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.६ एप्रिल-**

पंढरपूर तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागात थोर पुरुषांचे पुतळे उभारण्या बाबतचा परिपूर्ण प्रस्ताव सादर करावा. काही ठिकाणी विनापरवानगी अति उत्साहात चुकीच्या ठिकाणी पुतळे उभारतात. हे अत्यंत चुकीचे असून थोर महापुरुषांचे पुतळे उभारताना राज्य शासनाने मार्गदर्शक तत्वे जरी केले असून त्या तत्त्वांचे पालन करावे असे आवाहन सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांनी केले आहे.



तालुक्यातील भोसे येथे ५ एप्रिल रोजी पहाटे चार ते पाच वाजण्याच्या दरम्यान छत्रपती शिवाजी महाराजांचा सिंहासनावर आरूड असलेला पुतळा भोसे येथील चौकात बसविण्यात आला होता. या पुतळ्यासाठी पूर्वपरवानगी व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली गेली नव्हती या अनुषंगाने पोलीस प्रशासन, महसूल प्रशासन, जिल्हा परिषद प्रशासन यांनी या गोष्टीची तात्काळ दखल घेऊन तेथील सरपंच, पदाधिकारी जेष्ठ नागरिक तसेच युवक व ग्रामस्थ यांच्या याबाबत सोबत चर्चा करण्यात आली. पुतळा बसविल्यानंतर परवानगी बाबतची प्रक्रिया पार पाडावी असा गैरसमज निर्माण झाले असल्याचे प्रशासनाने तेथील ग्रामस्थांच्या लक्षात आणून दिले. भोसे गावातील ग्रामस्थांनी प्रशासनाच्या विनंतीला मान देऊन पुतळा स्थलांतरित करून सुरक्षित स्थळी ठेवला. सदर पुतळा उभारण्यासाठी ग्रामस्थांनी रीतसर अर्ज केला असून, परवानगी मिळाल्यास गाजत बसवावा. तसेच आवश्यक सुशोभीकरण करावे.

### आज बैठकीचे आयोजन

पुतळा उभारण्या बाबत योग्य मार्गदर्शनासाठी मंगळवारी (दि.७ एप्रिल) प्रांताअधिकारी सचिन इतापे, तहसीलदार सचिन लंगुटे तसेच सर्व पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस अधिकारी यांच्या समवेत तालुक्यातील पोलीस पाटील, सरपंच, तलाठी, ग्रामसेवक यांची बैठक आयोजित करण्यात आली असल्याचेही सहाय्यक पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांनी सांगितले.

## संग्रामनगर जैन समाजाच्या वतीने परिसराची स्वच्छता



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ६ एप्रिल-**

श्री सन्मती सेवा दल बहुउद्देशीय अल्पसंख्यांक संस्था व सकल जैन समाजाच्या वतीने सात जिल्ह्याचा एकत्रित भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सव अकलूज येथे पार पडला. या महोत्सवाच्या निमित्ताने अकलूज परिसरातून शोभायात्राही काढण्यात आली. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर शोभायात्रेतील भाविकांना थंड रसना सरबताचे वाटप सकल जैन समाज संग्रामनगर, गुमास्ता कॉलनी यांच्यावतीने विजयचौकात करण्यात आले. शोभा यात्रा पुढे मार्गस्थ झाल्या नंतर केवळ पंधराच मिनिटात विजय चौकाचा परिसर समाजातील कार्यकर्त्यांनी स्वच्छ करून सुमारे दहा पोती कचरा एकत्र गोळा केला. व पर्यावरणाचे रक्षण केले. भगवान महावीरांच्या विचाराचे अनुकरण प्रत्यक्ष कृतीतून केल्याने कार्यकर्त्यांचे परिसरात कौतुक होत आहे.

कोल्हापूरचे स्वस्तिश्री लक्ष्मीसेन भट्टारक पट्टाचार्य यांनीही या उपक्रमाचे कौतुक करून भविष्यात ही असेच कार्य करत रहा असे आशीर्वाद दिले. सेवा दलाचे अध्यक्ष मिहीर गांधी व पोलीस प्रशासनाने ही अभिनंदन केले. संतोष दोषी, कोराळे यांनी पाणी वाटप, प्रसन्न गांधी यांनी सरबत वाटप, सुहास दोशी यांनी आईस्क्रीमचे वाटप ही केले.



## परशुराम जन्मोत्सव समिती मध्यवर्ती मंडळाची यंदा २० एप्रिलला मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

सोलापूर शहरात यंदाचे वर्षी महामानव बाबासाहेब आंबेडकरांची मिरवणूक ही दिनांक १९ ला असल्या कारणाने परशुराम जन्मोत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी ही मिरवणूक दिनांक २० एप्रिल रोजी काढण्याचे ठरविले आहे.

यंदाचे वर्ष या उत्सव समितीचे अध्यक्ष म्हणून आनंद खंडेलवाल यांचे नुकतीच घोषणा झाली आहे तर कार्यकारी अध्यक्ष म्हणून रमण कुलकर्णी यांना जबाबदारी देण्यात आलेली आहे.

महिला आघाडी अध्यक्ष म्हणून अश्विनी जोशी या असते तसेच तसेच या समिती उपाध्यक्ष म्हणून राजू अवस्थी दीपक बाजपाई स्वागत समितीमध्ये ब्राह्मण समाजातील नुकतेच निवडून आलेले सर्व सदस्य असतील याशिवाय सल्लागार म्हणून सहभागी असणार आहेत त्या ॲड. उमेश मराठे सोलापूरतील दत्तात्रय पाठक, बी. जी. कुलकर्णी, मोहनराव दाते याशिवाय अनेक जण या सल्लागार म्हणून काम करणार आहे व अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मिळून सोलापूर शहराला चांगला आदर्श समाजापुढे ठेवण्याचा प्रयत्न आम्ही करणार आहोत या उत्सवाला सर्वांनी सहभागी व सहकार्य करावे असे आवाहन बजरंग कुलकर्णी यांनी केलेले आहे.

## भिशीच्या वादातून तरुणाला नगरसेवकासह २० जणांकडून मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.६ एप्रिल-**

आमच्याकडे भिशी का लावत नाही. या कारणावरून पालिकेचा विद्यमान नगरसेवक व त्याच्या इतर २० साथीदारांनी येथील एका तरुणास लाथा बुक्क्या व कोयत्याने मारहाण करून जखमी केले आहे. दरम्यान या मारहाणीच्या घटनेबाबत पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

येथील संतपेठ येथे राहणार अनिकेत धनवजीर यास नगरसेवक लोकेश यादव व नागेश यादव हे आमच्याकडे भिशी का लावत नाही.या कारणावरून नेहमी दमदाटी करत होते. दरम्यान शुक्रवारी अनिकेत धनवजीर हा आपले मित्र सागर मेहडा, नागेश मेहडा, अलोक नवघरे यांच्याबरोबर रात्री नऊ वाजता घराकडे निघाला होता. तेव्हा ७ ते ८ दुचाकी गाडीवरून नगरसेवक लोकेश यादव, नागेश यादव, पवन यात्व, प्रसाद यादव, अनिकेत जाधव, ऋषिकेश यादव, अविनाश रणदिवे, अनिल यादव, बिरू वाघमारे, शंभू थोरात, दत्तात्रय थोरात, तेजस पवार, राकेश वाघमारे, राहुल यादव, दत्ता जाधव, रोहित फुलारे, ओंकार पवार, सचिन डोंगरे, संतोष वाघमारे व विठ्ठल (सर्वजण रा.संत पेठ) हे आले व मारहाण करण्यास सुरुवात केली. एकाने कोयत्याने अनिकेत यांच्यावर वार केले. यामुळे अनिकेत हा गंभीर जखमी झाला असून त्याचे इतर मित्र किरकोळ जखमी झाले आहेत. त्यानंतर या घटनेबाबत अनिकेत धनवजीर यांनी पंढरपूर शहर पोलीस ठाण्यामध्ये नगरसेवक लोकेश यादव यांच्यासह वरील २० जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत घुगरकर करीत आहेत.

## जिल्ह्यातील ३६ ग्रामपंचायतींच्या ४७ जागांसाठी पोटनिवडणुका जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर ,दि. ६ एप्रिल-**

राजीनामा, मयत, अविश्वासाचा ठराव, अपात्र, प्रवर्गातील उमेदवार न मिळणे या कारणामुळे रिक्त असलेल्या ३६ ग्रामपंचायतींच्या ४७ जागांसाठी पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. रिक्त ४७ जागात सरपंचाच्या १३ तर सदस्यांची ३४ पदे रिक्त आहेत. सरपंचाची निवडणूक थेट जनतेतून होणार आहे. या संदर्भात पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाले असून ७ एप्रिल ते १३ एप्रिलपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल कालावधी आहे. तर २८ एप्रिल रोजी मतदान असून २९ एप्रिलला निकाल जाहीर करण्यात येणार आहे.



मंद्रूपमध्ये वॉर्ड क्रमांक दोन मध्ये पोटनिवडणूक जाहीर झाले असून ओबीसी महिला प्रवर्गासाठी निवडणूक होत आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आले असून मंगळवार ७ एप्रिलपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरूवात होणार आहे. २८ एप्रिलला मतदान व २९ एप्रिलला मतमोजणी होणार आहे.

- **रावसाहेब कोकरे,** सहायक निवडणूक अधिकारी, मंद्रूप

### निवडणूक कार्यक्रम

नामनिर्देशन - ७ ते १३ एप्रिल
उमेदवारी अर्ज छाननी - १५ एप्रिल
अर्ज माघार - १७ एप्रिल - दुपारी ३ वाजेपर्यंत त्यानंतर चिन्ह वाटप
मतदान - मंगळवार २८ एप्रिल
मतमोजणी - २९ एप्रिल

**पोटनिवडणूक लागणाऱ्या तालुका निहाय ग्रामपंचायती**

सांगोलाः अनकढाळ, चिणके, चिकमहुद, खवासपूर, माढाः वडशिंगे, भोसरे. माळशिरसः पानीव, कोळेगाव, लोंढे मोहिते वाडी. अक्कलकोटः हंजगी, हसापूर, सुलतानपूर, कोन्हाळी, रुद्धेवाडी, सलगर, बार्शीः चुंब, मांडेगाव, देवगाव, उमबरगे, पंढरपूरः ईश्वर वठार. दक्षिण सोलापूरः तोगराळी, मनगोळी, मंद्रूप, वांगी, दर्गनहळळी, कुसुर, खानापूर, शंकर नगर, करमाळाः तरटगाव, जिती, भिलारवाडी, कात्रज, रिटेवाडी. मोहोळः डिकसळ, यावली. मंगळवेढाः फटेवाडी.

**प्रवर्गातील उमेदवार न मिळाल्याने अनेक जागा रिक्त**

अक्कलकोट तालुक्यातील हंजगी, हसापूर, कोन्हाळी, दक्षिण सोलापूर तालुक्यातील तोगराळी-गुर्देहळ्ळी, कुसुर-खानापूर या गावातील ग्रामपंचायतीचे वार्ड अनुसूचित जमातीसाठी राखीव होते. मात्र या ठिकाणी या प्रवर्गातील उमेदवार न मिळाल्याने ग्रामपंचायत सदस्य पदाच्या जागा रिक्त राहिल्या आहेत.